CMYK

आजचा सामना
मुंबई वि. दिल्ली
वेळ : सायं.३.३० वाजता
ठिकाण : दिल्ली

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
राजस्थान वि. गुजरात
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : अहमदाबाद

सोलापूर | शनिवार, ४ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १२६ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जी सृष्टिव्यवहाराला जर काही कारण आहे, सर्व हालचाली काही हेतुपुरस्सर होत आहेत हे जर खरे आहे, तर मग माझ्या अस्तित्वाला व जीवनालाही आधार म्हणून काही हेतू, लक्ष्य असलेच पाहिजे! स्वत:च्या जीवनाचा हेतू काय, जीवनाचे ध्येय काय, या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न मनुष्याच्या विकासातील फार महत्त्वाचा टप्पा आहे.

**एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी



# तरुण भारत असोसिएट्सच्या 'विकासपुरुष' विशेषांकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, दि.३ एप्रिल-**

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी मागील अकरा वर्षात केलेल्या विकासकामांचा आढावा घेणारा 'विकासपुरुष' हा विशेषांक तरुण भारत असोसिएटस्तर्फे तयार करण्यात आला आहे. या विशेषांकाचे प्रकाशन एका छोटेखानी समारंभात श्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते थाटात करण्यात आले.

याप्रसंगी तरुण भारत असोसिएटस्चे सीईओ मनोज मुळे, व्यवस्थापक महेंन्द्र बांगरे, महाव्यवस्थापक ओम ढाकुलकर, व्यवस्थापक राजेश व्यवहारे उपस्थित होते. या विशेषांकासाठी तरुण भारत असोसिएटसचे प्रबंध संचालक श्री. रवींद्र दाणी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तरुण भारत असोसिएटस्ने एक उत्तम आणि परिपुर्ण अंक प्रसिध्द केला आहेख अशा शब्दात केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी या विशेषांकाची प्रशंसा केली. ना.गडकरी हे विकासाशी जोडलेले एक सुपरिचित असे मंत्री म्हणून काम करताना स्वकर्तृत्वाने आकारास आलेले प्रभावी व्यक्तिमत्व. नितीन गडकरी हे नाव कानी पडताच एक जिंदादिल, दिलदार, कार्यक्षम, धाडसी, समर्पित, जिद्दी, परिश्रमी असे व्यक्तिमत्व समोर उभे राहते. कोणतेही काम अगदी मनापासून करणारा नेता, अशी ओळख त्यांनी देशाला करुन दिली आहे. गडकरी हे राजकारण्यांसाठी 'सम ाजकारणाचे' आदर्श आहेत. देशाला आणि जनतेला आजवर जे माहित नव्हते, असे काम करण्यात गडकरी यांना विशेष रुची असते. त्यांच्या डोक्यात एकाच वेळी अंसख्य विचार सुरु असतात. नुसते रस्ते तयार केले, पुल बांधले म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे ते मानत नाहीत, त्याही पलीकडे सम ाजाचा एक घटक म्हणून आपली जबाबदारी आहे आणी ती पार पाडली पाहीजे, यासाठी ते सतत कार्यशिल असतात.

### नवनवे पैलुंवर चर्चा; विकासाची दृष्टी

'विकासपुरुष' या विशेषांकात रस्ते बाधंणी, परिवहन विकास, विकासाचे नवनवे पैलू यांचीही चर्चा करण्यात आली आहे. या अंकात काही मान्यवरांनी विकासाची चर्चा करीत असतानाच ना.नितीनजी गडकरी यांनी याबाबत केलेल्या कामाचे कौतुक करणारे लेखही लिहिले आहेत. त्यात ना.नितीनजी गडकरी यांची विकासाची दृष्टी, कामाचा झपाटा, निर्णयक्षमता यांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.





# कालव्यात कार कोसळली; सासू-सासरे, पत्नीचा मृत्यू

— • नातेपुते जवळील घटना; पती जखमी —

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ३ एप्रिल-**

नातेपुते जवळील पुलाजवळ इर्टिगा कार निरा-उजव्या कालव्यात कोसळून पत्नी, सासू, सासरे अशा तिघांचा मृत्यू झाला. तर पती गंभीर जखमी झाला. ही घटना शुक्रवारी पहाटे ४:३० च्या सुमारास घडली.

रामनवमीच्या यात्रेनिमित्त सुनील टेळेकर (वय-३६, रा.फोंडशिरस ता.माळशिरस) हे आपल्या फोंडशिरस गावी आले होते. त्यांचा मुलगा दक्ष हा मामाकडे राहिला होता. त्याचे डोळ्याचे ऑपरेशन करायचे असल्याने त्याला मुंबईला घेऊन जाण्यासाठी हे कुटुंब शुक्रवारी पहाटे मुंबईहून (एम.एच.४३ सी.सी. ०१५८) इर्टिगा गाडीने फोंडशिरसकडे निघाले होते.

नातेपुते जवळील पुलाजवळ पोहोचताना पहाटेच्या वेळी डुलकी लागल्याने चालकाचा कारवरील ताबा सुटून कार थेट निरा उजव्या कालव्यात कोसळली. यात सासरे हनुमंत जठार (वय-५५), सासू मंजूळा जठार (वय-४९), पत्नी प्रीती सुनील टेळेकर (वय-३0) यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

हनुमंत जठार व मंजुळा जठार यांचे मृतदेह नागरिक व प्रशासनाने कालव्यातून बाहेर काढले. परंतु प्रीती टेळेकर यांचा मृतदेह अद्याप सापडला नसून, पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची शक्यता आहे. याबाबत शोधकार्य सुरु आहे.

या अपघातात सुनील टेळेकर सुदैवाने वाचले असून त्यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व नातेपुते पोलीस स्टेशनने तात्काळ मदतकार्य सुरू केले. या घटने संदर्भात अकस्मात मृत्यूची नोंद झाली. पुढील तपास नातेपुते पोलीस स्टेशनचे सपोनि विशाल वायकर हे करीत आहेत.

## महत्त्वाचे

### जहाल माओवादी प्रशांत बोसचा अंत



**रांची :** प्रतिबंधित सीपीआय-माओवादी संघटनेचा रणनीतीकार, पॉलिट ब्युरो सदस्य, १५ जवानांच्या हत्येचा सूत्रधार आणि १ कोटी रुपयांचे बक्षीस असलेला जहाल माओवादी प्रशांत बोस उर्फ किशन दा याचा ८० व्या वर्षी उपचारादरम्यान मृत्यू झाला. रांची येथील राजेंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये उपचारादरम्यान त्याने अखेरचा श्वास घेतला. तो सध्या सरायकेला येथील तुरुंगात होता. १२ नोव्हेंबर २०२१ रोजी सरायकेला-खरसावा जिल्ह्यातून त्याला अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्याच्यासोबत त्याची पत्नी आणि माओवादी नेत्या शीला मरांडी हिलाही बेड्या ठोकल्या होत्या. शुक्रवारी पहाटे त्याला अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. प्रकृती चिंताजनक झाल्याने पोलिस बंदोबस्तात त्याला रांचीच्या रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांच्या पथकाने तातडीने उपचार सुरू केले, मात्र वाढत्या वयोमानामुळे आणि फुफ्फुसांच्या विकारांमुळे उपचारांना प्रतिसाद मिळाला नाही. अखेर सकाळी १० च्या सुमारास डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### उत्तर भारत भूकंपाने हादरला

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्ली, चंदीगड, पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि जम्मूकाश्मीरमध्ये शुक्रवारी ९ वाजताच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. भारतासह पाकिस्तान आणि अफगाणिस्तानही भूकंपाने हादरला. भूकंपाची तीव्रता रिश्टल स्केवर ५.९ इतकी नोंदवण्यात आली, तर भूकंपाचा केंद्रबिंदू अफगाणिस्तानम धील हिंदू कूश पर्वतरांगामध्ये असल्याचे भारतीय भूकंपशास्त्र विभागाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. दिल्ली-एनसीआर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि चंदीगडच्या अनेक भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. जम्मू आणि काश्मीरच्या उधमपूर, पूंछ, कुपवाडा, श्रीनगरमध्ये भूकंपाने दहशत निर्माण झाली. धक्के जाणवल्यानंतर नागरिकांनी मोकळ्या मैदानात धाव घेतली.

# मालदा हिंसाचार: सूत्रधारासह ३५ अटकेत

**मोफक्कुल इस्लामला विमानतळावर पकडले**



◆ **कोलकाता, ३ एप्रिल**

पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यात न्यायिक अधिकाऱ्यांवर झालेला हल्ला आणि त्यांना ओलिस ठेवल्याच्या आरोपात पोलिसांनी शुक्रवारी प्रकरणाचा सूत्रधार मोफक्कुल इस्लामला बागडोगरा विमानतळावरून अटक केली. तो विदेशात पसार होण्याच्या तयारीत होता. याप्रकरणी आतापर्यंत १९ गुन्हे दाखल करण्यात आले, तर ३५ आरोपींना पकडण्यात यश आले. जिल्हा न्यायालयात हजर केले असताना न्यायाधीशांनी त्यांना १० दिवसांच्या पोलिस कोठडी सुनावली आहे.

एसआयआर प्रक्रियेतून नावे वगळल्याच्या निषेधार्थ मालदा येथे आंदोलन झाले, याला हिंसक वळण लागले होते. अर्ज भरून घेण्यासाठी आलेल्या सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलिस ठेवण्यात आले होते. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि पोलिस विभागाला कठोर शब्दात फटकारले होते. त्यानंतर काही तासातच पोलिसांनी याप्रकरणात १९ गुन्हे दाखल केले आणि शुक्रवारी पहाटे हिंसाचाराचा सूत्रधार इस्लामला बागडोगरा विमानतळावरून अटक करण्यात आल्याची माहिती पोलिस महासंचालक के. जयरामन यांनी दिली. आतापर्यंत ३५ आरोपींना पकडण्यात आल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात् एनआयएने या प्रकरणाचा तपास हाती घेतला असून, एक पथक मालदा येथे दाखल झाले. ◀(वृत्तसंस्था)

**अधिकाऱ्यांच्या हत्येचा रचला कट**

पेशाने वकील असलेला मोफक्कुल इस्लाम हा ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) चा नेता आहे. मालदामधील एसआयआरविरोधात आंदोलनाचे नेतृत्व त्याने केले. न्यायिक अधिकाऱ्यांच्या हत्येचा कट रचल्याचा गुन्हा त्याच्यावर दाखल आहे. एनआयए त्याला लवकरच ताब्यात घेणार आहे.

# शिक्षण क्षेत्रातील 'अर्थ'पूर्ण सेटिंगला ब्रेक!

## खासगी शिक्षक भरतीसाठी आता १०० गुणांचे नवे मिशन

◆ **मुंबई, ३ एप्रिल**

राज्यातील खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक भरतीत चालणाऱ्या वशिलेबाजीला आणि डोनेशन संस्कृतीला राज्य सरकारने मोठा लगाम घातला आहे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने १०० गुणांची नवीन मानक कार्यपद्धती लागू केली असून, आता उमेदवाराच्या निवडीत वशिला नाही तर मेरिट (गुणवत्ता) महत्त्वाचे ठरणार आहे. विशेष म्हणजे, या नव्या सूत्रात शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी मधील गुणांना ७५% इतका सिंहाचा वाटा देण्यात आला आहे.

आजवर खासगी शाळांमध्ये मुलाखतीच्या नावाखाली उमेदवारांची होणारी आर्थिक कोंडी आता इतिहास जमा होणार आहे. नव्या नियमांमुळे केवळ मुलाखतीच्या जोरावर शिक्षकाची निवड करणे अशक्य झाले आहे. निवडीसाठी निश्चित केलेल्या १०० गुणांच्या आराखड्यात मुलाखत आणि अध्यापन कौशल्याचे महत्त्व केवळ १० गुणांपुरते मर्यादित करण्यात आले आहे. यामुळे ज्या मुलाखतींच्या माध्यमातून गैरप्रकार व्हायचे, त्या प्रक्रियेला आता गुणवत्तेच्या चौकटीत जखडले गेले आहे.

तांत्रिक अटींमुळे उमेदवारांची होणारी अडचण लक्षात घेऊन सरकारने मोठा दिलासा दिला आहे. यापूर्वी उमेदवारांना केवळ ५० शाळांचा प्राधान्यक्रम निवडता येत होता, ती मर्यादा आता वाढवून १०० शाळा करण्यात आली आहे. विना मुलाखत गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना यामुळे नोकरी मिळण्याची शक्यता पूर्वीपेक्षा दुप्पट झाली आहे.

**समान गुण असल्यास वय ठरणार निर्णायक**

निवड प्रक्रियेत दोन उमेदवारांना समान गुण मिळाल्यास, अधिक वय असलेल्या ज्येष्ठ उमेदवाराला प्रथम प्राधान्य दिले जाईल. जर उमेदवारांचे वयदेखील समान असेल, तर बारावी (उच्च माध्यमिक) परीक्षेतील गुणांच्या आधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. या संपूर्ण प्रक्रियेवर शिक्षणाधिकारी आणि उपसंचालकांचे बारीक लक्ष असेल. प्रक्रियेत पारदर्शकता न राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

**यशाचा नवा फॉर्म्युला (१०० गुण)**

| निवडीचा निकष | विभागलेले गुण |
|---|---|
| शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) | ७५ गुण |
| व्यावसायिक पात्रता (डीएड/बीएड श्रेणी) | ०८ गुण |
| शैक्षणिक पात्रता (पदवी/पदव्युत्तर श्रेणी) | ०७ गुण |
| मुलाखत व अध्यापन कौशल्य | १० गुण |
| **एकूण** | **१०० गुण** |

# एकनाथ शिंदेंचे खरातला १७ फोन

## रुपाली चाकणकरांसह तटकरे, केसरकर, शेलारांनीही केले कॉल्स

◆ **मुंबई, ३ एप्रिल**

भोंदू अशोक खरात प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धक्कादायक माहिती उघड केली आहे. महायुती सरकारमधील सर्वात मोठा महत्त्वाचा घटक पक्ष शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खरातला तब्बल १७ वेळा फोन केल्याचा दावा दमानिया यांनी केला आहे. तसेच राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनीही खरातला एक-दोन नव्हे तर तब्बल १७७ वेळा फोन केले होते, अशी माहिती त्यांनी शुक्रवारी दिली.

दमानिया म्हणाल्या, रुपाली चाकणकरांनी खरात यांना एवढे कॉल का केले होते? याचे उत्तर त्यांनी द्यावे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री आशिष शेलार व शिंदे गटाचे माजी मंत्री दीपक केसरकर हे सुद्धा वेळोवेळी भोंदू खरातच्या संपर्कात होते, असेही दमानिया यांनी स्पष्ट केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# आठ इस्लामिक देशांची इस्त्रायलविरोधात आघाडी

**दुबई :** इस्रायलच्या नवीन कायद्यावर तीव्र टीका करणाऱ्या आठ प्रमुख इस्लामिक देशां ध्ये सौदी अरेबिया, तुर्की आणि इंडोनेशिया यांचा समावेश आहे. या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी गुरुवारी एक संयुक्त निवेदन जारी करून व्याप्त वेस्ट बँकम धील पॅलेस्टिनींना मृत्युदंडाची तरतूद करणाऱ्या इस्रायली संसदेत मंजूर झालेल्या विधेयकाचा आठ प्रमुख इस्लामिक देशांनी निषेध केला. सौदी अरब, इजिप्त, जॉर्डन, इंडोनेशिया, पाकिस्तान, कतार, तुर्की आणि संयुक्त अरब अमिरातीच्या परराष्ट्र मंत्र्यांनी निवेदनात म्हटले की, हा कायद्याचा वापर पॅलेस्टिनी कैद्यांसाठी धोकादायक आहे. यामुळे तणाव आणखी वाढू शकतो आणि प्रादेशिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते. या निर्णयामुळे पॅलेस्टिनींविरुद्ध भेदभाव वाढेल.





आंतरखंडीय क्षेपणास्त्रांनी सुसज्ज असलेल्या आणि अणुशक्तीवर चालणारी आयएनएस अरिंदमन ही अणु बाणबुडी नौदलाकडे सुपूर्द करण्यात आली. ही पाणबुडी विशाखापट्टणम् येथील शिप बिल्डिंग सेंटरमध्ये बांधण्यात आली. अरिहंत आणि अरिघातनंतर भारताने तयार केलेली ही तिसरी पाणबुडी होय.

# सीबीएसईने जाहीर केला नवीन अभ्यासक्रम

**नवी दिल्ली, ३ एप्रिल-**

देशभरातील शाळा आणि विद्यार्थ्यांसाठी ही एक मोठी बातमी आहे. शिकवण्याची पद्धत बदलणार आहे, विषय बदलणार आहेत आणि भाषा ते कौशल्ये अशा सर्व गोष्टी एका नवीन दृष्टिकोनातून एकत्रित केल्या जात आहेत. सीबीएसईने एक नवीन अभ्यासक्रम जाहीर केला आहे, जो येत्या काही वर्षांत शालेय शिक्षणात मोठे परिवर्तन घडवू शकतो. हा बदल राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण २०२० नुसार करण्यात आला आहे.

नवीन प्रणालीनुसार, आता इयत्ता ६ वी पासून तिसरी भाषा अनिवार्य असेल. आतापर्यंत विद्यार्थी दोन भाषा शिकत होते, पण आता त्यांना तीन भाषा शिकाव्या लागतील.




हे २०३१ मध्ये होणाऱ्या इयत्ता १० वीच्या बोर्ड परीक्षांध्ये दिसून येईल, जेव्हा तिसरी भाषा एक अनिवार्य विषय म्हणून समाविष्ट केली जाईल. सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह यांनी स्पष्ट केले आहे की, हा नियम सध्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना लागू होणार नाही. नवीन प्रणालीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना किमान दोन भारतीय भाषांचा अभ्यास करणे आवश्यक असेल. इंग्रजीला आता परदेशी भाषा मानले जाईल. काळानुसार, सीबीएसईने इयत्ता नववी आणि दहावीमध्ये कॉम्प्युटेशनल थिंकिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे विषय अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे.

# स्थापना दिनानिमित्त भाजपाचा 'जनसंवाद सप्ताह'

## ६ एप्रिलला ५१ लाख घरांवर फडकणार भाजपाचा भगवा

◆ **मुंबई, ३ एप्रिल**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त यंदा राज्यभर 'जनसंवाद सप्ताह' साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, ५ ते १२ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात येणार आहे. या कालावधीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह सर्व मंत्री आणि ज्येष्ठ नेते थेट जनतेशी संवाद साधणार असल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन उपस्थित होते.

स्थापना दिनानिमित्त भाजपा यंदा केवळ औपचारिक कार्यक्रम न ठेवता 'गाव चलो, वस्ती चलो' अभियानाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचण्यावर भर देत आहे. ६ व ७ एप्रिल रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये मंत्री, आमदार, खासदार आणि पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांसह नागरिकांशी संवाद साधणार आहेत. शासनाच्या योजना, विकासकामे आणि पुढील धोरणे याची माहिती थेट लोकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघ, ३६ जिल्हे आणि तब्बल १ लाख बूथवर स्थापना दिनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. प्रत्येक बूथवर विविध उपक्रम राबवून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न होणार आहे. स्थापना दिनी राज्यातील तब्बल ५१ लाख घरांवर भाजपाचा झेंडा फडकावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यासोबतच पक्षाची व्यापक ताकद दाखवण्याचा यामागील उद्देश आहे. ◀(वृत्तसंस्था)




**संघटन बळकट करण्यावर भर**

राज्यातील सुमारे १२०० मंडलांमध्ये हे सर्व कार्यक्रम पार पडणार असून, संघटनात्मक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न यामागे असल्याचे उपाध्ये यांनी सांगितले.एकूणच, स्थापना दिनाच्या निमित्ताने भाजपाने राज्यभर जनतेशी थेट संवाद साधत आपली संघटनात्मक ताकद आणि जनाधार अधिक दृढ करण्याची रणनीती आखल्याचे स्पष्ट होत आहे.

**स्थापना दिनाचे प्रमुख उपक्रम**

- ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार
- सक्रीय कार्यकर्त्यांचे मेळावे
- वॉल पेंटिंग अभियानात प्रमुख नेत्यांचा सहभाग
- समाजातील मान्यवर व्यक्तींशी संपर्क
- सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान
- केंद्र व राज्य योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद
- घरोघरी संपर्क अभियान

## महत्वाचे...



### श्री भक्त कबीर भजनी मंडळाचा भावगीत उत्साहात

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
श्री दिगंबर मुनीनाथ महाराजांच्या ५० व्या पुण्यतिथी महोत्सव श्री भक्तकबीर भजनी मंडळाने साजरा केला. पहाटे ५ते ९ वाजेपर्यंत पारायण, हरिपाठ, काकड आरती, हरीकिर्तन, महापूजा महाभिषेक करण्यात आले आणि दुपारी ४ते रात्री १२ पर्यंत हभप अशोक चिट्याल (महाराज) यांचे तेलगू प्रवचन व हभप मोहन कुराफाटी (महाराज) यांचे श्रीमद् भागवत या विषयावर तेलगू प्रवचनानंतर श्री दिगंबर मुनिनाथ महाराजांचे महापूजा महाआरती करण्यात आले. श्री कबीर भजनी मंडळाचे रात्री १० ते १२ हरीजागरने तिसऱ्या दिवसाचा कार्यक्रम समारोप करण्यात आले. तिसऱ्या दिवशीच्या सप्ताह समारंभात आनंद गुजर, विठ्ठल वह्लमदेशी, अंजय्या दुस्सा, सिद्राम पोला, मारुती जिंदम, नरसिंग बिर्कुर आदींनी सहभाग नोंदविला. यावेळी विष्णु कारमपुरी, श्रीनिवास कुसुरकर, नागनाथ कारमपुरी, श्रीनिवास चिलवेरी, नागार्जुन कुसुरकर, ॲड. मुनीनाथ कारमपुरी, रेणुका येरगुंटला, लक्ष्मी गरदास, यमुना पिस्का, अनुसूया कारमपुरी, कौशल्य मुस्कुर, सुनंदा कुसुरकर, कलावती कुसुरकर उपस्थित होते.

### गवळी वस्ती येथून गेली दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
हनुमान मंदिर जवळ, गवळी वस्ती येथून होंडा कंपनीची मोटरसायकल हँडल लॉक करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. २७ फेब्रुवारी रोजी इमाम अब्दुल शेख (वय ४६, रा. घर नंबर ते ३३, बसवेश्वर नगर, नदाफ किराणा दुकानच्या बाजूस, मित्र नगर, शेळगी) यांची होंडा कंपनीची काळा रंगाची असलेली सीडी ११० ड्रीम २० हजार रुपये किमतीची मोटरसायकल क्रमांक एम एच १३ डी एल झिरो ५९२३ ही हनुमान मंदिर जवळ, गवळी वस्ती येथे हँडल लॉक करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उबाळे करत आहेत.

### माहेरून पैसे आणण्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
सासरी नांदत असताना एका विवाहितेला माहेरून पैसे आणण्याच्या कारणावरून आर्थिक, शारीरिक, मानसिक त्रास देऊन शिवीगाळ करून सासरच्यांनी हाताने मारहाण केली आहे. या हकीकत अशी की, १४ जुलै २०२० ते ९ मार्च २०२६ पर्यंत पूजा प्रवीण मुसांडे (वय ३२, रा. लालबहादूर शास्त्रीनगर, साईबाबा शाळेच्या पाठीमागे, दहिटणे शेळगी) ही सासरी नांदत असताना प्रवीण, संदीप, मुक्ताबाई, बालाजी, स्वाती (रा. नागरसोगा ता. औसा, जि. लातूर) यांनी पूजा मुसांडेला माहेरून पैसे आणण्याच्या कारणावरून व इतर कारणावरून आर्थिक, शारीरिक, मानसिक त्रास देऊन शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. याबाबत दि. ३ एप्रिल रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात पाच जणांना विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास येडे करत आहेत.

### दारू पिण्यास पैसे न दिल्याने मारहाण

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**



दारू पिण्यास पैसे मागितले असता पैसे न दिल्याने रागाला जाऊन एकाला बियरची बाटली, काठी व लाथाबुक्याने मारहाण करण्यात आली आहे. याबाबत तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. १ एप्रिल रोजी अथर्व बलभीम अंधारे (वय २१), जूनेद शेख (वय २३), प्रसाद मोहन वाघमोडे (वय २१, रा. जुनी मिल चाळ) यांनी रघुजी हॉस्पिटल जवळील ला-ॲडिक्शन रेस्टॉरंटच्या बाजूच्या बोळात विक्रांत दत्तात्रय गरड (वय २१, रा. ब्लॉक नंबर २, शास्त्रीय हाऊसिंग सोसायटी, विकास नगर, होळकर रोड) याला दारू पिण्यास पैसे मागितले असता पैसे न दिल्याने रागाला जाऊन बियरची बाटली व काठीने, लाथाबुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली. विक्रांत याला जखमी केले. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास बहिरजे करत आहेत.

### गहाळ झालेले मोबाईल तक्रारदारांना पोलिसांनी केले परत

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर कडील गहाळ झालेले १३ विविध कंपनीचे ॲन्ड्रॉईड मोबाईल त्याची किमती २ लाख ४५ हजार रुपये असे मोबाईलचा तांत्रिक पध्दतीने व गुप्त बातमीदारा मार्फत शोध लावुन डी. बी. पथकाने कामगीरी केली आहे व तक्रारदारांना परत करण्यात आले. गहाळ मोबाईलचे कंपनी, मॉडेल, आयएमईआय नंबर याचा वापर करुन तांत्रिक पोलिसांनी तपास सुरु केला. गुप्त बातमीदार यांची शोध घेण्यासाठी मदत घेवून सन २०२६ मधील २ लाख ४५ हजारांच्या १३ विविध कंपनीचे ॲन्ड्राईड मोबाईल हॅन्डसेट सोलापूर शहर व परजिल्हा तसेच पराराज्यातून हस्तगत केले. व सदर मोबाईल हे तक्रारदार यांना परत मिळवून दिले. सदरची कामगिरी ही पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त विभाग-१, प्रताप पोमण, वपोनि महादेव राऊत, दुपोनि तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, पोह बसवेश्वर परीट, पोना शिवानंद भिमदे, पोकॉ सुधाकर माने, पंकज घाडगे, पोकॉ शशिकांत दराडे, विनोद व्हटकर, अर्जुन गायकवाड, अजय चव्हाण, पोकॉ सुरज सोनवलकर, पोकॉ अतिश पाटील, कृष्णा बडुरे, पोकॉ रवि येंडे, तोसिफ शेख, पोकॉ नितीन मोरे, विनोदकुमार पुजारी, अमोल खरटमल, विनायक जाधव, ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केलेली आहे.

# युवती सेना जिल्हाप्रमुखपदी पूजा खंदारे

## युवा सेना शहर अध्यक्षपदी समी मौलवी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
सोलापूर युवा सेनेच्या युवती सेना जिल्हाप्रमुखपदी पूजा खंदारे तर युवा सेना शहर अध्यक्षपदी समी मौलवी यांची निवड करण्यात आली. सोलापूर युवा सेनेची ८४ जणांची जंबो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

युवा सेनेचे राज्य कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवा सेना सचिव किरण साळी, युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर यांनी या निवडी जाहीर केल्या आहेत. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, शहरप्रमुख सचिन चव्हाण, युवा सेना राज्य कार्यकारिणी सदस्य सुजित खुर्द यांनी सत्कार करून अभिनंदन केले. शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, शहरप्रमुख सचिन चव्हाण यांच्या शिफारशीनुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

**कार्यकारिणी याप्रमाणे :**
युवा सेना कॉलेज कक्ष जिल्हा अध्यक्ष - समर्थ बिराजदार, शहर उत्तर विधानसभा प्रमुख -ओम माळवे, शहर मध्य विधानसभा प्रमुख - ऋषिकेश घोलप, दक्षिण विधानसभा प्रमुख - सागर तांबोळकर, जिल्हा उपाध्यक्ष (मोहोळ विधानसभा) - सुरज जम्मा, जिल्हा उपाध्यक्ष (शहर मध्य विधानसभा) - अविष्कार गायकवाड, सोलापूर शहर उपाध्यक्ष - अभिषेक उजागरे, बाळराज मिसाळ, शाहरुख मुजावर, संतोष चेटपेल्लीवर, जिल्हा उपाध्यक्ष (उत्तर सोलापूर) - गणेश कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष (दक्षिण सोलापूर) - ॲड. अखिल शाक्य, शाखा अध्यक्ष - गजानन चेटपेल्लीवर, सतीश बासावार, विभाग अध्यक्ष - साफुर्दा तांबे, विभाग उपाध्यक्ष - संतोष कडलवार, शाखा अध्यक्ष - विनोद कोवे, शाखा उपाध्यक्ष - दीपक कोवे, शाखा सचिव - रामकेश केवट, शाखा अध्यक्ष - कृष्णा बोरकर, शहर समन्वयक - श्रेयस माने, विधानसभा उपाध्यक्ष राहुल कव्यावाले, शहाबाद बागवान, विकी कजाकवाले, विधानसभा सरचिटणीस - अमोल भोसले, विधानसभा उपाध्यक्ष - सिराज शेख, विधानसभा सरचिटणीस - अजिन गायकवाड, शाखाध्यक्ष - प्रकाश पेद्दी, विधानसभा उपाध्यक्ष - सतीश अलकुंटे, विभाग अध्यक्ष - अर्जुन मोरे, शाखा अध्यक्ष - युवराज जमादार, विधानसभा उपाध्यक्ष (दक्षिण सोलापूर) - सुनीत शिंदे, शहर उपाध्यक्ष - सलमान अरब, शाखा अध्यक्ष, नागेश साठे, विधानसभा सरचिटणीस - अजित पवार, सोशल मीडिया अध्यक्ष (सोलापूर शहर मध्य) - ओमकार डोलारे, सोशल मीडिया उपाध्यक्ष (सोलापूर शहर मध्य) - रवी भोरे, विधानसभा समन्वयक - अभिषेक चौधरी, विधानसभा उपाध्यक्ष - सागर कजाकवाले, विभाग अध्यक्ष - अरबाज बागवान, शाखा अध्यक्ष - शाहीद शेख, विभाग अध्यक्ष - गंगाधर वल्लापोल्लू, विधानसभा उपाध्यक्ष (सोलापूर शहर उत्तर) - सुमित गोरे, विभाग अध्यक्ष - सुमित शितोळे, शाखा अध्यक्ष - अभिषेक जाधव, तेजस चव्हाण, वाल्मीक आजलपूरकर, राहुल देसुर, विभाग अध्यक्ष - पृथ्वीराज घोडके, शाखा अध्यक्ष - श्रीकांत कोंडारे, विभाग उपाध्यक्ष (सोलापूर शहर उत्तर) - सोहम घोगरे, अजिंक्य अकोले, अमित पांढरे, पार्थ शिंदे, पारस शिंदे, ऋषिकेश कोंढारे, अमोल नागणे, अनिकेत पवार, शाखा अध्यक्ष - अनिल बनसोडे, अपूर्व अकोले, बालाजी शिंदे, ऋतुराज घोडके, विधानसभा उपाध्यक्ष (सोलापूर शहर उत्तर) - प्रतीक पवार, विभाग अध्यक्ष - धनंजय ढवळे, योगेश चराटे, शाखा अध्यक्ष - पवन खुळे, शुभम माने, विधानसभा सरचिटणीस (शहर उत्तर विधानसभा) - ऋषिकेश कुलकर्णी, विधानसभा समन्वयक (सोलापूर शहर उत्तर) - रजनीश जोशी, विधानसभा सचिव (सोलापूर शहर उत्तर) - रितेश पट्टणशेट्टी, शाखा अध्यक्ष - रोहित जाधव, शुभम आंग्रे, सुमित वाघचौरे, यासीन सय्यद, विधानसभा उपाध्यक्ष (दक्षिण विधानसभा) - बसप्पा शेंडगे, शाखाध्यक्ष बसवराज शेंडगे, विभाग अध्यक्ष - मोहन चव्हाण, शाखा अध्यक्ष - अजय कोळी, विभाग अध्यक्ष - प्रकाश हडपद, शहर उपाध्यक्ष - अयान बागवान, विभाग अध्यक्ष - कासिम बेलिफ, युवासेना कार्यालय प्रमुख - तौफिक बागवान.







## कुंभारीत हनुमान जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
दक्षिण तालुक्यातील कुंभारी येथील मड्डी वस्ती येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

संपूर्ण परिसर 'जय हनुमान'च्या घोषणांनी दुमदुमून गेला. हनुमान जयंतीनिमित्त पाळणा कार्यक्रम, दीपोत्सव तसेच महाप्रसाद वाटप यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी होती. सायंकाळी दीपोत्सवाने संपूर्ण परिसर उजळून निघाला, तर पाळणा कार्यक्रमाने उत्सवाला विशेष रंगत आणली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्राम पंचायत सदस्य शिवानंद अंदोडगी पाटील, प्रकाश कटारे, प्रशांत जमादार, रेवणसिद्ध छपेकर, नागनाथ कटारे, लक्ष्मण कटारे, रेवन मेंगले, ओंकार छपेकर, पिंटू परदेशी, सिद्धाराम अकोले, सागर थोंटे, विठ्ठल शिंदीबंदे, सागर साखरे, शाहरुख शेख, रवी नसारे, मनोज हुलसुरे यांनी परिश्रम घेतले.

## अर्धनारी नटेश्वराच्या पालखी निर्मितीत तरुणांचा सहभाग

### भक्ती, परंपरा आणि कष्टांचा सुंदर संगम



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ एप्रिल-**
वेळापूर नगरीचे आराध्य दैवत असलेल्या अर्धनारी नटेश्वराच्या यात्रोत्सवात दरवर्षी भक्ती, परंपरा आणि उत्साहाचा संगम पाहायला मिळतो. देशभरात एकमेव मानले जाणारे अर्धनारी नटेश्वराचे मंदिर वेळापूर येथे असून येथे स्वयंभू स्वरूपात महादेव व पार्वती यांची एकत्रित मूर्ती प्रकट झालेली आहे. त्यामुळे या देवस्थानाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही अर्धनारी नटेश्वराचा हळदी समारंभ, विवाह सोहळा, देवाचे साडे तसेच देवाची सोळावी अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या भक्तिभावात करण्यात आले. या उत्सवाला हजारो भाविक उपस्थित राहून अर्धनारी नटेश्वराच्या दर्शनाचा लाभ घेतात.

यामधील विशेष आकर्षण ठरणारा देवाचा साडे कार्यक्रम म ध्यरात्री बारा वाजता भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडतो. मानाच्या सर्व कावडी देवाच्या दारात दाखल झाल्यानंतर अर्धनारी नटेश्वराला साडे लावण्याचा सोहळा साजरा केला जातो. त्यानंतर देवाची मानाची पालखी वेळापूर नगरीला प्रदक्षिणा घालण्यासाठी निघते. या पालखीला तरुण भाविक खांद्यावर घेत हर हर महादेव आणि अर्धनारी नटेश्वर महाराज की जय अशा जयघोषात संपूर्ण नगरीतून प्रदक्षिणा पूर्ण करतात. यावेळी वातावरण पूर्णतः भक्तिमय झालेले असते.

या वर्षी देवाच्या पालखीचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे स्थानिक तरुणांनी स्वतःच्या कष्टाने तयार केलेली सुंदर पालखी. देवाचे पुजारी गौरीहर गुरव, सतीश गुरव व रविराज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांनी तब्बल एक महिना परिश्रम घेऊन ही आकर्षक व देखणी पालखी तयार केली. पालखीतील कलाकुसर, सजावट आणि भक्तिभाव यामुळे भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

पालखी निर्मितीत अभिराज होडगे, वैभव वाघे, ओंकार होडगे, ऋषी साठे, अविनाश खराडे, बाळू खंडागळे, करण उरणे, पार्थ करमळकर, मयूर गुरव, प्रणव गुरव, कार्तिक गुरव, गणेश म्हेत्रे, विनोद रणवरे, अतुल गोडसे, गणेश लावंड, तेजस जवंजाळ, पप्पू पिसे, सोहम वाघे यांसह रॉयल इव्हेंट डेकोरेटर टीम वेळापूरचे अनिकेत शिंदे, रोहन भानवसे, संजय जाधव, शंकर राऊत, अनिल घाडगे यांनी योगदान दिले. तसेच डॉ. अमोल घोरपडे, संजय उरणे, विश्वकर्मा बनकर, गणेश बनकर, हनुमंत उघडे, सचिन फडतरे, विष्णू फडतरे, गणेश शिनगारे, सतीश गुरव, रविराज गुरव आदींनी या कार्यात सक्रिय सहभाग घेतला.

## अधिकारी- कर्मचाऱ्यांनी 'कर्मयोगी' प्रशिक्षण पूर्ण करावे

### अतिरिक्त आयुक्त वीणा पवार; ८ एप्रिलपर्यंत साधना सप्ताहाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
राज्य शासनाच्या महा साधना सप्ताह या उपक्रमांतर्गत सर्व अधिकारी कर्मचारी यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमात सोलापूर महानगरपालिका सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी सहभागी व्हावे व प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले.

भारत सरकार क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल या दरम्यान 'साधना सप्ताह' राबविण्यात येणार आहे. अधिकारी कर्मचारी यांना i-Got कर्मयोगी या प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याची सुरुवात आज एका प्रशिक्षण कार्यशाळेद्वारे करण्यात आली. २ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता इंद्रभुवन इमारतीत मीटिंग हॉल सभागृहात हे प्रशिक्षण पार पडले. या कार्यशाळेस उपायुक्त सोनाली यादव, सहायक आयुक्त मनिषा मगर, सहायक आयुक्त गिरीश पंडित आदी सहभागी झाले होते.

संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर यांनी महा साधना सप्ताह, तसेच i-Got प्रणाली नोंदणी व पूर्ण करावयाचे अभ्यासक्रम याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले. राज्य शासनाने हा उपक्रम 'महासाधना' उपक्रम म्हणून राबविण्याचे ठरविले आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदलत्या काळातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

> **नेमका काय आहे हा उपक्रम ?**
> या उपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न होत आहे. या उपक्रमांतर्गत विविध सादरीकरणे, मार्गदर्शन सत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, ई-गव्हर्नन्स प्रणाली, प्रभावी संवाद कौशल्य, तसेच कार्यालयीन कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.



## मल्लिकार्जुन हायस्कूलच्या विज्ञान अविष्कार प्रदर्शनात २५ मॉडेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन आणि एम.आय.टी. विश्व प्रयाग युनिव्हर्सिटी केगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान अविष्कार प्रदर्शनात २५ मॉडेल विद्यार्थ्यांनी सादर केले होते.

याचे उद्घाटन प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके व प्रमुख अतिथी अगस्त्या फाउंडेशनचे बालाजी चौगुले व टीचर इंदिरा पांढरे, पूजा गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. तसेच या प्रदर्शनातील बक्षीस पात्र विद्यार्थ्यांनाही बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविले.

यावेळी इंदिरा पांढरे यांनी विद्यार्थ्यांना प्रदर्शनाचा मुख्य हेतू सांगत मार्गदर्शन केले. रमेश दिंडोरे यांनी सहभागी विद्यार्थी,बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी बसवराज कोरे, भारत राऊत, अनिलकुमार गावडे, संतोष स्वामी, अनिता हौदे, प्रिया पसारे, प्रतीक्षा बिडवे, सोमेश बनजगोळे आदी शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पूजा गुंड यांनी केले. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. महादेव जगताप यांनी आभार मानले.

# सांगली अर्बन बँकेस १८ कोटीचा ढोबळ नफा

## २३०० कोटी मिश्र व्यवसायाचा टप्पा पार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. ३ एप्रिल-**
सांगली अर्बन को-ऑप बँकेने यावर्षी ९२ व्या वर्षात पदार्पण केले असून २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु २३०० कोटी मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला रु १८ कोटी ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे यांनी दिली.

बँकेच्या ठेवीमध्ये रु ११९ कोटीची वाढ होऊन एकूण ठेवी रु १३९६ कोटी झाल्या आहेत. तसेच कर्जामध्ये रु १७२ कोटी इतकी वाढ होऊन रु ९३२ कोटी कर्जाचे वाटप झाले आहे. बँकेचा व्यवसायात वाढ होऊन तो रु. २३२८ कोटींचा झाला आहे. बँकेच्या एनपीए मध्ये लक्षणीय घट होऊन ढोबळ एन.पी.ए २.६७ टक्के इतका व निव्वळ एन.पी.ए चे प्रमाण केवळ ०.७८ टक्के इतके राहिला आहे. रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे सी.आर.ए.आर चे प्रमाण किमान १२ टक्के आवश्यक आहे ते १४ टक्के इतके झाले आहे. यावरून बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाली आहे असे बँकेचे अध्यक्ष सी.ए श्रीपाद खिरे यांनी सांगितले.





बँकेस मोबाईल बँकिंग सुरु करण्यास रिझर्व बँकेकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. त्यामुळे जून महिन्यात बँकेच्या खातेदारांना मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोबाईल बँकिंग मुळे बँकेचे ग्राहक घरबसल्या या सेवेद्वारे आपल्या मोबाईल फोनवरून आपल्या खात्याची तपासणी, बिल भरणे, पैसे ट्रान्सफर करणे आणि इतर बँकिंग कार्ये करू शकतात.

कुसुम योजनेअंतर्गत सोलर फार्मिंग विशेष कर्ज योजनेतून तसेच सोनेगहाण व वाहन खरेदीसाठी कर्ज वाटप केल्याने कर्ज व्यवहारामध्ये वाढ झाली आहे. फ्लॅट / घर खरेदी साठी गृह कर्ज, शेतकरी वर्गासाठी एस.यु.बी किसान विशेष कर्ज योजना, डॉक्टरांसाठी धन्वंतरी, तसेच फेस्टिवल कालावधीसाठी कार लोन ८.२० टक्के आणि होम लोनचा व्याजदर ७.७५ टक्के ठेवल्याने कर्जात लक्षणीय वाढ झाली आहे.

आर्थिक वर्षात केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या विविध सबसिडी स्कीम (योजनांचा) लाभ बँकेच्या कर्ज खातेदारांना झाला आहे. या कर्ज योजनांचा व्यवसाय वाढीसाठी उपयोग झाला आहे.

एनपीए मधील कर्ज वसुलीसाठी कर्ज मॉनिटरिंग, वसुली विभागाने व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. बँकेने लाइफ इन्शुरन्स, जनरल इन्शुरन्स व हेल्थ इन्शुरन्स व्यवसायास ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. विमा व्यवसाय विभागातील कर्मचारी यांनी यासाठी विशेष योगदान दिले आहे. या सर्वांमुळे बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम होण्यासाठी मदत झाली. बँकेच्या प्रगतीमध्ये माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापन मंडळाचे विद्यमान अध्यक्ष गणेश गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष संजय पाटील व सर्व सहकारी संचालक, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांची मोलाची मदत व सहकार्य मिळाले आहे. तसेच बँकेच्या वरील नमूद आर्थिक स्थितीमुळे यावर्षी लाभांश देणे, शाखा विस्तार करणे आणि ग्राहकांसाठी नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त सेवा देणे शक्य होणार आहे असेही अध्यक्ष खिरे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तरोड्यात 'श्री गोवर्धन याग' आज



बाबामहाराज तराणेकर

**वर्धा** : श्री शांतिपुरुष सेवा संस्था, नागपूर आणि मा. गो. वैद्य स्मृती न्यास, नागपूर यांच्या संयुक्त वतीने शनिवारी जिल्ह्यातील मा. गो. वैद्य स्मृती न्यास शेती परिसर येथे श्री गोवर्धन याग आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला बाबामहाराज तराणेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी ८ वाजता यज्ञ विधीला प्रारंभ होणार असून, श्री गोवर्धन यागाचे उद्घाटन दुपारी १२ वाजता होईल. महाकौशल प्रांतचे सहग्रामविकास संयोजक ओम ठाकूर यांचे 'गो आधारित शेती' आणि शिव समर्थ ॲग्रीटेकचे संचालक सुनी गद्रे यांचे कृषी उत्पादन विपणन विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे. दुपारी १.१५ वाजता बाबामहाराज तराणेकर यांचे अध्यक्षीय उद्बोधन होईल.

### काँग्रेसच्या २७ उमेदवारांची यादी जाहीर

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी आपापले पत्ते उघडण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसने आपल्या बहुप्रतिक्षित २७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या यादीत अनेक ज्येष्ठ नेत्यांवर विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच नवीन संतुलन साधण्याचाही प्रयत्न केला आहे. काँग्रेसची यादी जाहीर झाल्यामुळे आता राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेसच्या यादीतील सर्वात प्रमुख नाव तामिळनाडू प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष के. सेल्वपेरुंथगई यांचे आहे. पक्षाने या मातब्बर नेत्याला श्रीपेरुंबुदूर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. श्रीपेरुंबुदूरची जागा काँग्रेससाठी केवळ भावनिकदृष्ट्याच महत्त्वाची नाही तर सेल्वपेरुंथगई यांचे येथून निवडणूक लढवणे हे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवीन उत्साह निर्माण करण्याचे एक पाऊल म्हणूनही पाहिले जात आहे.

# पवारांच्या 'बिनविरोध' डावाला काँग्रेसचा जोरदार धक्का

## मविआमध्येच कुरघोडी; तिहेरी लढतीची शक्यता

◆ **मुंबई, ३ एप्रिल**

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतच अंतर्गत संघर्ष उफाळून आला आहे. 'बिनविरोध' निवडणुकीच्या भूमिकेला छेद देत काँग्रेसने दोन्ही जागांवर थेट लढतीचा निर्णय घेतल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे शरद पवार यांच्या राजकीय रणनीतीला मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

या दोन्ही मतदारसंघांवर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार गट) दावा सांगत असताना काँग्रेसनेही पाय रोवण्याचा निर्णय घेतला आहे. इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण झाल्यानंतर काँग्रेसने माघार न घेण्याची भूमिका स्पष्ट केल्याने





आघाडीत 'मैत्रीपूर्ण' लढत की सरळ संघर्ष, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

राहुरीमध्ये भाजपने अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देत आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादीकडून प्राजक्त तनपुरे यांचे नाव चर्चेत असतानाच काँग्रेसनेही तयारी सुरू ठेवली आहे. त्यामुळे येथे तिहेरी लढत रंगण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे.

यासंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, ''बारामती आणि राहुरीतून कार्यकर्त्यांचा उत्साह मोठा आहे. बारामतीसाठी ६ तर राहुरीसाठी ४ इच्छुकांनी अर्ज केले असून त्यांच्या ऑनलाइन मुलाखती पूर्ण झाल्या आहेत. कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेता येत्या दोन दिवसांत अंतिम निर्णय घेतला जाईल.''

बारामतीत सुनेत्रा पवार यांचे नाव पुढे असतानाच काँग्रेसने 'बिनविरोध' प्रस्ताव धुडकावल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत. आघाडीतील या साठमारीचा थेट फायदा महायुतीला होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. पोटनिवडणुकीमुळे राज्यातील सत्तासमीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असून बारामती आणि राहुरीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. (वृत्तसंस्था)

**पोटनिवडणूक कार्यक्रम**

**उमेदवारी अर्जाची अंतिम मुदत** : ६ एप्रिल २०२६
**अर्जांची छाननी** : ७ एप्रिल २०२६
**माघारीची अंतिम तारीख** : ९ एप्रिल २०२६
**मतदान** : २३ एप्रिल २०२६
**मतमोजणी** : ४ मे २०२६



हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांमध्ये जोरदार बर्फवृष्टी होत आहे. लाहोल आणि स्पिती जिल्ह्यातील अटल बोगदा परिसरात होत असलेल्या बर्फवृष्टीचा आनंद घेताना पर्यटक

# सबरीमाला मंदिरातील सोने चोरी प्रकरण गाजतेय

## डाव्या आघाडी सरकारमधील काही नेत्यांचा हात असल्याचा आरोप

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

केरळमध्ये डाव्या आघाडीच्या सरकारने सोन्याच्या काही तुकड्यांसाठी भगवान अयप्पांचा विश्वासघात केला, राज्यात सर्वसामान्य जनताच नाही तर मंदिरातील देवही सुरक्षित नाही, असा आरोप संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी नुकताच केला.

१४० सदस्यीय केरळ विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता फक्त पाच दिवस उरले आहेत. त्यामुळे सबरीमाला मंदिरातील सोन्याच्या चोरीचा मुद्दा प्रचारात गाजतो आहे. राज्यात भाजपाच्या नेतृत्वातील रालोआ सत्तेवर आल्यावर मंदिरातील सोने चोरीच्या या घटनेची सीबीआय चौकशी करण्याची घोषणा राजनाथसिंह यानी केली आहे. त्यामुळे सोने चोरीचे हे नेमके प्रकरण काय आहे, याची उत्सुकता राज्याबाहेरच्या जनतेत निर्माण होणे स्वाभाविक आहे.

सबरीमाला मंदिर हे केरळमधील अतिशय प्रसिध्द असे मंदिर आहे. या मंदिराच्या भिंती




तसेच गर्भगृहाच्या दरवाजांवर सोन्याचे पत्रे आहेत. मुख्य मंदिराच्या गर्भगृहाच्या दरवाज्यावर असलेल्या द्वारपालाच्या मूर्तीही सोन्यांच्या आहेत. या मंदिराच्या भिंती तसेच दरवाज्यावरील सोन्याचे पत्रे हटवून तेथे पितळेचे पत्रे बसवण्यात आले, असे करत काही किलो सोन्याची चोरी करण्यात आली. गर्भगृहाच्या दरवाज्यावरील द्वारपालाच्या सोन्याच्या दोन मूर्ती विकण्यात आल्या, तसेच तेथे कमी वजनाच्या दुसऱ्या दोन मूर्ती बसवण्यात आल्याचाही आरोप आहे.

२०१९ पासून २०२५ पर्यंत हा प्रकार सुरु होता. यात किमान साडेचार किलो सोन्याची चोरी झाली, याची आजच्या बाजारभावाने किंमत ६० कोटी रुपये आहे. काहींच्या मते मंदिरातून झालेल्या सोन्याची चोरी ही पाचशे कोटी रुपयांची आहे. सोन्याच्या पत्र्यांची कागदपत्रात आधी तांब्याचे पत्रे. अशी खोटी नोंद करण्यात आली. नंतर तांबे म्हणून हे सोने मंदिराबाहेर नेण्यात आले, असा आरोप आहे. मंदिराच्या भिंती तसेच दरवाज्यावर परत सोन्याचे पत्रे लावतांना सोन्याचे वजन कमी झाले, म्हणजे सोन्याची चोरी करण्यात आली, असा संशय आहे.

हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर केरळमधील खळबळ उडाली. मात्र मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांच्या नेतृत्वातील सरकारने काही केले नाही. शेवटी केरळ उच्च न्यायालयाने या घटनेच्या चौकशीसाठी विशेष चौकशी समिती (एसआयटी) स्थापन केली. अंमलबजावणी संचलानलयानेही या प्रकरणाची चौकशी सुरु केली. या प्रकरणात त्रावणकोर देवस्थान मंडळाचे काही अधिकारी, मंदिराचे पूजारी तसेच अन्य काही लोकांना सहभाग असल्याचा आरोप आहे.

# मंत्र्याला वाचविण्यासाठी पुजाऱ्याला केली अटक : काँग्रेसचा आरोप

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

सबरीमाला मंदिरातील कोट्यवधी रुपयांच्या सोन्याच्या चोरीचे हे प्रकरण अतिशय गुंतागुंतीचे आहे. केरळ उच्च न्यायालयाने गठित केलेल्या विशेष चौकशी समितीही सहा वर्ष उलटून गेल्यानंतर या प्रकरणाचे सगळे धागेदोरे हुडकून काढू शकली नाही.

महिलांच्या प्रवेशाच्या मुद्यावरुनही चर्चेत आलेल्या सबरीमाला मंदिरातील सोने चोरीच्या घटनेचे पडसाद केरळ विधानसभेतही उमटले होते.

डाव्या आघाडी सरकारमधील काही नेत्यांचा चोरीच्या या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप भाजपा तसेच काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीने केला. संशयाची सुई डाव्या आघाडी सरकारमधील एका मंत्र्यावर आहे. या मंत्र्याला वाचवण्यासाठी सरकारने जाणिवपूर्वक मंदिरातील पूजाऱ्याला अटक केल्याचा आरोप काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला यांनी केला.

या प्रकरणात मंत्रीला वाचवत तंत्रीला (पूजाऱ्याला) अटक करण्यात आली, असे करत डाव्या आघाडीच्या सरकारचा जनतेचे लक्ष विचलित करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोपही काँग्रेसने केला होता. मंदिराच्या पूजाऱ्याने सबरीमाला मंदिरातील महिलांच्या प्रवेशाला विरोध केल्यामुळे त्याला अटक करण्यात आल्याचा काँग्रेसचा आरोप आहे.

या प्रकरणात एसआयटीने तीन राज्यातील २१ ठिकाणी छापे मारत मंदिरातील पूजाऱ्यांसह डझनभर लोकांना अटक केली. मात्र या प्रकरणातील वस्तुस्थिती अजूनही समोर आली नाही. विशेष म्हणजे २०१९ मध्ये उघडकीस आलेल्या सोने चोरीच्या या प्रकरणात २०२६ सुरु झाले असतांना अद्याप न्यायालयात आरोपपत्रही दाखल झाले नाही.

भाविकांच्या श्रध्देशी खेळणाऱ्या डाव्या आघाडीचे सरकार या मुद्यावर किती गंभीर आहे, याची कल्पना आपण करु शकतो. त्यामुळे भाजपाने विधानसभा निवडणुकीत हे प्रकरण उपस्थित करत डाव्या आघाडीच्या सरकारवर हल्ला चढवला आहे. (तभा वृत्तसेवा)

# नागपूर विधानभवन विस्तारासाठी तब्बल १ हजार कोटी मंजूर

## पायाभुत सुविधांचा विकास करणार

◆ **मुंबई, ३ एप्रिल**

नागपूर येथील विधानभवन विस्तार प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेत तब्बल १ हजार कोटींपेक्षा अधिक निधीस मंजुरी दिली आहे. नवीन विधानभवन इमारत तसेच प्रशासकीय इमारतींच्या बांधकामामुळे नागपूरच्या पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार आहे.

११ मार्च रोजी झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत विकास समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, नागपूर विधानभवन परिसर अधिक आधुनिक, सुसज्ज आणि कार्यक्षम करण्याचा शासनाचा मानस आहे.

या प्रकल्पामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होईल,




तसेच लोकप्रतिनिधींना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहे. नागपूर हे महाराष्ट्राचे उपराजधानी शहर असल्याने विधानभवन परिसराच्या विस्ताराला विशेष महत्त्व आहे. सध्या उपलब्ध सुविधांवर वाढत्या कामकाजाचा ताण लक्षात घेता, नवीन इमारतींची गरज भासू लागली होती. याच पृष्ठभूमीवर शासनाने हा मोठा निर्णय घेतला आहे.

प्लॉट क्रमांक १ वर नवीन विधानभवन व संलग्न इमारती उभारण्यात येणार असून, प्लॉट क्रमांक २ वर प्रशासकीय इमारत तसेच विविध राजकीय पक्षांच्या कार्यालयांसाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे विधानभवन परिसर अधिक सुसज्ज आणि प्रशासकीयदृष्ट्या सक्षम होणार आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मार्फत करण्यात येणार आहे. (तभा वृत्तसेवा)

## गॅस सिलेंडर... प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (एलपीजी) च्या तुटवड्याच्या पृष्ठभूमीवर ग्राहकांना सिलेंडर उपलब्ध व्हावेत, यासाठी पेट्रोलियम कंपन्यांनी एक नवीन प्रणाली लागू केली आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या प्रणाली अंतर्गत, आधी बुक केलेले सिलेंडर वितरित झाल्यानंतरच नवीन बुकिंगवर प्रक्रिया केली जाईल.

या नवीन प्रणालीनुसार, गॅस एजन्सींना त्यांच्या काऊंटरवर पूर्वी केलेल्या बुकिंगच्या तारखेनुसार वितरणाची यादी प्रदर्शित करणे आवश्यक असेल; जेणेकरून इतरांना याची माहिती मिळेल आणि तातडीच्या बुकिंगवर सिलेंडरची मागणी टाळता येईल. (वृत्तसंस्था)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती 'विचारांचा उत्सव' म्हणून साजरी करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

◆ **मुंबई, ३ एप्रिल**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आणि त्यांनी दिलेल्या भारतीय संविधानामुळे देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक असून, त्यांच्या जयंतीचा सोहळा केवळ औपचारिक न राहता 'विचारांचा उत्सव' म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या डॉ. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

मुख्यमंत्री म्हणाले की,



महापुरुषांच्या जयंती साजऱ्या करण्यामागील उद्देश त्यांच्या विचारांचे संवर्धन आणि प्रसार हा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकता भारताला विकसित राष्ट्राकडे नेणारी आहे.

समाजातील हक्क, संधी आणि प्रगती यामागील त्यांचे योगदान नव्या पिढीला समजणे गरजेचे आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही देशभरातून लाखो अनुयायी चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येणार असल्याने व्यापक नियोजनाचे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले. (तभा वृत्तसेवा)

**विशेष आकर्षण : ड्रोन शो**

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, संविधान जनजागृतीसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणीवर भर आहे. यावर्षी १३ एप्रिल रोजी सायंकाळी चैत्यभूमी परिसरात डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो सादर केला जाणार आहे. बैठकीत पोलीस मानवंदना, हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, निवास मंडप, आपत्कालीन व्यवस्था, आरोग्य सुविधा, प्रदर्शन, सजावट, विशेषांक प्रकाशन आदी बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मुंबई महापालिकेने नियोजनाचे सादरीकरणही केले.

# इंडक्शन स्टोव्हचे उत्पादन वाढणार

## गॅस टंचाई टाळण्यासाठी सरकारने घेतला निर्णय

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि इराणसोबत सुरू असलेल्या संघर्षाच्या पृष्ठभूमीवर भारत सरकारने देशाची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कंबर कसली आहे. यासंदर्भात शुक्रवारी राजधानी दिल्लीत एक उच्चस्तरीय आंतर-मंत्रालयीन बैठक झाली. या बैठकीत स्वयंपाकाच्या गॅसवरील (एलपीजी) अवलंबित्व कमी करण्यासाठी युद्धपातळीवर इलेक्ट्रिक इंडक्शन हीटर्स आणि त्यांच्याशी सुसंगत उपकरणांचे देशांतर्गत उत्पादन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.



या महत्त्वपूर्ण बैठकीला उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे सचिव, ऊर्जा सचिव आणि विदेशी व्यापार महासंचालक उपस्थित होते. अधिकाऱ्यांच्या मते, जर आखाती देशांमधील युद्ध दीर्घकाळ चालले तर भारताला ऊर्जा संकटाचा सामना करावा लागू शकतो.

आयात केलेल्या गॅसचा वापर कमी करण्यासाठी लोकांना गॅस स्टोव्हऐवजी इलेक्ट्रिक इंडक्शन स्टोव्हचा वापर वाढविण्यास प्रोत्साहित करणे, ही सरकारची रणनीती आहे.

मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझची सामुद्रधुनी जवळजवळ बंद झाली आहे. जगातील २० टक्के ऊर्जा पुरवठा या मार्गातून जातो. कतारसारख्या देशांमधील एलएनजी सुविधांच्या नुकसानीच्या वृत्तांमुळे चिंता आणखी वाढली आहे. (वृत्तसंस्था)

### जनरल मिन ह्लाइंग म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष

◆ **नाएप्यीडो, ३ एप्रिल**

म्यानमारच्या संसदेने शुक्रवारी मिन आँग ह्लाइंग यांची देशाचे नवे राष्ट्राध्यक्षपदी निवड केली आहे. २०२१ मध्ये आंग सानसू की यांचे सरकार उलथवून टाकण्यात जनरल मिन यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांनी गेल्या पाच वर्षांपासून सत्तेवर आपली घट्ट पकड ठेवली होती.

लष्करी शासक मिन आँग ह्लाइंग सर्वाधिक मते मिळवून राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले आहेत. निवडणुकीच्या काही दिवस आधी, मिन आँग ह्लाइंग यांनी लष्करप्रमुख पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागी जनरल ये विन ऊ यांची नियुक्ती केली गेली.

म्यानमारच्या संसदेने ह्लाइंग यांना उपराष्ट्राध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले. म्यानमारच्या संविधानानुसार, संसद तीन उपराष्ट्राध्यक्ष पदाच्या उमेदवारांमधून राष्ट्राध्यक्ष पदाची निवड करते. म्यानमारमध्ये डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ मध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये यूएसडीपीने विजय मिळवला, ज्यात बहुतेक विरोधी पक्षांना भाग घेण्यास बंदी घालण्यात आली होती. ह्लाइंग २०२१ पासून म्यानमारवर राज्य करत आहेत, त्यांनी आँग सान सू की यांच्या निवडून आलेल्या सरकारला उलथवून टाकण्यासाठी लष्करी उठावाचा आदेश दिला. (वृत्तसंस्था)

## भाजपाकडून माजी राज्यपाल रिंगणात

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीला काही दिवस शिल्लक असताना भाजपाने शुक्रवारी आपल्या २७ उमेदवारांची यादी जाहीर केली. यात माजी राज्यपाल तामिळसाई सौंदरराजन यांचाही समावेश आहे. त्या मायलापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. तर डॉ. एल. मुरुगन यांना अविनाशी (एससी) मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. ते सध्या माहिती व प्रसारण आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री आहेत. यापूर्वी त्यांनी मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय राज्यमंत्री म्हणूनही काम केले आहे. भाजपाने जाहीर केलेल्या यादीनुसार, वनथी श्रीनिवासन कोईम्बतूर (उत्तर) मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी मागील निवडणुकीत याच मतदारसंघात कमल हासन यांचा पराभव केला होता.

# जनविश्वास विधेयकाला संसदेची मंजुरी

## सर्वसामान्यांचे जीणे सुलभ होणार : पीयूष गोयल

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

व्यापार सुगम करण्यासाठी तसेच सर्वसामान्य माणसाचे जीवन सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारने जनविश्वास विधेयक संसदेत पारित केले असल्याचे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले.

वाणिज्य भवनमध्ये शनिवारी आयोजित पत्रपरिषदेत गोयल म्हणाले की, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत पारित करण्यात अले.या विधेयकातून अनेक केंद्रीय कायद्यातील गुन्हेविषयक अनेक तरतुदी हटवण्यात आल्या आहेत.



२३ मंत्रालयाशी संबंधित ७९ कायद्यातील गुन्हेगारीविषयक १ हजार तरतुदी नव्या जनविश्वास विधेयकातून हटवण्यात आल्या, असे स्पष्ट करत गोयल म्हणाले की, या विधेयकातील ६७ सुधारणा या सर्वसामान्य माणसाचे जीवन सुलभ करणाऱ्या आहेत, तर ७१७ सुधारणांचा फायदा व्यापारी वर्गाला मिळणार आहेत. या स्वातंत्र्यपूर्व काळातील सहा कायद्यांचाही यात समावेश आहे.

संसदेने गुरुवारी पारित केलेले विधेयक म्हणजे जनविश्वास विधेयक २०२५ चे सुधारित रुप आहे, असे



स्पष्ट करत गोयल म्हणाले की, छोट्या वा तांत्रिक कारणांमुळे झालेल्या गुन्ह्यांसाठी आता तुरुंगवासाची शिक्षा होणार नाही. अशा प्रकरणांना गुन्हे न समजता प्रशासकीय नियमांचे उल्लंघन मानले जाईल.

अनेक छोट्या गुन्ह्यात आता तुरुंगवासाच्या शिक्षेऐवजी दंडाची आकारणी केली जाईल. (तभा वृत्तसेवा)

**आता एफआयआर नव्हे तर दंड**

मेट्रोत धुम्रपान करणे, वाहतुकीच्या सूचना फलकांना नुकसान पोहोचवणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणे आदी गुन्ह्यासाठी आता एफआयआर दाखल न करता दंडाची शिक्षा करण्यात येणार आहे, असे गोयल म्हणाले. देशातील विविध न्यायालयात अशा छोट्या गुन्ह्यांची ५ कोटी प्रकरणे प्रलंबित आहे, याकडे लक्ष वेधत गोरल म्हणाले की, जनविश्वास विधेयक पारित झाल्यामुळे न्यायालयांवरचा भारही कमी होणार आहे. छोट्यामोठ्या प्रकरणात दंड आकारण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.



पुदूचेरी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'रोड शो'चे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांचे अभिवादन स्वीकारताना पंतप्रधान

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ममतादीदींचा तिळपापड

आसाम, केरळ, पुडुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांत विधानसभा निवडणूक होत आहे. यातील आसाम, केरळ आणि पुडुचेरीत ९ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होत आहे. तामिळनाडूत २३ एप्रिलला एका टप्प्यात तर पश्चिम बंगालमध्ये २३ एप्रिल आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांत मतदान होत आहे. यातील पश्चिम बंगालची निवडणूक गेल्या काही दिवसांपासून सर्वाधिक चर्चेत आहे. पश्चिम बंगाल हे मुळातच अतिशय संवेदनशील राज्य आहे. आपल्या देशातील निवडणुका या प्रामुख्याने मनी पॉवर म्हणजे धनशक्ती तर मसल पॉवर म्हणजे गुंडागर्दीच्या भरवशावर लढल्या जातात हे उघड गुपित आहे. पश्चिम बंगालमधील आतापर्यंतची कोणतीच निवडणूक ही सुरळीत आणि शांततेत झाली नाही. राज्यातील प्रत्येक निवडणुकीला हिंसाचाराचे गालबोट लागते. हिंसाचार आणि त्यात काही निर्दोष आणि निरपराधांचा बळी गेल्याशिवाय त्या राज्यात निवडणुका झाल्यासारखे वाटतच नाही. २०११ पर्यंत राज्यात माकपची सत्ता होती. तो पक्ष सत्तेत असताना राज्यात मोठ्या प्रमाणात गुंडागर्दी होती. कायदा आणि सुव्यवस्था राज्यात माकपची सत्ता असतानाही नव्हती आणि आता तृणमूल काँग्रेसची सत्ता असतानाही ती नाही. पश्चिम बंगालमध्ये जनतेचे मतपरिवर्तन करून मतदान होण्याची पद्धत नव्हतीच. तेथे जनतेला धमकावून, जबरदस्तीने आपल्या बाजूने मतदान करवले जाते. पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षांपासून तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. ममता बॅनर्जी राज्याच्या मुख्यमंत्री आहेत. त्या आक्रमक राजकारणासाठी ओळखल्या जातात. पश्चिम बंगालची माती आणि पाणी वेगळेच आहे. राज्यात कोणी अरे म्हटले तर त्याला कारे म्हणून उत्तर दिल्याने विषय संपत नाही. लोक एकमेकांच्या अंगावर धावून जातात. पश्चिम बंगाल आणि हिंसाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेथे 'जिसकी लाठी उसकी भैंस' हाच न्याय चालत असतो. जो जेवढा आक्रमक आणि हिंसक, त्याचा तेवढा दबदबा राज्यात असतो.

पश्चिम बंगालमधील राजकारण विशेषत: निवडणुकीचे राजकारण हे गुंडागर्दीवर अवलंबून असते. त्यामुळे देशातील अनेक राज्यांत एका टप्प्यात विधानसभा निवडणूक होत असताना पश्चिम बंगालमध्ये मात्र आतापर्यंत तीन ते पाच टप्प्यांत विधानसभा निवडणूक घ्यावी लागत होती. यावेळी राज्यात प्रथमच दोन टप्प्यांत विधानसभा निवडणूक होत आहे. ती राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती सुधारली म्हणून नव्हे तर निवडणूक आयोगाने ठाम आणि कठोर भूमिका घेतल्यामुळे.

मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या अर्थात एसआयआरच्या मुद्यावरून देशातील राजकीय वातावरण गेल्या काही दिवसांपासून तापविण्याचा प्रयत्न केला जात आहे. पश्चिम बंगालमध्ये तर हा मुद्दा निवडणुकीच्या आधीपासूनच स्फोटक झाला आहे. राज्याचा मुख्यमंत्री असो की देशाचा पंतप्रधान, त्यांना निवडण्याचा अधिकार राज्यातील आणि देशातील जनतेचा आहे. मतदारयादीत घुसखोरी केलेल्या परकीय नागरिकांना तो हक्क नाही. परकीय घुसखोरांची नावे मतदारयादीतून काढण्यासाठी विशेष सघन पुनरीक्षण अभियान जसे देशभरात राबविण्यात आले, तसेच ते पश्चिम बंगालमध्येही राबविण्यात आले. न्यायालयाच्या आदेशाने निवडणूक आयोग हे अभियान अतिशय प्रभावीपणे राबवत आहे. यात केंद्र सरकारची कोणतीच भूमिका नाही. निवडणूक आयोग ही घटनात्मक यंत्रणा आहे आणि ती थेट केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत नाही. मात्र एसआयआरच्या मुद्यावरून विरोधी पक्षांनी मोदी सरकारला जबाबदार धरत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न चालवला आहे. आपल्या नागरिकत्वाचा पुरावा सादर करू न शकलेल्या काही लाख घुसखोरांची नावे मतदारयादीतून काढण्यात आली. एखाद्याचे नाव चुकीने मतदारयादीतून वगळण्यात आले असल्यास तो त्या निर्णयाला निवडणूक आयोगाकडे आव्हान देऊ शकतो. आपल्या नागरिकत्वाचे पुरावे सादर केलेल्यांची नावे पुन्हा मतदारयादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. ज्या लोकांनी घुसखोरी करून देशात प्रवेश केला आणि त्यांना नागरिकत्वाचा पुरावा सादर करता आला नाही, त्यांची नावे मतदारयादीतून कायमस्वरूपी वगळण्यात आली. ममता बॅनर्जी यांचा यामुळे तिळपापड झाला आहे. बांगलादेशी घुसखोर म्हणजे ममता बॅनर्जी यांचा हक्काचा मतदार आहे. राज्यातील काही लाख मतदारांची नावे मतदारयादीतून काढण्यात आल्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या व्होट बँकेला मोठा धक्का बसला. बेकायदेशीर मार्गाने निवडणूक जिंकण्याच्या त्यांच्या मनसुब्यालाच सुरुंग लागला. त्याची प्रतिक्रिया तेथील रिवाजानुसार येते आहे. पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यात एसआयआरअंतर्गत काही मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली, त्याला आव्हान देण्यात आले. निवडणूक आयोगाचे काही अधिकारी याची पडताळणी करत असताना बाहेर मोठा जमाव जमला. या न्यायिक अधिकाऱ्यांना भेटण्याची मागणी हा बेकायदेशीर जमाव करत होता, पण त्याला परवानगी न मिळाल्यामुळे जमावाने हा अधिकारी उपस्थित असलेल्या कार्यालयाला घेरले, त्यांना ओलिस धरले. यात काही महिला अधिकारीही होत्या. निवडणूक आयोगाच्या या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी राज्य सरकारची म्हणजे स्थानिक प्रशासनाची होती. पण ममता बॅनर्जी सरकारने आपले हे घटनात्मक कर्तव्य पार पाडले नाही. कर्तव्यात गुन्हेगारी स्वरूपाचा निष्काळजीपणा केला. मालदा येथे बेकायदेशीर जमावाने जे केले, तो फक्त कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा नव्हता, तर न्यायव्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न होता. हा सारा प्रकार ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या चिथावणीतून घडविण्यात आला, यात शंका नाही. त्या बेकायदेशीर जमावात तृणमूल काँग्रेसचे गुंड मोठ्या संख्येत होते, अशी माहिती आहे. निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय सतर्क असल्यामुळे या अधिकाऱ्यांची सुटका झाली आणि त्यांचा जीव वाचला. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारवर जोरदार ताशेरे ओढले. या राज्यातील प्रत्येक जण राजकीय भाषा बोलतो आणि या राज्याचे देशात सर्वात जास्त राजकीय ध्रुवीकरण झाले आहे, या शब्दांत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी आपली नाराजी व्यक्त केली. निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय सतर्क नसते, तर या न्यायिक अधिकाऱ्यांच्या जिवावर बेतले असते, यात शंका नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार या घटनेची एनआयएमार्फत चौकशी करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. या चौकशीवर आम्ही देखरेख ठेवू, असे सांगत ६ एप्रिलपर्यंत या चौकशीचा प्राथमिक अहवालही सादर करायला न्यायालयाने सांगितले आहे. आम्ही कोणालाही कायदा हातात घेण्याची परवानगी देणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. यावरून या घटनेने सर्वोच्च न्यायालय किती संतप्त झाले, याची आपण कल्पना करू शकतो. देशाच्या कोणत्याही राज्यात अशी घटना आजपर्यंत कधी घडली नाही, जी मालदा येथे घडली वा घडविण्यात आली. या घटनेची राजकीय किंमत मुख्यमंत्री म्हणून ममता बॅनर्जी यांना चुकवावी लागेल. सत्ता आपल्या हातातून जाते आहे, याची कल्पना आल्यामुळे ममता बॅनर्जी यांनी सर्व मर्यादा आणि ताळतंत्र सोडला, असे म्हणायला हरकत नाही. या घटनेत ममता बॅनर्जी यांची वागणूक मुख्यमंत्री म्हणून कमी तर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून जास्त होती. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना जी हमी त्यांनी दिली होती, त्याचे पालन त्यांनी केले नाही. दुसरी कोणतीही वेळ असती तर ममता बॅनर्जींना राजीनामा द्यावा लागला असता. पण आता मतदानाला फार कमी दिवस उरल्यामुळे त्यांचा राजीनामा घेण्यात काही अर्थ नाही. खरे तर आपल्या राजकीय फायद्यासाठी मर्यादा आणि ताळतंत्र सोडण्याची यापुढे देशातील कोणत्याच राज्याच्या मुख्यमंत्र्याची हिंमत होणार नाही, असा धडा ममता बॅनर्जी यांना शिकवला पाहिजे. तसे प्रत्यक्षात होईल ते जनमताच्या कौलातून. या देशात कायद्यापेक्षा आणि लोकभावनेपेक्षा कोणीही मोठा नाही, हा संदेश देणे आवश्यक आहे आणि तो जनमताच्या कौलातून मिळणार आहे. दीदींचा तिळपापड होतोय तो त्यामुळेच! ▮

## प्रासंगिक

**नितीन गडकरी**

# अजातशत्रूची आठवण

माझ्यासाठी मोठ्या भावासारखे असलेले ज्येष्ठ नेते दत्ताभाऊ मेघे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या आठवणींचा पूर माझ्या मनात दाटून आला आहे. अतिशय लाघवी आणि सहयोगी स्वरूपाचे व्यक्तिमत्त्व दत्ताभाऊंना लाभले होते. ईश्वराच्या कृपेने त्यांच्या वाट्याला जी काही समृद्धी आली, त्यातील वाटा गरजूंना मिळत राहावा, यासाठी त्यांनी आयुष्यभर धडपड केली. राजकारणात राहूनही अजातशत्रू ठरलेले दत्ताभाऊ हे एक आगळेवेगळे रसायन होते. त्यांच्याशी एकदा जोडली गेलेली व्यक्ती त्यांच्यापासून कधीही दुरावत नसे.

दत्ताभाऊंच्या जीवनाची सुरुवात अतिशय गरीब कुटुंबातून झाली. सी. पी. ॲण्ड बेरार कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. उदरनिर्वाह चालविण्यासाठी आईसफ्रूट विकले. जुन्या पुस्तकांचे दुकान लावले. त्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून काम केले. युथ कॅडर नावाची संस्था त्यांनी स्थापन केली. पुढे ते आमदारही झाले. शरद पवार साहेब पुलोदचे मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी त्यांच्यासोबत काँग्रेस सोडली. त्यांचा राजकीय प्रवास रोमहर्षक होता. शिवाय, एखादा सामान्य आणि गरीब माणूस आपल्या जीवनात किती मोठे काम करू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण होते आमचे दत्ताभाऊ. लोकांसाठी शक्य ते सारे करत असताना त्यांनी आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपली. गोर-गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी सढळ हाताने मदत केली. त्यांच्याकडे गेलेला गरीब माणूस कधीही निराश होऊन परतला नाही. सतत मदत करण्याच्या त्यांच्या दानशूर वृत्तीची तुलना करायची असेल तर कर्णाशी करावी लागेल. विशेषतः मंत्री असताना पक्षातील असो वा बाहेरचे असो, त्यांनी उत्तम व्यवहार केला.

गरिबांबद्दल कळवळा आणि संवेदनशीलता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांनी कायम लोकांचे हित साधण्याचा प्रयत्न केला. गरिबांची, उपेक्षितांची सेवा केली. राजकीयदृष्ट्या आपल्या बाजूचा आहे की विरोधातील आहे, याचा विचार न करता त्यांनी लोकांना मदत केली. त्याच काळात त्यांनी रविनगर सी. पी. ॲण्ड बेरार शाळेत फार्मसी कॉलेज सुरू केले. पुढे इंजिनीयरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज सुरू केले आणि खूप मोठे साम्राज्य उभे झाले.

> **दत्ताभाऊंचा स्नेहभाव पक्षातीत होता. त्यामुळेच ते अजातशत्रू होते. राजकारणातले त्यांचे विरोधकही एका टप्प्यावर त्यांचे चाहते झाले ते त्यांच्या लाघवी व आपुलकीच्या स्वभावामुळे. विरोधकांशीही त्यांचे संबंध आत्मीयतेचे असायचे. आपल्यावर टीका करणाऱ्या नेत्यालाही गुपचूप आर्थिक मदत करणाऱ्या विरळा व्यक्तिमत्त्वाचे होते दत्ताभाऊ. त्यांच्यासाठी माणूस महत्त्वाचा होता, पक्ष नव्हे. दत्ताभाऊ म्हणजे असंख्य लोकांसाठी आधारवड होते. गेल्या काही वर्षांत आम्ही एकत्र येऊन ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्य सुरू केले होते. त्या कार्याला दत्ताभाऊंचा फार मोठा आधार होता. त्यांचे मार्गदर्शन लाभायचे.**

दत्ताभाऊंनी राजकारण, शिक्षण, सहकार, समाजकारण अशा अनेक क्षेत्रांत आपला ठसा उमटवला.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख ही त्यांची दिलदारी आणि आपुलकी हीच होती. आयुष्याच्या एका टप्प्यावर दत्ताभाऊ राजकारणात आले. आमदार-मंत्री-खासदार वगैरे झाले. परंतु, त्यांनी असंख्य माणसांशी जोडलेले नाते बदलले नाही. संस्थात्मक कार्यात दत्ताभाऊ आघाडीवर होते. त्यांनी शिक्षण संस्थांचे जाळे निर्माण केले. त्यातून शेकडो लोकांना रोजगार दिला आणि गरीब-गरजू मुलांच्या शिक्षणाचीही सोय केली. त्यांच्या संस्था म्हणजे अनेक गरिबांसाठी संधीचे दार होते. कित्येक विद्यार्थ्यांनी मोफत किंवा अल्प फी देऊन शिक्षण घेतले.

दत्ताभाऊंचा स्नेहभाव पक्षातीत होता. त्यामुळेच ते अजातशत्रू होते. राजकारणातले त्यांचे विरोधकही एका टप्प्यावर त्यांचे चाहते झाले ते त्यांच्या लाघवी व आपुलकीच्या स्वभावामुळे. विरोधकांशीही त्यांचे संबंध आत्मीयतेचे असायचे. आपल्यावर टीका करणाऱ्या नेत्यालाही गुपचूप आर्थिक मदत



करणाऱ्या विरळा व्यक्तिमत्त्वाचे होते दत्ताभाऊ. त्यांच्यासाठी माणूस महत्त्वाचा होता, पक्ष नव्हे. दत्ताभाऊ म्हणजे असंख्य लोकांसाठी आधारवड होते. गेल्या काही वर्षांत आम्ही एकत्र येऊन ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्य सुरू केले होते. त्या कार्याला दत्ताभाऊंचा फार मोठा आधार होता. त्यांचे मार्गदर्शन लाभायचे.

ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने व समाधानाने जगता यावे यासाठी आपल्याकडून जे काही शक्य होईल, ते केले पाहिजे, यासाठी त्यांनी अखेरपर्यंत धडपड केली. शाळेत जाऊ इच्छिणारे लहानगे जीव असोत की दुसऱ्या बालपणाचा अनुभव घेत असलेले ज्येष्ठ नागरिक असोत, दत्ताभाऊ असंख्य माणसांचे आधार होते. सतत लोकांची मदत करीत होते. अशा माणसांच्या जाण्याने निर्माण होणारी पोकळी कधीही भरून निघत नाही. ती पोकळी शिल्लक उरतेच आणि असा माणूस लोकांच्या स्मृतीत चिरंतन स्थान निर्माण करतो. माझा त्यांच्याशी दीर्घ काळ संपर्क आला. एक सुसंस्कृत राजकारणी, समाजाभिमुख लोकनेता आणि गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी धावून जाणारे एक महान व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे दत्ताभाऊ. माझे आणि त्यांचे मैत्रीचे नाते राजकारणाच्या पलीकडचे होते. आमचे कौटुंबिक ऋणानुबंध होते. त्यांच्या निधनामुळे आपण मोठ्या भावाला मुकल्याची माझी भावना आहे. त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. ▮

(मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग भारत सरकार)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# नवीन सहकार कायदा प्रस्थापितांना इशारा

बँकिंग कायदा अधिनियम २०२५ ची अंमलबाजावणी करण्याचा निर्णय राज्याच्या सहकार मंत्रालयाने घेतला आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा विविध सहकारी बँकांच्या संचालक पदांवर ज्या संचालकांना १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला, त्यांना आता पुढील निवडणुकीत अपात्र ठरविण्यात येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश सहकार आयुक्तांना देण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील विविध जिल्हा मध्यवर्ती बँका व विविध सहकारी बँकांच्या संचालक पदांवर मालकांप्रमाणे बसलेल्या सहकार क्षेत्रातील दिग्गजांचे खाते गोठविले जाणार आहे, म्हणजे त्यांना आता यापुढे या बँकांमध्ये संचालक होता येणार नाही.

या निर्णयामुळे जिल्हा सहकारी बँका व सहकार क्षेत्रातील खाजगी बँकांमध्ये वर्षानुवर्षे अनभिषिक्त सत्ता उपभोगणाऱ्या सहकार महर्षींचे वर्चस्व कमी होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा विचार केल्यास या बँकेचे अनेक संचालक १० वर्षे किंवा त्यापेक्षाही जास्त काळापासून संचालक आहेत. त्यापैकी अनेक संचालक तर, वडिलोपार्जित पद्धतीने संचालकपद भूषवीत आहेत. या नवीन नियमांप्रमाणे ते सर्व आता अपात्र ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसे झाले तर, आगामी निवडणुकीत नवीन नेतृत्वाला संधी मिळण्याची शक्यता आहे. या नवीन नियमांचा दीर्घकाळ संचालक राहिलेले राजकीय नेते, माजी पदाधिकारी आणि प्रभावशाली गटांना फटका बसणार आहे. त्याचबरोबर नव्या नेतृत्वाला संधी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. अनेक जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून एकाच गटाचे वर्चस्व कायम असल्याचे आपण पाहतो. नव्हे, या बँका म्हणजे राजकीयदृष्ट्या त्या राजकीय पक्ष आणि नेत्यांची शक्तिकेंद्रे बनली आहेत. वर्षानुवर्षे तेच ते संचालक मंडळ असल्यामुळे अनेक जिल्हा सहकारी बँकांमध्ये घोटाळे देखील झालेत. अनेक बँका दिवाळखोरीत निघाल्या. आजही त्यापैकी काही बँकांची स्थिती डबघाईस आलेली आहे. शेतकऱ्यांची सावकारी जाचातून सुटका करण्यासाठी कमी व्याजदरात पतपुरवठा करण्यासाठी या बँकांची निर्मिती झाली होती. पण, काही कालावधीनंतर या बँकांचा उपयोग आपली राजकारणातील पकड मजबूत करण्यासाठी संचालकांकडून होऊ लागला आणि बँक निर्मितीच्या मूळ उद्देशाला फाटा देऊन आपले राजकीय हितसंबंध जोपासण्यासाठी कर्ज वितरण करणे सुरू झाले. त्याचा फटका या बँकांमधील ठेवीदार, खातेदारांना झाला. बँका दिवाळखोरीत निघाल्याने अनेक ठेवीदारांना मोठ्या आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षकांचे वेतन दिले जात होते. त्यामुळे अनेक शिक्षक, कर्मचाऱ्यांनी या बँकेत ठेवी ठेवल्या होत्या. बँक दिवाळखोरीत निघाल्याने त्यांच्या ठेवी अडकल्या. त्यामुळे अनेक खातेदार, ठेवीदारांना त्यांच्या मुला-मुलींच्या लग्नाला देखील वेळेवर पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे आर्थिक पेच त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांसमोर निर्माण झाला होता. त्यानंतर युती सरकारने या बँकेला निधी दिल्यामुळे ही बँक तरली. पण, आजही बँकेची स्थिती डामाडोलच आहे. याचे कारण, वर्षानुवर्षे तेच ते संचालक होते. आपले संचालकपद म्हणजे आपल्याला मिळालेले अढळ स्थान आहे, असे समजून संचालक वागत होते. त्यामुळे सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आज डबघाईस आल्या आहेत. तेव्हा, सहकार क्षेत्राची अशी हानी होऊ नये म्हणून हा कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे नवीन चेहऱ्याला, युवा नेतृत्वाला सहकार क्षेत्रात वाव मिळेल, असे सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत असले तरी, त्यात फारसा बदल होण्याची शक्यता धूसरच आहे. कारण, आज ज्या संचालकांना दहा वर्षे झाली आहेत, ते बाजूला होतील आणि त्यांच्या जागी त्यांची पत्नी, मुलगी, मुलगा, भाऊ किंवा त्यांच्या परिवारातीलच व्यक्तीला संचालक करण्याचे प्रयत्न केले जातील. तेव्हा, या निर्णयामुळे फार काही बदल होण्याची शक्यता दिसत नाही. असे जर झाले तर, आज ज्यांचे या बँकांवर वर्चस्व आहे ते उद्याही कायम राहणार आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक लवकरच जाहीर होणार असल्याची चर्चा सहकार क्षेत्रात होत आहे. या नव्या नियमांमुळे ही निवडणूक चुरशीची होईल, असे वाटते. तर, १० वर्षांची मर्यादा घालण्याच्या नियमामुळे सहकार क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणि नवीन नेतृत्व पुढे येण्याची अपेक्षा सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांना आहे. तसे जर झाले तर, सहकार क्षेत्राच्या विकास आणि विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब होईल. तेव्हा, या नव्या नियमांची अंमलबजावणी झाली आणि खरोखरच तरुणांना सहकार क्षेत्रात संधी मिळाली तर, त्याचा महाराष्ट्रातील सहकार चळवळ बळकट होण्यासाठी फायदाच होईल, हे नक्की! ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# बस्तर ते गडचिरोली 'रेड कॉरिडॉर'चा अस्त

महाराष्ट्र-छत्तीसगडच्या दाट जंगलांवर सूर्य मावळताना यंदा एक वेगळाच अर्थ उभा राहतो. तो केवळ दिवसाचा शेवट नाही, तर एका दीर्घकालीन अंतर्गत युद्धाच्या शेवटाच्या दाव्याचा क्षणाचा साक्षीदार ठरतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ ही जी अंतिम मुदत दिली होती, ती फक्त प्रशासकीय लक्ष्य नव्हते, ती केवळ एक राजकीय घोषणा नव्हती, तर एक सुरक्षा रणनीती आणि एक स्पष्ट इशारा होता. नक्षलवादाचा शेवट, बस्तर ते गडचिरोली, 'रेड कॉरिडॉर'चा अस्त, जवळ आला असल्याचा.

लोकसभेत बोलताना अमित शाह यांनी ठामपणे सांगितले की, भारताची नक्षलविरोधी मोहीम अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. बस्तर जो एकेकाळी 'रेड टेरर'चे हृदय मानला जात होता. त्या 'रेड टेरर'च्या हृदयात मोठमोठ्याने धडधड वाढलेली मागील काळात बघितली. आत्मसमर्पणासाठी वेळ काय मागितली, टाळाटाळ काय केली, कारणं काय बनविली... पण गृहमंत्र्यांनी कसलीही दाद दिली नाही. 'डेडलाईन म्हणजे डेडलाईन', काहीही 'एस्क्युज' नाही. शेवटी काय धडाधड शस्त्र खाली टाकली गेली. 'कॅडर'मधील मोठमोठी नेतेमंडळी आत्मसर्पण करत गेली. नाहीतर धडक मोहिमेत मारली गेली. त्यामुळे आता अस्ताकडे वाटचाल ही अंतिम टप्प्यात आली आहे. हे निर्विवाद सत्य आहे.

नक्षलवादाचा इतिहास समजून घेतल्याशिवाय या अंतिम टप्प्याचा अर्थ कळू शकत नाही. १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी येथे झालेल्या शेतकरी उठावातून या चळवळीची सुरुवात झाली. पण काही वर्षांतच ही ठिणगी मोठ्या आगीमध्ये रूपांतरित झाली. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य भारतातील विस्तीर्ण जंगल पट्टा हळूहळू 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जाऊ लागला. या भागात नक्षलवाद्यांनी केवळ विचारसरणीचा प्रसार केला नाही, तर समांतर सत्ताकेंद्र उभे केले. त्यांनी रस्ते उडवले, सुरक्षा दलांवर हल्ले केले, खंडणी उकळली आणि स्थानिक लोकांना त्यांच्या जाळ्यात ओढले.

त्याच्या उच्चांकावर १२६ जिल्हे या प्रभावाखाली होते. पण आज ही संख्या केवळ ११ वर आली आहे. त्यातील सर्वाधिक प्रभावित जिल्हे तर फक्त मोजके उरले आहेत आणि त्यात गडचिरोली अजूनही एक महत्त्वाचा बिंदू आहे.



गृह मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, नक्षलवादाचे क्षेत्र १८ हजार चौरस किमीवरून काहीशे चौरस किमीपर्यंत उरले आहे. हिंसक घटनांमध्ये जवळपास निम्मी घट झाली आहे. सुरक्षा दलांचे आणि नागरिकांचे मृत्यू लक्षणीयरीत्या कमी झाले आहेत. हे सर्व पाहता, अमित शाह यांचा अंतिम टप्पा हा दावा केवळ राजकीय भाषण नाही, तर आकडेवारीवर आधारित एक ठोस युक्तिवाद असल्याचे सिद्ध होते.

मात्र, गडचिरोलीकडे पाहिल्यास चित्र अधिक गुंतागुंतीचे दिसते. हा जिल्हा केवळ नकाशावरील एक बिंदू नाही. तो आदिवासी संघर्ष, संसाधनांवरील हक्क आणि राज्यव्यवस्थेच्या मर्यादांचा इतिहास आहे. गडचिरोलीत नक्षलवाद फोफावला कारण येथे विकासाचा अभाव, जमीनहक्कांचे प्रश्न आणि प्रशासनाची कमकुवत उपस्थिती होती. या पोकळीची संधी साधत नक्षलवाद्यांनी चंचू प्रवेश करून नंतर आपली जागा निर्माण केली होती. आता मात्र, आत्मसमर्पणांची संख्या वाढली आहे. अनेक 'कॅडर' शस्त्र टाकत आहेत. रस्ते, मोबाईल नेटवर्क, बँकिंग आणि सरकारी योजना पोहोचत आहेत. त्यामुळे समूळ नायनाट करण्याचा सरकारचा उद्देश सफल होण्याच्या मार्गावर आहे, या दाव्यात दम आहे.

**अमित शाहांचा आक्रमक दृष्टिकोन**

अमित शाह यांची रणनीती स्पष्ट आहे. नक्षलवादाला केवळ विकासाचा प्रश्न न मानता एक वैचारिक युद्ध म्हणून पाहणे. त्यांच्या मते, नक्षलवाद गरिबीतून जन्माला आलेला नाही, तर तो एक विचारपूर्वक रचलेला राष्ट्रविरोधी षडयंत्राचा भाग आहे. गृहयुद्ध, देशाच्या सुरक्षेला असलेला अंतर्गत धोका लक्षात घेता नक्षलवादाप्रति सरकारचा दृष्टिकोन अत्यंत आक्रमक आहे. यात कोणतीही तडजोड करण्यास सरकार तयार नाही. राष्ट्रीय सुरक्षेत कोणताही धोका पत्करायला सरकार तयार नाही. पण सरकारच्या आक्रमकतेपुढे आज बंदूक शांत झालेली उघडउघड दिसत असली तरी, ही विचारसरणी भूमिका बदलून पुन्हा वेगळी झूल पांघरूण मैदानात आली तर संघर्षाची व्याख्या बदलून पुन्हा या विचारसरणीशी लढा द्यायला सज्ज राहावेच लागणार आहे. गडचिरोलीसारख्या भागात, जिथे लोक आधीच वंचित आहेत, तिथे विश्वास निर्माण करणे महत्त्वाचे आहे. केवळ बंदुकीच्या जोरावर शांतता टिकत नाही. ती न्याय, संवाद आणि सहभागातून निर्माण होते. हे सरकारच्या लक्षात आलेच आहे. त्यासाठी गडचिरोलीच्या विकासावर भर देणारे निर्णय दणक्यात होतानादेखील दिसत आहेत.


आज देश नक्षलवादाच्या अंताच्या सर्वांत जवळ असू शकतो, पण हा शेवट आहे, असे समजून चालणार नाही. जंगलातील लढा कमी झाला असेल, रक्तरंजित संघर्ष कमी झाला असेल, पण 'अर्बन नक्षल' या अलिकडे प्रचलित झालेल्या चळवळीमुळे, विचारांचा संघर्ष अजूनही जिवंत असणार आहे. येथे बंदुका शांत होत असल्या, तरी प्रश्न अजूनही उभे आहेतच. अमित शाह यांनी दिलेली अंतिम मुदत कदाचित पूर्ण झाली असेल. पण खरी परीक्षा आता सुरू होते. विकास आणि लोकशाही यांचा समतोल राखण्याची. नक्षलवादावर विजय मिळवणे ही एक गोष्ट आहे. पण त्या विजयाला टिकवून ठेवणे आणि पुन्हा तोंड वर काढू न देणे, हीच खरी लढाई आणि हेच खरे आव्हान, भविष्यात ठरणार आहे. ▮

९२७०३३३८८६

## वाढता मानवी हिंसाचार आणि नैसर्गिक संकटे

आजच्या आधुनिक प्रगत जगात एकीकडे तंत्रज्ञान झपाट्याने पुढे जात आहे, तर दुसरीकडे समाजात मानवी हिंसाचार आणि नैसर्गिक संकटांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे. ही दोन वेगवेगळी वाटणारी संकटे प्रत्यक्षात एकमेकांशी जोडलेली असून, मानवतेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. मानवी हिंसाचाराच्या घटनांकडे पाहिल्यास, कौटुंबिक वाद, सामाजिक तणाव, जातीय द्वेष, तसेच आर्थिक असमानता यामुळे गुन्हेगारी वाढत चालली आहे.

राग, असहिष्णुता आणि स्वार्थ यामुळे माणूस माणसाचा शत्रू बनत आहे. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे चुकीची माहिती आणि द्वेषपूर्ण विचार अधिक वेगाने पसरत आहेत, ज्यामुळे समाजात अस्थिरता निर्माण होते. दुसरीकडे, नैसर्गिक संकटेही दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. अवकाळी पाऊस, दुष्काळ, पूर, उष्णतेची लाट आणि वादळे यामुळे शेती, अर्थव्यवस्था आणि सामान्य जनजीवनावर मोठा परिणाम होत आहे. या संकटांमागे मोठ्या प्रमाणावर मानवी हस्तक्षेप कारणीभूत आहे जंगलतोड, प्रदूषण, अनियंत्रित शहरीकरण आणि पर्यावरणाचा ऱ्हास ही त्याची प्रमुख उदाहरणे आहेत.



ही परिस्थिती केवळ पर्यावरणीय नाही, तर सामाजिक आणि मानसिक संकटाचेही लक्षण आहे. जेव्हा माणूस निसर्गाशी संतुलन राखत नाही, तेव्हा निसर्गही त्याला कठोर उत्तर देतो. त्याचप्रमाणे, जेव्हा माणूस आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवत नाही, तेव्हा हिंसाचाराचा उद्रेक होतो. या दुहेरी संकटावर उपाय म्हणून केवळ सरकारी धोरणे पुरेशी नाहीत, तर प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. शिक्षणामध्ये नैतिक मूल्ये, पर्यावरणाबद्दल जागरूकता आणि संस्कार यांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच, समाजात संवाद वाढवणे, तणाव कमी करण्यासाठी मानसिक आरोग्यावर लक्ष देणे आणि निसर्गपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे. माणसाने माणुसकी जपली आणि निसर्गाचा सन्मान केला, तरच भविष्यातील संकटांना तोंड देता येईल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## वाचक पत्रे

## राजकीय तडजोडीत संवैधानिक मूल्यांचा बळी नको!

आजच्या भारतीय राजकारणात 'युती' आणि 'आघाडी' हे कळीचे शब्द बनले आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी, मतांचे विभाजन रोखण्यासाठी आणि पर्यायाने सत्ता मिळवण्यासाठी राजकीय पक्ष एकमेकांशी तडजोडी करतात. एखाद्या भागात एक पक्ष प्रबळ असतो, तर दुसरा दुबळा; अशा वेळी पक्षविस्तारासाठी अशा तडजोडी व्यावहारिकदृष्ट्या समजण्यासारख्या असल्या, तरी सत्तेचे वाटप करताना होणारी नैतिक तडजोड मात्र राज्यासाठी घातक ठरत आहे. सत्ता स्थापन झाल्यानंतर मंत्रिपदे आणि विविध महामंडळांच्या अध्यक्षपदांचे वाटप सुरू होते. अनेकदा मित्रपक्षांना खूश करण्यासाठी किंवा अंतर्गत नाराजी दूर करण्यासाठी या पदांची खिरापत वाटली जाते. मात्र, हे करताना संबंधित व्यक्तीची पात्रता आणि विशेषतः तिचे चारित्र्य तपासले जाते का? हा मोठा प्रश्न आहे. मंत्रिपदे किंवा संवैधानिक पदे ही केवळ शोभेची बाहुली नसून ती जनतेच्या कल्याणाची आणि न्यायाची केंद्रे असतात. अशा पदांवर बसणाऱ्या व्यक्तीचा भूतकाळ स्वच्छ नसेल, तर त्याचे दुष्परिणाम केवळ त्या खात्यालाच नव्हे, तर संपूर्ण सरकारला भोगावे लागतात.

अलिकडेच महिला आयोगासारख्या अत्यंत संवेदनशील संस्थेच्या सर्वोच्च पदावरील व्यक्ती संबंधितांच्या बातम्या भोंदूच्या प्रकरणात प्रसार माध्यमातून समोर आल्या. राज्य महिला आयोग ही पीडित महिलांना आधार देणारी, त्यांच्या हक्कांचे रक्षण करणारी संस्था आहे. जर या संस्थेची प्रमुखच विवेकहीन आणि अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली असेल, तर ती अन्यायग्रस्त महिलांना न्याय कसा देणार? अशा वादग्रस्त नियुक्त्यांमुळे व्यवस्थेची विश्वासार्हता धुळीला मिळते. जेव्हा एखाद्या उच्च पदावरील व्यक्तीचे तसेच संवैधानिक पदावर बसणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य किंवा भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड होतात, तेव्हा सरकारचे हसू होते आणि प्रशासकीय कामात अडथळे येतात. म्हणूनच, राज्य किंवा केंद्र सरकारने कोणतीही नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीच्या चारित्र्याची, सामाजिक प्रतिमेची आणि संपत्तीची सखोल चौकशी करणे अनिवार्य आहे. राजकीय सोयीसाठी लोकशाहीच्या मूल्यांचा आणि प्रशासकीय स्वच्छतेचा बळी दिला जाऊ नये. केवळ निष्ठा पाहून पदे वाटण्याऐवजी, त्या पदाची प्रतिष्ठा राखेल अशा चारित्र्यसंपन्न व्यक्तीची निवड करणे हेच सुशासनाचे लक्षण आहे. अन्यथा, सत्तेची समीकरणे जुळतीलही, पण जनतेच्या मनातील विश्वास मात्र कायमचा उडेल. ▮

**अविनाश देशपांडे**/पुणे. ९४२२९५०७५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# गत आर्थिक वर्षात मध्य रेल्वेच्या महसूलमध्ये वाढ

## ८९४.६१ कोटींचा 'उगम महसूल' प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान कौतुकास्पद कामगिरी नोंदवली आहे. प्रवासी वाहतूक, मालवाहतूक कार्ये आणि तिकीट-व्यतिरिक्त महसूल निर्मिती यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये विभागाने सातत्यपूर्ण वाढ दर्शविली आहे. विभागाने एकूण ८९४.६१ कोटींचा 'उगम महसूल' प्राप्त केला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ६.८५% ची वाढ दर्शवतो. महसूल वाढीच्या दिशेने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे द्योतक आहे.



प्रवासी महसूलमध्ये ४०७.९५ कोटींवर पोहोचला, ज्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ७.८७% ची वाढ नोंदवली गेली. मालवाहतूक महसूल ४४८.१८ कोटींवर पोहोचला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ६.३१% ची वाढ दर्शवतो. 'इतर कोचिंग महसूल' आणि 'व्यावसायिक किरकोळ महसूल' मध्येही सातत्यपूर्ण वाढ नोंदवली गेली, ज्यामुळे विभागाच्या एकूण कमाईच्या आलेखाला अधिक बळकटी मिळाली आहे.

सोलापूर रेल्वे विभागाने १.९९ कोटींहून अधिक प्रवाशांची वाहतूक हाताळली, जी मागील वर्षाच्या तुलनेत ८.४६% ची वाढ आहे. 'वाढीव लोडिंग'च्या बाबतीत भारतीय रेल्वेमध्ये ५ वा क्रमांक पटकावला. पाकणी येथे पेट्रोलियम, तेल आणि वंगणे वाहतुकीचे लोडिंग सुरू करण्यात आले; यातून ३९३ मालगाड्यांद्वारे ६२.४ कोटींचा महसूल प्राप्त झाला. 'मळी'च्या लोडिंगमध्ये आतापर्यंतची सर्वोच्च कामगिरी नोंदवली गेली. १७ रेक्सद्वारे मळीची वाहतूक करण्यात आली आणि त्यातून ९.६ कोटींचा महसूल मिळाला.

### अमृत भारत स्थानक योजनेत १२ स्थानकांचा समावेश

अमृत भारत स्थानक योजना अंतर्गत सोलापूर विभागात एकूण १२ स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सोलापूर, कलबुरागी, लातूर, कुर्डुवाडी, जेऊर, धाराशिव, पंढरपूर, दुधनी, गाणगापुर रोड, शहाबाद, वाडी आणि अक्कलकोट रोड. या कामांसाठी एकूण खर्च अंदाजे ३३० कोटी इतका आहे. तसेच, या १२ स्थानकांसाठीचा दुसरा टप्पा देखील मुख्यालयाकडून मंजूर करण्यात आला आहे.

### सोलापूर रेल्वे विभागात नवीन सुविधांना मंजुरी

**स्थानकांवर लिफ्टची तरतूद :** एकूण २९ लिफ्ट्स. त्यामध्ये सोलापूर (२), दुधनी (२), गाणगापुर रोड (२), कलबुरगी (४), शहाबाद (२), वाडी (४), जेऊर (३), कुर्डुवाडी (२), पंढरपूर (४), धाराशिव (२) आणि लातूर (२).

* भिगवण, होटगी, मालथन, बोरोटी, कुलाली, हरंगुळ, जिंती रोड, केतूर, मोहोळ, मुरुड, कळंब रोड आणि शेंद्री या स्थानकांवर 'हाय लेव्हल प्लॅटफॉर्म'ची तरतूद.
* हरंगुळ, बोरीबेल, मालथन, मुंढेवाडी, पाकणी आणि बाळे या स्थानकांवर 'फूट ओव्हर ब्रिज'ची तरतूद.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य संघबंदीनंतर विस्तारले

## इतिहास प्रबोधन समिती प्रदेश संयोजक योगेश थत्ते यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ३ एप्रिल-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तत्कालिन केंद्र शासनाने लोकशाहीची तत्वे झुगारून बंदी आणली, लाखो स्वयंसेवकांना तुरुंगात विनाकारण डांबले. परंतु त्या काळात व नंतर संघाचे काम विस्तारले गेले. नवनवीन सेवा प्रकल्प सुरू केले गेले. शाखांची संख्या वाढली, हजारो नवतरुण संघ कामात व सेवा प्रकल्पामध्ये जोडले गेले, असे प्रतिपादन इतिहास प्रबोधन समितीचे प्रदेश संयोजक योगेश थत्ते यांनी केले.



कर्वेनगर माहेश्वरी मंडळ आयोजित सकल हिंदू समाज तर्फे सहवास वस्तीमधील विराट हिंदू मेळाव्यात योगेश थत्ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले,संघ शताब्दी वर्ष साजरे करतांना संघाने हिंदू संघटन बरोबरच शाखा विस्तार तसेच समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन विविध सामाजिक कार्यावर जास्त काम करायचे ठरवले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक जनकल्याण समिती द्वारा राज्यामध्ये समाजातील अनेक वंचित नागरिकांसाठी सेवा प्रकल्प चालवित आहे. संघाच्या विविध क्षेत्रात जसे विश्व हिंदू परिषद, विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राष्ट्रीय सेविका समीर, वनवासी कल्याण आश्रम, विश्व विभाग, पूर्वांचल विकास, सामाजिक समरसता मंच, गो-सेवा प्रकल्प, ग्राम विकास प्रकल्प, अखिल भारतीय पूर्व सैनिक परिषद, अधिवक्ता परिषद, भारत विकास परिषद, क्रीडा भारती, विद्या भारती, सेवा भारती, संस्कार भारती, उद्योजक भारती, संस्कृत भारती, सेवा सहयोग, भारत विकास परिषद, दिव्यांगासाठी काम करणारी सक्षम, सेवा आरोग्य फाऊंडेशन, स्वदेशी जागरण मंच ,दुर्गा वाहिनी अशा विविध संस्था व संघटनाद्वारे अनेक क्षेत्रात कार्यरत असून या शताब्दी वर्षात अधिकाधिक सामाजिक कार्य करण्याचे ठरविले आहे.

यावेळी मातृशक्ती वक्त्या व विश्वमांगल्य छात्र सभाच्या प्रा माधवी शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. तुफान पर्जन्यवृष्टीमुळे सहवास वस्तीतील हे हिंदू संमेलन मनमोहन सोसायटीच्या मैदानाऐवजी सभागृहात घेण्यात आले. आकांक्षा देशपांडे ह्यांनी पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन केले. डॉ चेतन होशिंग यांनी अफझलखानाचा वध यावर अतिशय सुंदर पोवाडा सादर केला. प्रा माधवी शिंदे यांचा सत्कार शुभांगी सुदामे यांनी तर योगेश थत्ते व डॉ चेतन होशिंग यांचा सत्कार मनमोहन सोसायटीचे अध्यक्ष संजीव महाजन यांनी केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संभाजीभाग सहकार्यवाह अमोल जोशी यांनी संस्थेचे अध्यक्ष संजीव महाजन यांचा सत्कार केला.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर संघचालक उदयन पाठक यांची मुख्य उपस्थिती होती. विजय मोने यांनी पसायदान गायिले.

उत्कर्ष प्रकाशनचे उल्हास जोशी यांनी माधवी शिंदे यांना रवींद्र काळे अनुवादित आधुनिक हिंदू धर्म का व कसा हे पुस्तक भेट दिले. उल्हास जोशी यांचा सत्कार योगेश थत्ते यांचे हस्ते तर प्रा.माधवी शिंदे यांच्या हस्ते सूत्र संचालन करणाऱ्या आकांक्षा देशपांडे ह्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

# बार्शी स्टँड परिसरातून मोटारसायकलची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ एप्रिल-**

बार्शी शहरातील एस. टी. स्टँड परिसरातून मोटारसायकल चोरीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्याने काही मिनिटांतच वाहन लंपास केले आहे. याबाबत रणजित शंकर शेवते (वय ३३, रा. खुरपे बोळ, बार्शी सध्या धाराशिव) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी २५ मार्च रोजी (क्र. एमएच ०९ ईजे ०१५१) या मोटारसायकलवरुन बार्शी येथे आले होते. दि. २६ मार्च रोजी एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांनी मोटारसायकल एस.टी. स्टँड परिसरातील प्रधानमंत्री जनऔषधी मेडिकलसमोर ठेवली होती. परत आले असता मोटारसायकल दिसून आली नाही.


### जाहीर नोटीस

बार्शी तालुका व मौजे श्रीपत पिंपरी येथील तमाम लोकांना आमचे लक्ष्मन अनिल येवारे रा. श्रीपात पिंपरी, ता. बार्शी यांनी दिलेल्या कागदपत्रावरून सांगितलेवरून जाहीर नोटीस देण्यात येते की, मौजे श्रीपत पिंपरी येथील जमीन गट नं ८६८/७ हि मिळकत आमचे अशिल व त्यांचे एकत्र हिंदू कुटुंबाचे वडिलोपार्जित मालकी कब्जे वहीवाटीची मिळकत होती व आहे. परंतु सदर मिळकतीस श्रीमंत संभाजी येवारे यांची महसूल दप्तरी नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन श्रीमंत संभाजी येवारे हे वर नमूद मिळकत विक्री करण्याचे खात्रीलायकरित्या समजले आहे. परंतु आमचे अशिल यांचा सदर मिळकतीमध्ये वडिलोपार्जित हक्क हिस्सा होता व आहे. त्यामुळे सदर मिळकती संदर्भात कोणीही गहाण, दान, लीन, खरेदीखत, साठेखत, लिलाव, बक्षीसपत्र इ. तत्सम पद्धतीचे व्यवहार करू नयेत, केलेस ते आमचे अशिलाचे वर नमूद मिळकतीमधील कायदेशीर हक्क हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. याउपरही कोणी व्यवहार केलेस घेणार देणार यांचे विरुद्ध आमचे अशिल अलहिदा वेगळी कारवाई करतील याची नोंद घ्यावी. सबब कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हि जाहीर नोटिस दिली असे. ता. ०१/०४/२०२६.

सही/-
**ॲड. रुपाली डी. ठर्के**
बी.एससी., एल.एल.एम., ॲडव्होकेट
बार्शी. मो. ८६६९१३३१३२

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकंना विशेषतः मौजे राजुरी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना ॲड. श्री सुधीर नंदकुमार वाघ बी.ए., एलएल.बी. रा. सांगोला, यांचेमार्फत कळविणेत येते की,

तुकडी सोलापुर, पोटतुकडी व तालुके सांगोला पैकी मौजे राजुरी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत गट नंबर ७१२/३/१/२ क्षेत्र हे ०० आर, पो.ख. ५३ हे ६८ आर, आकार ० रू ०० पैसे पैकी **१)** सुरेश नारायण काटे **२)** जंगल नारायण काटे यांचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीचे क्षेत्र पो.ख. २ हे ४० आर, विद्या भारत काटे यांचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीचे क्षेत्र पो.ख हे ८० आर तसेच **१)** शांताबाई सोमा काटे **२)** बाळु सोमा काटे **३)** उत्तम सोमा काटे **४)** संजय सोमा काटे **५)** कुसुम जयंत चंदनशिवे **६)** नंदा विजय चंदनशिवे यांचे समाईक मालकी हक्क कब्जेवहिवाटीचे क्षेत्र पो. ख हे ८० आर, या मिळकतीसंबंधी वर नमूद मिळकतधारक व आमचे अशिल ओम श्रीहरी पेपर इंडस्ट्रीज प्रा. लि. तर्फे अधिकृत अधिकारी श्री. शरद लक्ष्मण बोडके यांचे दरम्यान कायमखुष खरेदी विकीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकती निर्वेध, निजोखमी, असलेबाबत आमचे अशिलांना वर नमुद मिळकतधारकांनी खात्री व हमी दिलेली आहे.

सबब सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी विकी, तारण, गहाण, लीज, दान, पोटगी, बक्षीसपत्र, बँकेचा बोजा, वहीवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद पत्यावर संपर्क करून कागदपत्रांसह शहानिशा करून द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणाची कसलीही तकार नाही असे समजुन कायमखुष खरेदी विकीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तकार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कोणाची कसलीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ०३/०४/२०२६

सही/-
**ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ**
बी.ए., एलएल.बी. (स्पे.)
र. नं. महा. १८४४/२००७
रा. रेणुका निवास, कुंभार गल्ली, सांगोला
ता. सांगोला जि. सोलापूर मो.
७८७५७१९९०९
(अशिलातर्फे ॲड)

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमात लोकांस विशेषताः शहर सोलापूर व उत्तर सोलापूर येथील रहिवाश्यांना कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन : डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीतील मौजे 'कसबे सोलापूर' हद्दीतील जुना सर्व्हे नं. १५३/१अ पै यांसी नविन सर्व्हे नं. १५१/१अ पै यापैकी पद्मावती नगर मधील प्लॉट नं. २५० यासी सो.म.पा. मिळकत नं. ७०२३४८ या प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ १०५८.४६ चौ.फुट. व अथवा ९८.३७ चौ. मीटर इतकी खुली जागा असून यासी चतुःसीमा खालीलप्रमाणे :- पुर्वेस - प्लॉट नंबर २४१, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नंबर २४९, उत्तरेस - प्लॉट नंबर २५१ येणेप्रमाणे चतुःसोमेतील खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही श्री. अमरनाथ चंदुलालसा लोमटे राहणार, ५९०, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर यांचे मालकीच असून त्यांनी आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबूल करुन आमचे अशिलाकडून इसारा म्हणून काही रक्कम स्विकारुन वर नमूद मालकांनी आमचे अशिलास इसारा करारपत्र लिहून दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री वर नमूद मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे.

३) तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर कलम १ मधील नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकाराने हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, खरेदी विक्री, पोटगी, साठेखत, गहाणखत, वित्तीय संस्थेचा बोजा वगैरे स्वरुपाचा कोणत्याही प्रकाराने हक्क व हितसंबध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर नोंदवावी. जर सदर मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारने हरकत न आल्यास किंवा कोणाची असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले असे समजून आमचे अशिल सदर वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे. असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकाराने तक्रार चालणार नाही कळावे.

ही जाहीर नोटीस दिली ता. ०४/०४/२०२६.

सही/-
**ॲड. सागर एस. बासुतकर**
रा. १६१४, कुचन नगर,
दाजी पेठ, सोलापूर.
मो.नं. ७५०७५४७५६७

### जाहीर प्रसिध्दीकरण

आर.टि.एस.अपील नं. ६२/२०२५

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. यांचे कोर्टात**

**श्री. संतोष मल्लेशी सोनकांबळे** - **अपीलकार**
विरूध्द
**१) श्री. सतीश शंकर कदम**
**२) श्री. गुरूदास नागनाथ माने**
**३) श्री. प्रशांत कोळी**
**४) श्री. प्रकाश सिध्दपा लोखंडे**
**५) श्री. बाबुराव महादेव सलगर**
**६) श्री. शिवाजी लक्ष्मण सोनकांबळे**
— **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अपीलकार यांनी सामनेवाला यांचे विरूध्द मा. उपविभागीय अधिकारी, सोलापूर (दक्षिण) यांच्या कार्यालयात दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी आहे.

सदर अर्जामध्ये अर्जदार यांनी मौजे आलेगाव, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर येथील जमीन गट नं. ४९/१/ब क्षेत्र ४ हे ६८ आकार ४.५५ त्या अनुषंगाने तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र जा. क्र. जमा-२/कावि/९९२/२०२५ दि. २५/०४/२०२५ अन्वये त्यांचे कार्यालयात प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी सर्व संबंधितांना संधी देऊन दि. ११/०३/२०२५ रोजी सदरचे प्रकरण गुणवत्तेनुसार आदेशासाठी राखीव ठेवण्यात आलेचे नमूद करून या कार्यालयाकडील अंतरिम आदेश आरटीएस/अपील/६२/२०२५ दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशात नमूद सूचनेप्रमाणे अर्जदार श्री. संतोष सोनकांबळे यांनी या उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. २, सोलापूर यांचे कार्यालयात दिनांक १२/०६/२०२५ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १३८ अन्वये अनधिकृत / अतिक्रमण हटवण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्या अर्जास या कार्यालयामध्ये बी.एन.डी. १८७/२०२५ असा क्रमांक देण्यात आलेला आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने प्रकरणातील सर्व संबंधित पक्षकार यांना दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी सुनावणीची संधी देण्यात आलेली आहे.

दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले.

कोर्टाचा शिक्का

सही/-
**(सुमित शिंदे)**
**उपविभागीय अधिकारी,**
**सोलापूर क्र. २, सोलापूर**


# बेकायदेशीर प्रतिनियुक्ती रद्द करा; निलंबन मागे घ्या

## अन्यथा कट्टीमनींचा १४ एप्रिलला आत्मदहनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांच्या कथित बेकायदेशीर प्रतिनियुक्ती प्रकरणाने आता गंभीर आणि नाट्यमय वळण घेतले आहे. मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे तालुका अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी तब्बल ३८ दिवस उपोषण करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने संतप्त होत थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे. येत्या १४ एप्रिल रोजी मंत्रालय, मुंबई येथे आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

कट्टीमनी हे २३ फेब्रुवारीपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोरील पूनम गेट येथे उपोषणास बसले होते. मात्र दीर्घकाळ आंदोलन करूनही प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय न झाल्याने त्यांनी उपोषण स्थगित करत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला.

आमच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. मागासवर्गीय असल्यामुळेच अन्याय होत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे प्रकरणाला सामाजिक व राजकीय रंग चढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या वादाची सुरुवात सप्टेंबर २०२४ मध्ये दाखल केलेल्या तक्रारीपासून झाली. अक्कलकोट तालुक्यातील २१ शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी अधिकार नसताना केल्याचा कट्टीमनी यांचा आरोप आहे. २०१४ मधील अधिकार २०१७ मध्ये शासनाने विभागीय आयुक्तांकडे वर्ग केल्यानंतरही जुन्या नियमांच्या आधारे नियुक्त्या करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.


### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जाहिर आवाहन**

सोलापूर शहरातील सर्व संवर्गातील दिव्यांग लाभार्थ्यांना सोलापूर मनपा कडील कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालयाकडून उदरनिर्वाह भत्ता त्रैमासिक हा तीन महिन्यातून एकदा अदा केला जातो. तरी या जाहिर आवाहनाद्वारे सोलापूर शहरातील उदरनिर्वाह भत्ता घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांना कळविण्यात येते की, दि.०१/०४/२०२६ ते ३१/०५/२०२६ अखेर नविन अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने तसेच हयातीचे दाखले ऑफलाईन तसेच खालील विहीत नमुन्यामध्ये सोलापूर महानगरपालिकेमध्ये lwpro.solapurcorporation.org या संकेत स्थळावर जमा करण्याची दक्षता घेण्यात यावी.

हयातीचे दाखले कार्यालयातील वेळेत कामगार कल्याण कार्यालय सो.म.पा. येथे स्वीकारले जातील. ज्या लाभार्थ्यांचे दि. ३१/०५/२०२६ पर्यंत मुदतीत हयातीचे दाखले प्राप्त होणार नाहीत त्या लाभार्थ्यांचे हयातीचा दाखलाचा विचार केला जाणार नाही. याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

**सदर हयातीचा दाखला खालीलपैकी सक्षम अधिकारी / यांचेकडून साक्षांकित करुन घ्यावा.**

१) कार्यकारी दंडाधिकारी / नगरसेवक
२) राजपत्रित अधिकारी,
३) बँक मॅनेंजर
४) प्राथमिक / हायस्कूल मुख्याध्यापक

**खालील कागदपत्रे हयातीच्या दाखल्यासोबत जोडावेत.**

१) सो.म.पा कडील हयातीचा दाखला
२) दिव्यांग प्रमाणपत्र (Disability Certificate)
३) दिव्यांग यु.डी.आय.डी. कार्ड (UDID Card)
४) बँक पासबुक
५) १ फोटो

**उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**

**हयातीचा दाखला नमुना**
**हयातीचा दाखला**

फोटो

दाखला देण्यात येतो की,
श्री. श्रीमती./सौ.नाव- ---------------- पु/स्त्री/इतर ---------
राहणार :---------------------------------------, सोलापूर
जन्म तारीख दि. / / दिव्यांगाचे प्रकार :-_____टक्केवारी, _____ %
गइतर शासकीय योजनेचा लाभ घेता का? होय किंवा नाही
घेत असल्यास कोणत्या शासकीय योजनेचा लाभ घेता ________________
मोबाईल नं.:- ________________
दिनांक :- / /

**सही व शिक्का**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public in large that, The property mentioned in schedule hereunder is purchased by Rajkumar Pandit dkar by registered sale deed.

That, prior sale deed bearing R.E. No. 629/2002, dated 11-02-2002. That, the said sale deeds have been lost by Rajkumar Pandit Adkar. Now the original sale deeds are no available with him and accordingly he has filed missing complaint at Vijapur Naka Police Station, Solapur City bearing its Missing Online Registered Loss online Report dated 03/04/2026.

Our Client is going to take a loan from ICICI Home Finance Ltd, Br. Solapur by securing the mortgage. All persons or institutions having any claim or right in respect of the said property or any part thereof by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, exchange, trust, possession or encumbrance or otherwise howsoever are hereby required to inform the same in writing supported with the original documents to the undersigned at the address given below mentioned, within 7 days from the date of publication of this notice, failing which, the claim or claims, if any of such person, persons or institution/s shall be considered to have been waived and /or abandoned. Further, it is also hereby informed through this public notice that no one should deal with the said properties on the basis of the said properties on the basis of the said documents.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

District and sub District Solapur, Taluka Madha, within limits of Gram Panchayat Madha at Madha property bearing City Survey No. 964, Gram Panchayat House No. 1665,1019 1020 admeasuring area 74.70 Sq.mtr. it is bounded and surrounded by East: Birobha Devasthan, West :-Road, South:- Road, North:- City Survey No.965.

This Notice is issued on- 03/04/2026.

सही/-
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुर**
बी.ए., एलएल.बी., एम.एस.डब्ल्यु.,
डी.एम.सी.जे. ॲडव्होकेट
ऑफीस पत्ता. गाळा नं. १०, पहिला मजला,
दारुस्सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

### Classifieds

**पाहिजेत**

पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन, ऑफलाईन काम करून अधिक इन्कम मिळवा. संधी सार्वांसाठी. प्रियांका मॅडम मो. 9226340650

**विकणे आहे**

दुकान गाळा विक्री / भाड्याने देणे आहे. २२० स्क्वेअर फूट, निर्मिती लँडमार्क इंदिरा नगर, पोस्ट ऑफिसजवळ, रामलिंग नगर, विजापूर रोड, संपर्क - ९४२०५४४६४४

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### परिशिष्ट - ३

जलसंपदा विभाग शासन
निर्णय, क्रमांक निविदा
०४१७/प्र.क.२४७/मोप्र.-१
दिनांक : १८/१०/२०२३

**(ई- निविदेसाठी जाहिरात नमुना)**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांचे कार्यालय,**
**पत्ता - नविन मुठा कालव्याशेजारी, स्वारगेट, पुणे - ४११०३७.**
**ई मेल - eemd123@gmail.com दूरध्वनी क्रः- ०२०-२४२६६०११**
**ई निविदा सुचना क्रमांक २७ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदा किंमत (वस्तु सेवाकर व विमा वगळून) |
|---|---|---|---|
| १ | भीमा पाटबंधारे उपविभाग, तुगंत अंतर्गत उजनी डावा कालवा वरील काटनियामक द्वार सा.क्र. ९९/२८० (०.९ X १.२ मी. - १ नग) सा. क्र. १०५/९८० (१.२ X १.२ मी. २ नग) १०६/८६० (०.३ X ०.३ मी. १ नग) १०८/६६० (०.३ X ०.३ मी. १ नग), ११२/१२५ (०.६ X ०.६ मी. १ नग), ११३/३३८ (०.६ X ०.६ मी. १ नग), ११५/०६० (०.९ X ०.९ मी. २ नग), ११७/४०० (१ X १.२ मी. २ नग), ११८/४४६ (१ X १.२ मी. २ नग), १२०/५४५ (०.६ ४ ०.६ मी. १ नग), १२२/११० (०.६ X ०.६ मी. १ नग), ९४/५५० (१.३ X १.८ मी. २ नग), १०१/०७० (१.२ X १.२ मी. २ नग), ११०/९६० (as per site), १२५/९६० (as per site) इत्यादी द्वारांची व उच्चालकाची दुरुस्ती करणे. | सोलापूर | रु. ७२,३९,०४४/- |
| २ | भीमा पाटबंधारे उपविभाग, करकंब अंतर्गत उजनी डावा कालवा वरील शिर्षनियामक व्दारे सा. क्र. ७५/५३० (१.२ X १.२ मी. २ नग) ८६/१४० (१.३ X १.४ मी. २ नग), ९२/८०० (१.८५ X १.३५ मी. ३ नग) ९२/८०० (०/३८५) (१.२ X १.२ मी. ३ नग), काटनियामक द्वारे ९४/६०० (५.५ X ५ मी. ३ नग), ९२/८०० (०/३८५) (१ X १ मी. ३ नग), अतिवाहक द्वारे ८६/१३५ (१.६ X १.२ मी. १ नग), ९४/५५० (१.२ X १.२ मी. २ नग) द्वारांची व उच्चालकाची दुरुस्ती करणे. | सोलापूर | रु. ५१,७०,३०७/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दि ०७/०४/२०२६ वेळ : ११.०० ते दि : १५/०४/२०२६ वेळः १८.००
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक :** दिनांक १७/०४/२०२६ वेळः १२.०० (शक्य झाल्यास)

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील. खालील संकेतस्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

जा.क्र. ९१३ दिनांक २७/०३/२०२६
कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग
क्र.२ पुणे, ३७

शिक्का

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग क्र.२, पुणे-३७**

**विमाका/पुणे/जाहि/२/२०२६-२७**

# आयपीएलचा थरार



## महत्त्वाचे

### लिन यु-टिंग आशियाई मुष्टियुद्धाच्या उपांत्य फेरीत

**उलानबातर** : वर्ल्ड बॉक्सिंगने लिंग निश्चितीसाठी केलेली जनुकीय चाचणी तिने उत्तीर्ण केल्याचे सांगितल्यानंतर, ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती लिन यु-टिंगने शुक्रवारी आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीचा सामना जिंकला आणि उपांत्य फेरीत धडक मारली. तैवानच्या पहिल्या ऑलिम्पिक बॉक्सिंग चॅम्पियनने या आठवड्याच्या सुरुवातीला ६०-किलोग्राम लाइटवेट गटात थायलंडच्या थानाऱ्या सोमनुएकला पहिल्या फेरीत ५-० ने हरवले होते. शुक्रवारी तिने या गटातील अव्वल मानांकित महिला खेळाडू, जपानच्या आयाका तागुचीवर आणखी एक ५-० ने विजय मिळवून आपल्या कामगिरीची पुनरावृत्ती केली. ३० वर्षीय लिनने ऑगस्ट २०२४ मध्ये पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५७ किलो फेदरवेट गटाचे विजेतेपद जिंकल्यापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा केली नव्हती.




## गुजरातच्या गोलंदाजांची गाठ वैभव सूर्यवंशीशी

◆ **अहमदाबाद, ३ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी सायंकाळी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स व राजस्थान रॉयल्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. गुजरातने आपला सलामीचा सामना गमावला आहे, तेव्हा ते पहिल्या विजयासाठी उत्सुक असतील, तर तिकडे राजस्थान रॉयल्स आपल्या विजयाची लय कायम ठेवण्यास उत्सुक असेल.

कॅगिसो रबाडा, प्रसिध कृष्णा व मोहम्मद सिराज यांचा समावेश असलेले वेगवान गोलंदाजांचे आक्रमण जरी भेदक वाटत असले, तरी राजस्थान रॉयल्सचा वंडर बॉय वैभव सूर्यवंशी याचा सामना करताना या त्रिकुटासमोर मोठे आव्हान असेल. वैभव कांडच्या दुसऱ्या


शुभमन गिल


रियान पराग

पर्वाची सुरुवात या १५ वर्षीय खेळाडूने चेन्नई सुपर किंग्सच्या गोलंदाजीवर १५ चेंडूंत ५० धावा ठोकून केली आहे. शनिवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर वैभव पुन्हा एकदा आक्रमक फलंदाजी करण्याचा प्रयत्न करेल, पण त्याला रबाडा, सिराज व प्रसिधसारखे तीन आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या गोलंदाजांचा सामना करावा लागेल. प्रेक्षकही या फलंदाजीच्या ध्वजवाहकाची कसोटी पाहण्यास उत्सुक असतील.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल मुल्लानपूरमधील सलामीच्या सामन्याप्रमाणे काही अधिक विवेकपूर्ण निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे. त्या सामन्यात सिराजला केवळ दोन षटके देण्यात आली व प्रसिधला तब्बल १३ व्या षटकात गोलंदाजीसाठी आणले होते.

नरेंद्र मोदी स्टेडियमची खेळपट्टी तसेच फलंदाजीसाठी नंदनवन आहे. आतापर्यंतच्या स्पर्धेत धावांचा पाठलाग करण्याचा कल राहिला आहे. राजस्थान रॉयल्सकडे नांद्रे बर्गर व जोफ्रा आर्चर हे दोन वेगवान गोलंदाज असल्यामुळे गिल, साई सुदर्शन व जोस बटलरला काळजीपूर्वक खेळावे लागणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## दिल्लीच्या अव्वल फळीकडून स्थैर्याची अपेक्षा

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी येथे दिल्ली कॅपिटल्स व मुंबई इडियन्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. हंगामातील आपल्या पहिल्याच घरच्या सामन्यात खेळताना दिल्ली कॅपिटल्सला अव्वल फळीतील फलंदाजांकडून स्थैर्याची अपेक्षा आहे. सर्वांचे लक्ष दिल्लीच्या पहिल्या फळीतील फलंदाजांच्या कामगिरीवर असेल. दिल्ली कॅपिटल्स अजूनही आपल्या पहिल्या आयपीएल विजेतेपदासाठी प्रयत्नशील आहे.

गत वर्षी दिल्लीला सलामीच्या जोड्यांमध्ये तब्बल सात वेळा बदल करण्यात आला होता, परंतु अलिकडच्या सलामीच्या सामन्यावरून असे दिसते की, ही समस्या अजूनही कायम आहे.

या हंगामात लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध १४२ धावांचे माफक आव्हान गाठताना दिल्ली कॅपिटल्सची अव्वल फळी झपाट्याने कोसळली. केएल राहुल पहिल्याच चेंडूवर शून्यावर बाद झाला, तर नितीश राणा


अक्षर पटेल


हार्दिक पांड्या

व पाथुम निसंका सुद्धा एका पाठोपाठ बाद झाले, त्यामुळे संघाची अवस्था ४ बाद २६ अशी बिकट झाली होती. मात्र, त्यानंतर २२ वर्षीय इम्पॅक्ट खेळाडू) समीर रिझवीने संयम व परिपक्वतेने खेळ केला व नाबाद अर्धशतक झळकावले. अनुभवी ट्रिस्टन स्टब्सच्या साथीने अभेद्य भागीदारी रचत संघाला ६ गडी राखून विजय मिळवून दिला.

दिल्ली कॅपिटल्सच्या फलंदाजीच्या अव्वल फळीतील कमकुवतपणा ही चिंतेची बाब आहे. जसप्रीत बुमराहसारख्या दिग्गज गोलंदाजाच्या नेतृत्वाखालील मुंबईच्या गोलंदाजी आक्रमणाला दिल्लीचा संघ कसा सामोरे जातो हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### आजचे सामने

**दिल्ली कॅपिटल्स वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

**गुजरात टायटन्स वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** स्टार स्पोर्ट्सवर

अव्वल फळीतील स्थैर्यासाठी दिल्लीकडे दोन पर्याय उपलब्ध आहे. एक अभिषेक पोरेल व दुसरा म्हणजे पृथ्वी शॉ.

याउलट, दिल्ली कॅपिटल्सची गोलंदाजी फळी मात्र अधिकच भक्कम व आत्मविश्वासपूर्ण दिसते. विशेषतः ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कच्या अनुपस्थितीतही दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज लुंगी नगिदी अत्यंत चातुर्याने गोलंदाजी करीत आहे. टी. नटराजनने लखनौविरुद्धच्या सामन्यात ३ बळी घेत मोलाचे योगदान दिले, तर मुकेश कुमारने अत्यंत काटकसरीने गोलंदाजी केली. कुलदीप यादव व कर्णधार अक्षर पटेल या फिरकी गोलंदाजांच्या जोडीने प्रतिस्पर्ध्यांवर दबाव निर्माण केला व त्यांना मोकळेपणाने खेळण्याची कोणतीही संधी दिली नाही.

वेगवान गोलंदाजीतील वैविध्य व फिरकी गोलंदाजीवरील नियंत्रण यांचा हा सुरेख मेळ दिल्ली कॅपिटल्ससाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. विशेषतः रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व तिलक वर्मा यांसारख्या धडाकेबाज फलंदाजांनी भरलेल्या मुंबई इंडियन्सची फलंदाजी मजबूत आहे. कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध एका विक्रमी धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केल्यानंतर मुंबई इंडियन्स अत्यंत आत्मविश्वासाने या सामन्यात उतरेल. सलामीचा जोडीदार रायन रिकेल्टनने ८१ धावांची आक्रमक खेळी करत रोहितला भक्कम साथ दिली. त्यामुळे त्याचे संघातील स्थान कायम राहण्याची दाट शक्यता आहे. ◂(वृत्तसंस्था)

## जिल्हा व्हॉलीबॉल संघ निवड चाचणी उद्या ह.दे.च्या मैदानावर

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

वरिष्ठ गट राज्य व्हॉलीबॉल स्पर्धा नागपूरला ९ ते १२ एप्रिल दरम्यान होणार आहेत. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा पुरुष व महिला संघ निवड चाचणी अजिंक्यपद स्पर्धा रविवारी, ५ एप्रिलला सायंकाळी ५ वाजता हरिभाई देवकरण प्रशालेत होणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघानी या निवड चाचणी भाग घेण्यासाठी अनिल गिराम (मो. ९४२२४५८०३५) यांच्याकडे नोंदणी करावी, असे आवाहन अध्यक्ष दिपक मुनोत व सचिव सुदेश मालप यांनी केले आहे.

## पंतप्रधान मोदींनी केली संजू सॅमसनच्या विश्वचषकातील पराक्रमाची प्रशंसा

तिरुवनंतपुरम् : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टी- २० विश्वचषकातील संजू सॅसनच्या उत्कृष्ट कामगिरीची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

भारताच्या विजयातील सॅसनची महत्त्वाची भूमिका, तसेच दबावाखाली असताना त्याने दाखवलेली एकाग्रता आणि जिद्द यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. शुक्रवारी केरळमधील कार्यकर्त्यांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचा स्टार फलंदाज संजू सॅसनच्या २० विश्वचषकातील पराक्रमी कामगिरीची प्रशंसा केली. सॅसनने उपांत्य व अंतिम सामन्यासह सलग तीन अर्धशतके झळकाविण्याचा विक्रम केला. त्याच्या या कामगिरीच्या जोरावरच भारताने टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले आणि त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. भारतासाठीच्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यांदरम्यान सॅसनची एकाग्रता, आत्मविश्वास आणि जिद्द कशा प्रकारे शिखरावर पोहोचली होती. जेव्हा संघाला त्याची सर्वाधिक गरज असते, तेव्हाच आपली सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खऱ्या खेळाडूची लक्षणे त्याने आपल्या कृतीतून सिद्ध केली, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. आज क्रिकेटचा हंगाम सुरू आहे व केरळच्या लोकांसाठी यात शिकण्यासारखा एक महत्त्वाचा धडाही आहे. जेव्हा संघाला त्याची सर्वाधिक गरज होती, तेव्हाच त्याने आपली सर्वोत्तम कामगिरी करून दाखवली. हीच खऱ्या खेळाडूची खरी ओळख आहे, असेही त्यांनी नमूद केले.


नववे स्थान मिळविणारा यजमान छत्तीसगडचा संघ

## कर्नाटक सर्वसाधारण विजेते; छत्तीसगड नवव्या स्थानी

### खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धा

◆ **रायपूर, ३ एप्रिल**

पहिल्या खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेत २३ सुवर्णपदके जिंकून कर्नाटक संघ सर्वसाधारण विजेता ठरला. या स्पर्धेच्या अंतिम दिवशी, झारखंडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व माजी जागतिक कनिष्ठ विजेती असलेल्या कोमलिका बारीने रिकर्व्ह महिला तिरंदाजी प्रकारात जिंकलेले सुवर्णपदक हे या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले. ओडिशाच्या अर्जुन खाराने रिकर्व्ह पुरुष गटात सुवर्णपदक जिंकले.

२३ सुवर्णपदकांशिवाय कर्नाटकने आठ रौप्य आणि सात कांस्यपदकेही जिंकली आणि सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळविला. ओडिशा संघ २१ सुवर्ण, १५ रौप्य आणि २१ कांस्यपदकांसह दुसऱ्या स्थानी राहिला. ५० पदकांचा टप्पा ओलांडणारा ओडिशा हा एकमेव संघ ठरला; त्यांनी एकूण ५७ पदके जिंकली. १६ सुवर्ण, आठ रौप्य आणि ११ कांस्यपदकांसह झारखंड संघ तिसऱ्या स्थानी राहिला.

यजमान छत्तीसगड संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत तीन सुवर्ण, १० रौप्य आणि सहा कांस्यपदके जिंकली आणि ते पदकतालिकेत नवव्या स्थानी राहिले.

सर्वसाधारण विजेत्या कर्नाटक संघाने स्पर्धेच्या पहिल्या दिवसापासूनच पदकतालिकेत आघाडी घेतली होती. जलतरण स्पर्धेत त्यांनी वर्चस्व गाजवत १५ सुवर्ण, पाच रौप्य आणि तीन कांस्यपदके जिंकली. त्यानंतर ॲथलेटिक्समध्ये पाच आणि कुस्तीमध्ये तीन सुवर्णपदकांची भर घातली.

महाराष्ट्राने सहा सुवर्ण, १० रौप्य आणि चार कांस्य पदकांसह चौथे स्थान पटकावले, तर अरुणाचल प्रदेशाने सहा सुवर्ण, एक रौप्य आणि चार कांस्य पदकांसह अव्वल पाचमध्ये स्थान निश्चित केले.

या स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीत ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी सहभाग घेतला होता. यामध्ये नऊ क्रीडा प्रकारांतून सुमारे ३८०० खेळाडूंनी आपले कौशल्य पणास लावले.

तिरंदाजी, ॲथ्लेटिक्स, फुटबॉल, हॉकी, जलतरण, भारोत्तोलन आणि कुस्ती या क्रीडा प्रकारांमध्ये तब्बल १०६ सुवर्णपदके होती. मल्लखांब आणि कबड्डीसारखे पारंपरिक खेळ केवळ प्रात्यक्षिक म्हणून सादर करण्यात आले होते. ◂(वृत्तसंस्था)

## राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी मित्र क्रीडा मंडळाच्या तीन मुली विदर्भ संघात

◆ **पांढरकवडा, ३ एप्रिल**

पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे २ ते ४ एप्रिल दरम्यान होत असलेल्या ३५ व्या राष्ट्रीय कबड्डी सब ज्युनिअर स्पर्धेसाठी येथील मित्र क्रीडा मंडळाच्या तीन मुलींची विदर्भ संघात निवड करण्यात आली आहे.



खुशी संजय मडावी, जान्हवी संजय कन्नलवार व अनुष्का सुनील जाधव यांची विदर्भ संघात निवड करण्यात आली असून यातील खुशी मडावी विदर्भ संघाची कर्णधारसुद्धा आहे.

मित्र क्रीडा मंडळ सात दशकांपासून कबड्डी, खो-खो व कुस्तीचे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार करत आहे. या मंडळाच्या वतीने प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासह त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठीसुद्धा प्रयत्न करण्यात येतो.

मित्र क्रीडा मंडळाच्या अनेक खेळाडूंची दरवर्षी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड होत असते. कबड्डीसाठी निवड झालेल्या खुशी मडावी, जान्हवी कन्नलवार, अनुष्का जाधव ह्या खो-खोच्यासुद्धा राष्ट्रीय खेळाडू आहेत हे विशेष.

या खेळाडूंनी आपल्या निवडीचे श्रेय विदर्भ कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, उपाध्यक्ष प्रफुल देशमुख, सचिव प्रदीपसिंह ठाकूर, मित्र क्रीडा मंडळाचे संस्थापक उपाध्यक्ष गोपाळ बिसेटवार, अध्यक्ष मदन जिड्डेवार, सचिव सुनील कोपुलवार, संचालक गणपत डोंगरे, अशोक कुमरे यांना दिले आहे.

या खेळाडूंना मंडळाचे प्रशिक्षक रवी दर्शनवार यांचे मार्गदर्शन लाभले असून त्यांचे राम कुमरे, ओमेश दर्शनवार, संजय औदार्य, राम जिड्डेवार, अजय कुमरे, आशुतोष जाधव, धीरज रेड्डीवार, सौरभ बेले, सुविधी कोपुलवार यांनी अभिनंदन केले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## पंच-निर्णयावर नाराजी व्यक्त केल्याबद्दल अभिषेकला दंड

◆ **कोलकाता, ३ एप्रिल**

सनरायझर्स हैदराबादचा उपकर्णधार अभिषेक शर्माला येथे कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध झालेल्या सामन्यादरम्यान आयपीएल आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी त्याला २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे तसेच त्याच्या खात्यावर एक डिमेरिट पॉइंट (दोषगुण) देखील जमा करण्यात आला आहे.

त्याने आचारसंहितेच्या कलम २.३ अंतर्गत येणारा स्तर १ ( १) दर्जाचा गुन्हा केल्याचे मान्य केले आणि सामनाधिकाऱ्याने सुनावलेली शिक्षा स्वीकारली. आचारसंहितेच्या स्तर १ दर्जाच्या उल्लंघनांच्या बाबतीत, सामनाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतो. त्याने २१ चेंडूंत ४८ धावांची आक्रमक खेळी करत, पॉवरप्लेमध्येच हैदराबादला सामन्यात दमदार सुरुवात करून दिली. अभिषेकने फलंदाजीमध्ये मोलाची


अभिषेक शर्मा

कामगिरी बजावली व आयपीएल २०२६ मधील हैदराबादला पहिला विजय मिळवून देण्यात हातभार लावला. या सामन्यात हैदराबादने ६५ धावांनी दणदणीत विजय नोंदवला. मात्र, नवव्या षटकात वरुण चक्रवर्तीने झेपावत घेतलेल्या झेलबाबत, टीव्ही पंच नितीन मेनन यांनी दिलेल्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. ◂(वृत्तसंस्था)

## झील देसाई उपांत्य फेरीत

**छत्रपती संभाजीनगर** : येथे शुक्रवारी पार पडलेल्या छत्रपती संभाजीनगर ओपन एन्ड्युरन्स महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत द्वितीय मानांकित भारतीय खेळाडू झील देसाईने प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत झीलने आपलीच देशबांधव जेनिफर लुईखामचा पराभव केला. १ तास १३ मिनिटे चाललेल्या या सामन्यात ६-३, ६-१ अशा गुणांनी विजय मिळवित झीलने स्पर्धेतील अव्वल चार खेळाडूंमध्ये स्थान पक्के केले. उपांत्य फेरीत तिचा सामना चौथी मानांकित रशियन खेळाडू एलिना नेप्लीयशी होईल. नेप्लीयने उपांत्यपूर्व फेरीत सहावी मानांकित खेळाडू झेनिया लास्कुतोवाचा ६-२, ६-३ अशा गुणांनी पराभव केला होता. बोस्निया आणि हर्जेगोविनाची खेळाडू टी कोवासेविच हिने, सातवी मानांकित खेळाडू एलिना जमशिदीचा ५३ मिनिटांतच ६-१, ६-१ अशा एकतर्फी गुणांनी पराभव करत दणदणीत विजय नोंदवला. उपांत्य फेरीत कोवासेविचचा सामना, अव्वल मानांकित कझाकस्तानची खेळाडू झिबेक कुलांबायेवाशी होईल. कुलांबायेवाने भारतीय वाईल्डकार्ड प्रवेशिका मधुरिमा सावंत हिची विजयी मालिका खंडित करत, अवघ्या ५५ मिनिटांतच ६-१, ६-० अशा गुणांनी तिचा पराभव केला.

## गोलंदाजीतील सुधारणेचे श्रेय एका खास व्यक्तीला : नितीश रेड्डी

◆ **कोलकाता, ३ एप्रिल**

सनरायझर्स हैदराबादचा भारतीय अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी याने, दुखापतींनी ग्रासलेल्या एका कठीण टप्प्यानंतर गोलंदाजीतील आपला सूर पुन्हा गवसण्यास मदत केल्याबद्दल एका 'खास व्यक्तीला' श्रेय दिले आहे; मात्र त्याने त्या व्यक्तीची ओळख सध्या तरी गुलदस्त्यातच ठेवणे पसंत केले आहे.

या हंगामापूर्वी मला स्वतःसाठी थोडा वेळ मिळाला. एका विशिष्ट व्यक्तीसोबत केलेल्या एका आठवड्याच्या सरावादरम्यान माझी कामगिरी खूपच चांगली झाली. त्या सरावाचा मला खरोखरच खूप फायदा झाला आणि त्या व्यक्तीने मला जे काही सांगितले होते, ते सर्व अगदी योग्य आणि संयुक्तिक वाटले. त्यामुळे, आता सर्व काही सुरळीत सुरू आहे, असे रेड्डीने आयपीएल सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सवर मिळवलेल्या विजयानंतर, सामनावीर पुरस्कार स्वीकारताना सांगितले. ती ओळख मी नंतर कधीतरी उघड करेन, असे तो म्हणाला.



सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये खेळणाऱ्या या २२ वर्षीय नितीश कुमार रेड्डीकडे भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज-अष्टपैलू हार्दिक पांड्याचा संभाव्य वारसदार म्हणून पाहिले जाते. मात्र, गत वर्षभरात वारंवार उद्भवणाऱ्या तंदुरुस्तीच्या समस्यांमुळे त्याच्या प्रगतीला खीळ बसली होती.

अनेक अडथळ्यांमुळे २०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीच्या काळात त्याला मैदानावर खेळण्याची महत्त्वाची संधी गमावावी लागली. ◂(वृत्तसंस्था)

## वायजी ग्रुप, थंडरचे दिमाखदार विजय

### इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीगः प्रभुराज चितापुरे, जुबेर तांबोळी सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम (रेल्वे मैदान) वर सुरू असलेल्या १६व्या इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीगमध्ये वायजी ग्रुप आणि थंडर या संघांनी आपापल्या सामन्यांत दिमाखदार विजय मिळवले.

पहिल्या सामन्यात वायजी ग्रुपने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. ग्लोबल संघाने १२ षटकांत ५ बाद ९२ धावा केल्या. प्रत्युत्तरात वायजी ग्रुपने अवघ्या ९.४ षटकांत ४ बाद ९४ धावा करत ६ गडी राखून विजय मिळवला. अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या जुबेर तांबोळीला (४३ धावा व १ बळी) 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात रॉयल इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. त्यांनी १२ षटकांत ६ बाद ७९ धावा केल्या. हे आव्हान आयएमएस थंडर संघाने १०.४ षटकांत २ बाद ८० धावा करत ८ गडी राखून सहज पूर्ण केले. प्रभूराज चितापुरे याला त्याच्या अष्टपैलू खेळासाठी (२० धावा आणि २ बळी) 'सामनावीर' घोषित करण्यात आले.


प्रभुराज चितापुरे


जुबेर तांबोळी

**संक्षिप्त धावफलकः ग्लोबलः** १२ षटकांत ५ बाद ९२ धावा. (अमित झंकारम ३२, सुनील कत्ते २२, इस्माईल पिरजादे २२ नाबाद, जुबेर तांबोळी १-२, कुमार केंगनाळकर१-१०, सुधीर पेंडसे १-१५ ) **पराभूत विरुद्ध वायजी ग्रुपः** ९.४ षटकांत ४ बाद ९४ धावा. (जुबेर तांबोळी ४३, उमेश रावलानी २५, आशिष कटारे नाबाद ९, सुनील कत्ते १-१७, जावेद पटेल १-९, सचिन गोरे १-११).

**रॉयल इंडियन्सः** १२ षटकांत ६ बाद ७९ धावा. (सत्यकिरण वडनाल ३०, राघवेंद्र जोशी १२, प्रभूराज चितापुरे २-८, इम्तियाज शेख १-६, गुंडुराज १-९, सचिन गायकवाड १-१०) **पराभूत विरुद्ध थंडरः** १०.४ षटकांत २ बाद ८० धावा. (गजानन पिलगुलवार ३५ नाबाद, प्रभूराज चितापुरे २०, गुंडुराज ११, अजिंक्य कुलकर्णी १-१३, हरिष कुलकर्णी १-३).

## बार्शीत उद्या विश्वरत्न चषक बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ एप्रिल-**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त संघमित्रा बहुउद्देशीय सामाजिक संस्था व समता बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने ५ एप्रिल रोजी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन येथील कुडूवाडी रोडवरील मातृमंदिर मंगल कार्यालय ढगे मळा, येथे करण्यात आले आहे. ही स्पर्धा खुल्या गटासह १५, १० व ७ वर्षाखालील अशा ४ गटामध्ये खेळवण्यात येणार आहे.

तसेच प्रत्येक गटामध्ये ९ आकर्षित पारितोषिके ठेवण्यात आली आहेत व त्याच बरोबर विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी, मेडल व रोख रक्कम ही देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी व स्पर्धेत भाग घेण्यासाठी महेश कांबळे मो. नं. ९०२१३५९८५६ अथवा अतुल नलगे मो. नं. ७८४०९६४०७८ यांच्याशी संपर्क साधावा.

## चिन्मय शाह यांनी २२० किमीची व्हाईट सँड अल्ट्रा ३४ तासांत केली फत्ते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

गुजरातमधील कच्छच्या रणात येथील आर्किटेक चिन्मय शाह यांनी २२० किमीची व्हाईट सँड अल्ट्रा ३४ तासांत पूर्ण करून सहावे स्थान मिळविले.


त्यांनी ''एका वेळी फक्त १ किमी'' हे सूत्र वापरून ३४ तास म नावर ताबा ठेवला. दिवसा अंगाची लाहीलाही करणारी उष्णता आणि रात्रीचे हाडं गोठवणारे तापमान असताना शेवटच्या ३० किमीच्या रोड टू हेवनवर धावताना क्षितिज न दिसल्यामुळे वारंवार होणारे भास, बॉर्डर अल्ट्रा १६१ किमी आणि स्टेडियम रन १८३ किमी नंतरचे हे सर्वात मोठे वैयक्तिक आव्हान होते. ते इतर लोकांना मॅरेथॉनमध्ये यशस्वीपणे सहभागी होण्यासाठी प्रशिक्षित करतात. त्यासाठी संपर्क (९५११८९३३६८).

### कारकिर्दीचा आलेख

**एकूण शर्यतीः** ११६
**एकूण पोडियम (विजेतेपदे):** ३७
**अल्ट्रा टप्पे:** १०० किमी (४ वेळा), १५० किमी (३ वेळा), २००+ किमी (१ वेळ).

### आई व भावाच्या पाठिंब्यामुळे शक्य

''अशक्य वाटणाऱ्या ध्येयावर जिद्दीने मात करणे हाच या प्रवासाचा उद्देश होता.'' भाऊ व आईच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले, अशा शब्दांत चिन्मय शाह यांनी आपला अनुभव व्यक्त केला.


आर्किटेक चिन्मय शाह

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### रक्तदानातून पवनपुत्रास वंदन

**गीतगंगा सोशल फाउंडेशनचा उपक्रम**

**सोलापूर, दि.३ एप्रिल-**

रक्ताला जात, धर्म किंवा पंथ नसतो; तो केवळ माणुसकीचा रंग असतो. विज्ञानाने मोठी प्रगती साधली असली तरी आजही प्रयोगशाळेत रक्ताचा एक थेंब कृत्रिमरीत्या तयार करता आलेला नाही. त्यामुळे प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने रक्तदान करावे, असे आवाहन सुप्रसिद्ध सरकारी वकील तथा सीबीआय कौन्सिल ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी केले. ते गीतगंगा सोशल फाउंडेशनच्या वतीने श्री. हनुमान जयंतीचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, सोलापूर महानगरपालिका स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, विद्यमान नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, राजकुमार पाटील, प्रथमेश कोटे, माजी नगरसेवक सुरेश पाटील, अशोक संकलेचा, चंद्रकांत कंची, नितीन शेजुळ, चन्नेश इंडी, रवी कोटा, विनायक मादम, चंद्रकांत जक्कन, राज कनकी, सचिन जाधव, रत्नाकर नक्का, सागर अतनुरे, पप्पू क्षीरसागर, सतीश सिरसुला, दत्तात्रय बडगु, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, आकाश गायकवाड, संतोष गडगडे, कल्पना गडगडे, सुनीता पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. यावेळी २५ भाविकांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे स्वागत चंद्रकांत कंची यांनी केले, प्रास्ताविक व्यंकटेश कंची यांनी मांडले. सूत्रसंचालन स्वयंम कंची यांनी केले तर आभार वेणूगोपाल उत्तूर यांनी केले.

### टेंभुर्णीत उद्यापासून भाजपा पदाधिकाऱ्यांचा पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण वर्ग

**टेंभूर्णी, दि. ३ एप्रिल-**



टेंभुर्णी (ता. माढा) भारतीय जनता पक्षाच्या वतीने माढा पश्चिम मंडलातील पदाधिकाऱ्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ४ व ५ तारखेला टेंभुर्णी येथे हा दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडणार आहे. महाराष्ट्रभर सुरू असलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण अभियानाचा हा एक महत्त्वाचा भाग असून, पक्ष संघटन अधिक सक्षम व सशक्त करण्याच्या दृष्टीने या उपक्रमाचे विशेष महत्त्व असल्याचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांनी सांगितले. या प्रशिक्षण शिबिरात संघटन मंत्री मकरंद देशपांडे, सहसंघटन मंत्री योगेशजी बाचल, सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, माढा भाजपा नेते रणजितसिंह शिंदे यांच्यासह सरचिटणीस व संयोजक सचिन शिंदे, गणेश चिवटे, सहसंयोजक दत्तात्रेय जाधव तसेच प्रदेश व जिल्हास्तरीय मान्यवर वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. या प्रशिक्षण वर्गात प्रदेश, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख, नवनियुक्त जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच नगरसेवक सहभागी होणार आहेत. पक्षाची कार्यपद्धती, ध्येय-धोरणे, उद्दिष्टे, विचारधारा, संघटन बळकटीकरण आणि पक्ष शिस्त या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. या निवासी प्रशिक्षण शिबिरामुळे कार्यकर्त्यांना पक्षाची भूमिका अधिक स्पष्ट होऊन संघटनात्मक कामात गती येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. तसेच सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांनी या प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राहून यशस्वी करावे, असे आवाहन तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांनी केले आहे.


### शेतात घुसून शेळ्या-बोकड पळविले; शेतकऱ्याला मारहाण करत रोख रक्कमही लंपास

**बार्शी, दि. ३ एप्रिल-**

तालुक्यातील चिखर्डे गावच्या शिवारात शेतात घुसून तीन अज्ञात व्यक्तींनी शेतकऱ्याला मारहाण करत शेळ्या, बोकड व रोख रक्कम लुटल्याची घटना घडली आहे. याबाबत रितेश पांडुरंग मोहिते (वय २१, रा. चिखर्डे, ता. बार्शी) यांनी पांगरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, त्यांचे शेत चिखर्डे गावातील जामगावकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यालगत असून, तेथे पत्र्यांच्या शेडमध्ये शेळ्या व बोकड बांधले जातात. तसेच तेथेच ते रात्री मुक्कामासाठी राहत असतात. दि. ३० मार्च रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता ते नेहमी प्रमाणे शेडमध्ये झोपण्यासाठी गेले असताना मोटारसायकलवरुन तीन अज्ञात इसम तेथे आले. त्यांनी शेडमध्ये घुसून दावणीला बांधलेल्या दोन शेळ्या व एक बोकड घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी रितेश मोहिते यांनी विरोध केला असता संशयित आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व 'गप्प बस, नाहीतर जिवे मारु' अशी धमकी दिली. भीतीमुळे त्यांनी विरोध थांबवला. त्यानंतर आरोपींनी दोन शेळ्या व एक बोकड जबरदस्तीने नेले. तसेच त्यांच्यापैकी एका इसमाने फिर्यादीच्या शर्टच्या खिशातील २ हजार रुपये रोख रक्कमही काढून घेतली. दोन आरोपी मोटारसायकलवरुन जनावरे घेऊन पसार झाले, तर एक आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला.

## निधन वृत्त...


### रवींद्र गुंडेटी



**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

नवनाथ नगर येथील रहिवासी रवींद्र बुमया गुंडेटी (५१वर्षे ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, असा परिवार आहे.

### निर्मला देशमुख



**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

जुळे सोलापूर, भीमा नगर मधील रहिवासी निर्मला आनंद देशमुख (वय-८६) यांचे दि.२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या जुळे सोलापूर शाखेतील अधिकारी अतुल देशमुख यांच्या त्या मातोश्री होत.

# नीरा देवघर सिंचन प्रकल्प रखडला

**पीआयबी बैठकीला अद्याप नवी तारीख नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ एप्रिल-**



माढा लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाच्या नीरा देवघर सिंचन प्रकल्पाबाबत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लोकसभेत लेखी प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

खासदार मोहिते-पाटील यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांमध्ये महाराष्ट्रातील नीरा देवघर सिंचन प्रकल्पास आर्थिक मान्यता देण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता काय?

तसेच या प्रस्तावाच्या परीक्षणासाठी PIB ची बैठक निश्चित करण्यात आली होती काय? असल्यास, त्याचा तपशील काय आहे आणि संबंधित मंत्रालयाच्या विनंतीवरून ही बैठक पुढे ढकलण्याची कारणे काय होती? पीआयबी बैठकीसाठी नवीन तारीख निश्चित करण्यात आली आहे काय? तसेच या संदर्भात कोणताही पाठपुरावा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय? त्याचबरोबर विशेषतः माढा लोकसभा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वेळेवर सिंचन सुविधा मिळाव्यात यासाठी निरा देवघर सिंचन प्रकल्पास मान्यता मिळवून देण्याकरिता मंत्रालयाकडून कोणती ठोस पावले उचलण्यात येत आहेत? यावर केंद्र सरकारच्या वतीने उत्तर देताना केंद्रीय जल शक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी लेखी उत्तर दिले की, नीरा देवघर सिंचन प्रकल्पाचा सुमारे ३,५९१.४६ कोटी खर्चाचा प्रस्ताव PMKSY-IBP योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक मंडळाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाच्या परीक्षणासाठी ७ जून २०२४ रोजी बैठक निश्चित करण्यात आली होती. मात्र ही बैठक पुढे ढकलण्यात आली असून, अद्याप नवीन तारीख निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच या प्रकल्पाच्या संदर्भात पुढील प्रक्रिया PIB च्या मूल्यांकन व शिफारशींनंतरच होणार असल्याचेही सरकारने लेखी उत्तर देत स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या या उत्तरामुळे निरा देवघर सिंचन प्रकल्पाची मंजुरी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाले असून, माढा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सिंचन सुविधेसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे चित्र आहे.

# सोलापूर विजयपूर महामार्गावर काट्यांचे साम्राज्य

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३ एप्रिल-**



सोलापूर - विजयपूर महामार्गावरील सोरेगाव ते हत्तुर दरम्यान असणाऱ्या दुभाजकांमध्ये मोठ्या प्रमाणात काटेरी झाडांचे साम्राज्य वाढले असून यामुळे वाहन चालकांना जखमा होत आहेत. याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. दुभाजकावरील काटेरी झाडे काढण्यात यावे अन्यथा राष्ट्रीय महामार्गा कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा वाहन चालकांनी दिला आहे.

सोलापूर-विजयपूर महामार्गावरील सोरेगाव ते हत्तुर पर्यंत असणाऱ्या दुभाजकामध्ये फुलांची झाडे लावण्यात आली आहेत. मात्र ज्या ठिकाणी फुलझाडे नाहीत त्या ठिकाणी काटेरी बाभळीची झाडे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. त्यामुळे दुभाजका जवळून जाणाऱ्या वाहन चालकांना या काटेरी झाडांचा त्रास होत आहे. दुभाजकालगत वाहन घेऊन जाताना काट्यांचा त्रास होत असून अनेक लहान मुलांना या काट्यामुळे जखमा झाले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाने या रस्त्यावरील काटे काढण्यासाठी आदेश देण्याची मागणी करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाचे दुर्लक्ष**



सोरेगाव ते हत्तुर चार किलोमीटरपर्यंत असणाऱ्या दुभाजकामध्ये मोठ्या प्रमाणात काटेरी झाडे वाढली आहेत. दुचाकीस्वार व वाहन चालकांना याचा त्रास होत आहे. रस्त्यावर वाहनांची गर्दी असताना दुभाजकाजवळ दुचाकी गेल्यावर लहान मुलांना जखम झाली आहे . त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाने त्वरित काटेरी झाडे काढून टाकावे. अन्यथा त्यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

**- भीमाशंकर बबलेश्वर,**
**सरपंच भंडारकवठे, तालुका दक्षिण सोलापूर**

### अविनाश पाटील यांना कला गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ एप्रिल-**



आर्ट बिट्स फौंडेशन पुणे तर्फे संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा कलावंतास दिला जाणारा कला गौरव पुरस्कार या वर्षी युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांना जाहीत झाला आहे.

या संस्थेचे हे पंचविसावे वर्ष आहे. पाटील हे पं. प्रमोद पाटील व पं. उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. तबला वादनात त्यांनी संगीत अलंकार व एम ए तबला ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशातील अनेक मानाच्या संगीत महोत्सवात त्यांनी आपली कला सादर केली आहे. परदेशातील दुबई,अबुधाबी, मालदीव, नेदरलँड्स, जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, डेन्मार्क, जर्मनी, पोलंड, स्पेन, आयर्लंड, स्कॉटलंड आणी लंडन येथी सोलो तबला वादन सादर करुन जगभरातील संगीत रसिकांची दाद मिळवली आहे. पाटील यांनी कला क्षेत्रात स्व कर्तुत्वावर अतिशय चिकाटीने, कष्टाने, जिद्दीने, मेहनतीने संघर्ष करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वताची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

भारतासह जगभरातील आज अनेक विद्यार्थी त्यांच्या कडे तबला वादनाची तालीम घेत आहेत.

# दागिन्यांच्या लोभातून वृद्ध महिलेचा खून

## लिंबू सरबतातून झोपेच्या गोळ्या देऊन हत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ एप्रिल-**

शहरात एका ७३ वर्षीय वृद्ध महिलेच्या बेपत्ता प्रकरणाचा तपास करताना खुनाचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, दागिन्यांच्या लोभातून ओळखीच्या व्यक्तीनेच हा खून केल्याचे समोर आले आहे.




याबाबत शशिकांत किसन वायकुळे (वय ६४, रा. उपळाई रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून संशयित आरोपी चांगदेव पाटील याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), २३८ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

फिर्यादीच्या माहितीनुसार, त्यांची चुलत बहीण सौ. गंगुबाई कालीदास गडदे (वय ७३, रा. हांडे गल्ली, कचेरी रोड, बार्शी) या एकट्याच राहत होत्या. त्यांच्या घरातील भाडेकरूंमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. दि. २५ मार्च रोजी गंगुबाई या घराला कुलूप लावून कोणालाही न सांगता निघून गेल्याचे समोर आले. त्यानंतर त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने २७ मार्च रोजी बार्शी शहर पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार (क्र. ४२/२०२६) दाखल करण्यात आली होती. तपासादरम्यान, स्थानिक सीसीटीव्ही फुटेजमध्ये गंगुबाई या संशयित चांगदेव गोवर्धन पाटील (रा. हत्तीज, ता. बार्शी; सध्या पवार बिल्डिंग, शिवाजीनगर) यांच्या पाठोपाठ इमारतीत जाताना दिसून आल्या. मात्र त्या परत बाहेर येताना दिसल्या नाहीत. याच दरम्यान संबंधित सीसीटीव्ही फुटेज डिलीट झाल्याचेही आढळून आले. बार्शी शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा प्रगटीकरण पथकातील पोलीस हवालदार अमोल माने, प्रवीण साठे, सचिन देशमुख, राहुल उदार, अंकुश जाधव, बाळकृष्ण मुठाळ, अविनाश पवार, उघडे हे बेपत्ता महिलेचा शोध घेत होते. पोलिसांनी संशयिताचा शोध घेत असताना अखेर त्याला २ एप्रिल रोजी पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे समोर आले आहे.

संशयित चांगदेव पाटील याने शेअर मार्केटमधील आर्थिक नुकसानीमुळे पैशांची गरज असल्याने गंगुबाई यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने मिळवण्यासाठी कट रचला. दि. २५ मार्च रोजी त्याने गंगुबाई यांना आपल्या घरी बोलावून लिंबू सरबतातून झोपेच्या गोळ्या दिल्या. त्या बेशुद्ध झाल्यानंतर टॉवेलने नाक दाबून त्यांचा खून केला. यानंतर मृतदेह एका काळपट रंगाच्या पिशवीत भरून आपल्या कार (हुंदाई वेरना, क्रमांक एमएच-२० सीएस ८९३७) मधून नेऊन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने विल्हेवाट लावल्याची कबुली त्याने दिली आहे. या प्रकरणात आरोपीला अटक करण्यात आले असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.




### हनुमान जयंतीनिमित्त सामूहिक गदापूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने हनुमान जयंती निमित्त सोलापूर शहरात विविध ठिकाणी सामूहिक 'गदापूजन' उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. लातूर आणि धाराशिव शहरांतही विविध ठिकाणी गदा पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर शहरात ५५ हून अधिक ठिकाणी गदापूजनाचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये १२०० हून अधिक भाविकांनी सहभाग घेतला.

विशेष म्हणजे, युवकांसोबतच महिला आणि लहान मुलांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. कार्यक्रमामध्ये गदापूजन विधी, हनुमान आरती, मारुती स्तोत्रपठण, शंखनाद आणि सामूहिक 'श्री हनुमते नमः' नामजप करण्यात आला. यानंतर रामराज्य स्थापनेसाठी मारुतीरायांचे गुण आत्मसात करण्याची प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रही घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी एकमुखाने रामराज्य स्थापनेसाठी आणि धर्मरक्षणासाठी कार्य करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. उपस्थित युवकांनी वानरसेना बनून धर्माधिष्ठित राष्ट्र स्थापनेच्या दिशेने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. ि

हदु जनजागृतीच्या वतीने देशभरात महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आदी राज्यांमध्ये मिळून ८५० हून अधिक ठिकाणी सामूहिक गदापूजन पार पडले.

### 'लोकमंगल'चा विस्तार आता जागतिक स्तरावर

**सांगोल्यात विश्वमंगल संकल्पनेचे स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ एप्रिल-**



गेल्या अडीच दशकांपासून सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या लोकमंगल समूहाचा प्रवास आता विश्वमंगल या जागतिक संकल्पनेच्या दिशेने सुरू झाला आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी सांगोल्यातील रत्नागिरी-नागपूर हायवेवरील हॉटेल श्रीराम येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत माजी सहकार मंत्री आ. सुभाष देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत विश्वमंगल मराठी फाउंडेशनची ध्येयधोरणे स्पष्ट केली.

आ. सुभाष देशमुख यावेळी बोलताना म्हणाले की, लोकमंगलने आजवर स्थानिक पातळीवर अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. मात्र, आता जगभरात विखुरलेल्या मराठी बांधवांना, उद्योजकांना आणि विचारवंतांना एकाच व्यासपीठावर आणण्याची गरज आहे. मराठी भाषा, संस्कृती आणि व्यावसायिक प्रगतीसाठी विश्वमंगल मराठी फाउंडेशन हे एक प्रभावी माध्यम ठरेल. या फाउंडेशनची अधिकृत मुहूर्तमेढ दि.१ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आळंदी येथे रोवली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. या बैठकीस सांगोला तालुक्यातील ॲड.गजानन भाकरे, डॉ.रणजीत केळकर, माणिक भोसले, अमेय लोखंडे, दत्तात्रय पाटील, पुष्पलता मिसाळ, जितेंद्र बाजारे, भीमाशंकर पैलवान, प्रफुल साळुंखे, दत्तात्रय बाबर आणि प्रा.राजेंद्र ठोंबरे हे उपस्थित होते. या बैठकीदरम्यान उपस्थितांनी या जागतिक संकल्पनेचे स्वागत केले.

स्थानिक पातळीवरील प्रश्नांना जागतिक व्यासपीठाची जोड मिळाल्यास ग्रामीण भागाचा विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ज्ञान हेच आयुष्यातील अमूल्य धन : डॉ. मनोज कदम

**कर्मयोगीच्या कर्माटिक २०२६ तंत्रपरिषदेमध्ये अनेक समाजाभिमुख प्रकल्पांचे सादरीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ एप्रिल-**




विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे ज्ञान व कल्पकता यांचा वापर करून उद्योजकतेकडे वळले पाहिजे. भावी अभियंते हे नोकरी करणारे न राहता नोकरी देणारे अभियंते तयार व्हावेत व यासाठी कर्मयोगीचे कर्माटिक २०२६ हे उत्तम व्यासपीठ आहे. कर्माटिक सारख्या स्पर्धेमधून च अनेक नविन शोध जन्माला येतील व अनेक व्यवसाय तयार होतील असा विश्वास छत्रपती संभाजीनगर येथील यशस्वी उद्योजक डॉ. मनोज कदम यांनी व्यक्त केला.

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे नुकतेच आयोजित केलेल्या कर्माटिक २०२६ या तंत्रपरिषदेमध्ये ते बोलत होते. कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजित कणसे हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. एस.पी.पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. अभय उत्पात यांनी प्रास्ताविक केले.

कर्माटिक २०२६ तंत्रपरिषदेचे समन्वयक डॉ.एस.व्ही.एकलारकर यांनी प्रमुख अतिथि डॉ. मनोज कदम यांची ओळख करून दिली.

या परिषदेमध्ये अभियांत्रीकीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट प्रदर्शन, सर्किट सुडोकू, इलेक्ट्रॉनिक्स क्वीज, रोबो रेस, बेस्ट फ्रॉम वेस्ट, टेक्नो रील्स, कोड फोर्सेस, ब्रिज मोडेल मेकिंग, ग्रीन बिल्डिंग अश्या विविध राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेसाठी राज्यातील ८५० अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. प्रत्येक स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमासाठी पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी रजिस्ट्रार जी. डी. वाळके, कर्मयोगी शिक्षण समूहातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, माजी विद्यार्थी यशस्वी उद्योजक वैभव पाटील, योग विद्याधामचे प्राचार्य अशोक ननवरे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कर्माटिक २०२६ संयोजक डॉ अभय उत्पात, समन्वयक डॉ. एस.व्ही. एकलारकर, विभागप्रमुख डॉ. एस.एम. लंबे, प्रा.अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले यांचे सहकार्य लाभले. उपप्राचार्य प्रा. जे.एल. मुडेगावकर यांनी आभार मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## थोडक्यात...



### श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे श्री शिवचरित्राचे सामूहिक पारायण

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे गुरुवारी श्री शिवचरित्राचे सामूहिक पारायण करण्यात आले. रंगभवन येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज उद्यानात हा उपक्रम झाला. प्रारंभी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती मूर्तीस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी मूर्ती परिसराची फुलांच्या माळांनी सजावट करण्यात आली होती. सामूहिक प्रेरणामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी श्री शिवसुर्यह्रदय सामूहिकरीत्या म्हणण्यात आले. यानंतर श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकऱ्यांनी राजा शिवछत्रपती या श्री शिवचरित्र ग्रंथाचे सामूहिक पारायण केले. ध्येयमंत्राने कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाचे धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नातून सांगोला-वाढेगाव रस्त्याचे काम पूर्णत्वास

**सांगोला, दि. ३ एप्रिल-**

सांगोला बायपास परिसरातील वाढेगाव-सांगोला या जुन्या रस्त्याचे काम माढा लोकसभेचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचे प्रयत्नातुन



पूर्णत्वास आले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ या मार्गावर सांगली-सोलापूर दरम्यान येणाऱ्या सांगोला बायपास येथील वाढेगाव-सांगोला या जुन्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झालेली होती. सदर रस्त्यावर गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले होते. तसेच रस्त्याचा पृष्ठभाग ठिकठिकाणी उखडलेला होता. यामुळे वाहतूक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन वाहनचालक व प्रवाश्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तसेच या मार्गावर अनेक छोटे-मोठे अपघात घडले होते. सदर मार्गावरून दररोज खासगी तसेच सार्वजनिक प्रवासी वाहने, शालेय बस, वाणिज्यिक वाहने इत्यादी मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात. सदर खराब रस्त्याबाबत दखल घेऊन खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी संबंधित विभागाशी पाठपुरावा करून रस्त्याचे काम सुरू करून ते सध्या पूर्णत्वास आले आहे. सदर रस्त्याच्या झालेल्या कामामुळे सांगोला तालुक्यातील या मार्गावरून ये-जा करणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आमदारांची मर्जी राखणे अधिकाऱ्यांच्या अंगलट

## पंचायत समितीच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना दणका

## नियमबाह्य शिक्षकांची नावे यादीतून गायब

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ३ एप्रिल-**

माढा तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने नुकताच आदर्श शिक्षक पुरस्कार प्रधान कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात २१ केंद्रातील २१ शिक्षक, १ विषय शिक्षक, १ केंद्रप्रमुख व १ विस्तार अधिकारी असे २४ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. हा आदर्श शिक्षक पुरस्कार गाजला तो नियमबाह्य पुरस्कार वाटपाच्या गोंधळाने. आमदारांच्या मर्जी राखणे अधिकाऱ्यांच्या अंगलट आले.

आ.अभिजीत पाटील यांची मर्जी राखण्यासाठी शिक्षण विभागाने नियम डावलून काही शिक्षकांची नावे पुरस्काराच्या यादीत घेतली असल्याची चर्चा सर्वत्र पसरली. सभापती पंडीत देशमुख यांनी अगोदर आदर्श शिक्षकांची नियमावली दाखवा. मगच यादी तयार करा, असे फर्मान शिक्षण विभागाला काढले असताना देखील पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आमदारांच्या मर्जीतील नावे निश्चित केली.

> **सभापतींनी घेतला नाही फोन**
>
> याबाबत सविस्तर माहीतीसाठी प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांना फोनवर सपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन ब्लॉंक करून रजेवर गेल्याचे समजले. सभापती पंडीत देशमुख यांना फोन केला असता त्यांनी फोन घेतला नाही.

भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना झापले. त्यामुळे नावे बदलण्याची नामुष्की शिक्षण विभागावर आली. प्रभारी गटशिक्षण अधिकारी विकास यादव यांनी तालुक्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार प्रस्ताव आलेल्या शिक्षकांची यादी सभापती पंडीत देशमुख यांच्यापुढे ठेवली होती. त्यावेळी सभापतींनी यादी दाखवण्यापेक्षा पुरस्काराची नियमावली मागितली होती.

पुरस्काराच्या यादीत विद्यमान आमदारांच्या शिफारशीने दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काही नावे सामाविष्ट केली होती. पुरस्कार वितरण कार्यक्रमसाठी आमदारांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. पंचायत समितीवर भाजपाची निर्विवाद सत्ता असताना भाजपाचे नेते आणि सभापती यांना विश्वासात न घेता आमदारांना निमंत्रण गेले होते. त्यामुळे त्या दोन अधिकाऱ्यांची कानउघाडणी करण्यात आल्याचे सांगण्यात येते. तर इकडे यादीतून बाहेर पडलेली शिक्षक आपल्याला पुरस्कार आहे म्हणून कार्यक्रमास उपस्थित राहिले होते. परंतु सेवेला १० वर्ष पुर्ण झाले नसल्याने पुरस्कार मिळणार नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. काही केंद्रातून डबल तर काही केंद्रातून एकही नाव पुरस्कारासाठी निवडले गेले नाही. शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे काही केंद्रातील शिक्षक पुरस्कारापासून वंचित राहिल्याचे प्रथमच घडले आहे.

## कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेवर सत्ताधारी पॅनलचे पुन्हा वर्चस्व

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या (साखर पेठ) पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी समाज विकास पॅनेलने पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व राखले आहे. शंख परिवार पॅनलच्या सात उमेदवारांनी सत्ताधारी पॅनेल विरोधात निवडणूक लढविली होती. यात सातही उमेदवारांचा पराभव झाला. साखर पेठ येथील श्री नीलकंठेश्वर मंदिरात मतमोजणी पार पडली. एकूण तीन फेऱ्यांत निकाल जाहीर करण्यात आला. निकाल जाहीर होताच समाज विकास पॅनेलच्या उमेदवारांनी गुलाल उधळून जल्लोष केला. समाजातील मान्यवरांकडून विजयी सर्व उमेदवारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सत्ताधारी समाज विकास पॅनेलचे नेतृत्व अध्यक्ष बालाजी मुटकिरी यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली बालाजी येज्जा, प्रसाद बिच्चल, चंद्रशेखर पोगूल, दिनानाथ धुळम, राजेंद्र द्यावरकोंडा, राजू कामुर्ती, हिराचंद धुळम, नागेश टंकसाळ, चंद्रशेखर कनकी, रामचंद्र मुटकिरी, कृष्णाहरी मादगुंडी, हनुमंत मिठ्ठा, केशव गणपा तसेच महेश बटगिरी यांनी निवडणूक लढविली असून यात सर्वांचा विजय झाला. शंख परिवार पॅनलकडून राजीव आडकी, अनिल धुळम, श्रीनिवास बंदगी, शंकर बटगिरी, सुमित गडगी, सुनील धुळम तसेच वासुदेव आडकी यांनी निवडणूक लढविली होती. यात शंख परिवार पॅनलच्या सातही उमेदवारांचा पराभव झाला. अजित करंदीकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.



सोलापूर : गुड फ्रायडेनिमित्त रंगभवन येथील पहिली ख्रिस्त सेवा मंडळ चर्चमध्ये पुणेच्या राईट रेव्ह बिशप अल्फ्रेड तिवडे यांच्या उपस्थितीत प्रार्थना संपन्न झाली



## चिंतण्णास्वामी मठात भाविकांची गर्दी

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

श्रीमद वीरशैव कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्था, श्री नीलकंठेश्वर देवस्थान संचलित श्री चिंतण्णास्वामी मारुती मंदिर येथील पाषाणरुपी मारुतीरायाच्या दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. शहरातील मध्यवर्ती भागात पद्मा थिएटर शेजारील बोळात असलेले हे मंदिर शंभर वर्षापूर्वी स्थापन करण्यात आले. याठिकाणी चिंतण्णास्वामी यांची जिवंत समाधी आहे. येथे दर्शनासाठी दररोज शेकडो लोक येत असतात, असे संस्थेचे विश्वस्त दीनानाथ धुळम यांनी सांगितले.

## पवित्र पोर्टलवरील पसंतीक्रम बाबतचा वाद अधिकच तीव्र

### प्राधान्यक्रमावर बंधने नकोत; उमेदवारांना पूर्ण स्वातंत्र्य द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

शिक्षक भरती प्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या पवित्र पोर्टलवरील पसंतीक्रम मर्यादेबाबतचा वाद अधिकच तीव्र होत आहे. २ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार उमेदवारांना अर्हतेनुसार मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या दोन्ही प्रकारांत पात्र असलेले सर्व प्राधान्यक्रम उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. प्राधान्यक्रमांपैकी मर्यादित संख्या लॉक करण्याची अट घालण्यात आल्याने शिक्षक संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मुलाखतीशिवायच्या निवडीसाठी उमेदवारांना जास्तीत जास्त १०० प्राधान्यक्रम लॉक करता येणार आहे. मुलाखतीसह निवडीसाठीची मर्यादा ५० इतकी निश्चित करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित उपसचिव आबासाहेब कवळे यांनी सांगितले की, शासनाने उमेदवारांना सर्व पात्र पर्याय उपलब्ध करुन दिले असले, तरी त्यातील मर्यादित पर्यायच अंतिमतः निवडण्यासाठी लॉक करता येणार आहे.

पूर्वीप्रमाणे अमर्याद पसंतीक्रम भरण्याची सुविधा उपलब्ध असताना ती कमी करुन १०० पर्यायांपर्यंत मर्यादित करणे हे अन्यायकारक आहे. या निर्णयाचा थेट परिणाम हजारो पात्र उमेदवारांच्या भवितव्यावर होणार असून, विशेषतः कमी व मध्यम गुणवत्ताधारक उमेदवारांना याचा सर्वाधिक फटका बसणार आहे. मर्यादित पर्यायांमुळे त्यांची निवड होण्याची शक्यता कमी होईल, अशी भीती संघटनांनी व्यक्त केली आहे.

युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटनेचे अध्यक्ष संदीप कांबळे यांनी सांगितले की, प्रत्यक्षात मोठ्या संख्येने उमेदवार उपलब्ध असताना, मर्यादित पसंतीक्रमामुळे निवडीच्या संधी कमी होतात. १०० जागांपैकी प्रत्यक्ष निवड केवळ काहीच जागांवर होत असल्याने अनेक उमेदवार प्रक्रियेतून वंचित राहतात. त्यामुळे प्राधान्यक्रमांची मर्यादा वाढवणे किंवा पूर्णपणे रद्द करणे आवश्यक आहे.

गुणवत्ता अबाधित ठेवण्यासाठी आणि पारदर्शक भरतीसाठी प्राधान्यक्रम अमर्याद ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा या निर्णयाविरोधात न्यायालयीन लढा उभारण्याची तयारी संघटनांनी दर्शवली आहे. प्राधान्यक्रमांची संख्या कमी केल्यामुळे उमेदवारांच्या संधींमध्ये लक्षणीय घट होत आहे. त्यामुळे किमान उपलब्ध पदांच्या ९० टक्क्यांपर्यंत प्राधान्यक्रम लॉक करण्याची मुभा देण्यात यावी, असे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

# पटकथा लिहिताना अधिकाधिक बारकावे महत्वाचे : कुमार दवे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

कोणत्याही चित्रपटासाठी स्क्रीप्ट लिहत असताना त्यातील बारकावे अधिक महत्वाचे असतात. असे प्रतिपादन लगान या हिंदी चित्रपटाचे पटकथाकार कुमार दवे यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. लोकमान्य टिळक सभागृह चार हुतात्मा पुतळा चौक सोलापूर (ॲम्फी थिएटर ) येथे शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी झालेल्या या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात हे प्रमुख पाहुणे होते.

लेखनाचे अनेक प्रकार आहेत. कथा, कादंबरी, कविता, नाट्य कथा, यासह लेखनाचे प्रकार आहेत. नुसते हातात पेन घेतले म्हणजे लेखक होत नाही. मनातील विचार लोकांसमोर मांडताना त्यातील बारकावे किती प्रमाणात आपण कागदावर उतरवतो आणि ते समोरच्या रसिक श्रोत्यां पर्यत अधिक सक्षमपणे पोहोचवतो त्यातच लेखकाचे कौशल्य अवलंबून आहे. चित्रपट यशस्वी करण्यासाठी सेन्सीटीव्ह, सेनसीब्लीटी आणि मनोरंजन या तीन प्रमुख गोष्टी आवश्यक आहेत. लगान या चित्रपटाची पटकथा




लिहत असताना एक साधा विचार त्यातून बारकावे शोधून पटकथा तयार झाली. असेही कुमार दवे यांनी सांगितले.

मला दिग्दर्शक व्हायचे होते परंतु मी लेखक झालो. अजीज मिर्झा यांच्या प्रेरणेमुळे मी पटकथा लिहण्यास सुरूवात केली. मी रायटर पेक्षा क्राफ्ट यामध्ये अधिक रसिक आहे. असेही दवे यांनी सांगितले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरकडून हा आगळ्या वेगळा कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल त्यांचे कौतुक आहे नेहमी असे कार्यक्रम आयोजित करावेत असी अपेक्षा आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात यांनी आपल्या भाषणातून सांगितले. मी चित्रकार आहे परंतु लगान हा चित्रपट मी अनेकवेळा पाहिला क्रिकेटच्या वेडापायी हा चित्रपट मी १० ते १२ वेळा पाहिला असेही खरात यांनी सांगितले.

प्रारंभी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत त्यांनी माहिती दिली. या कार्यक्रमात जितेश कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय केला त्यानंतर चित्रकार सचिन खरात यांच्या हस्ते व्याख्याते कुमार दवे यांचा सत्कार करण्यात आला तर कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे सचिन खरात यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष अमोल धाबळे यांनी केले तर आभार प्रकाश मोकाशे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला अविनाश महागांवकर, प्रसिध्दीप्रमुख विनायक होटकर, श्रीकांत येळेगांवकर, निवृत्त पोलीस उपअधिक्षक सुर्यकांत पाटील, प्राचार्य जी के देशमुख, सुधा इडलीचे सिध्देश्वर किणगी यांच्यासह मोठ्यासंख्येने रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती.



सोलापूर : विजापूर रोड येथील बाहुबली दिगंबर जैन मंदिरात शुक्रवारी सकाळी श्री बृहत पद्मावती महामंडळ आराधना महोत्सव संपन्न झाला. यावेळी जैन बाधंवाची उपस्थिती होती. (छायाचित्र : केवल तिवारी)

# स्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त धर्मसंकीर्तन महोत्सवास प्रारंभ




### मीरा कुलकर्णी सहकाऱ्यांनी सादर केले भक्ती संगीत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ एप्रिल-**

अक्कलकोट माझे माहेर वटवृक्षाच्या पारंब्यात आमचं जीवन व्यतीत झाले. गाण्याची सुरवात अक्कलकोट मधुनच झाली आहे साऱ्याच्या सहकार्याने स्वाम ीचरणी गानसेवेची संधी मिळाली हे भाग्याचा क्षण आहे असे उद्गार मीरा कुलकर्णी यांनी केले.

श्री स्वामी महाराजांच्या १४९ व्या पुण्यतिथी निमित्त धर्मसंकीर्तन महोत्सवाचा प्रारंभ शुक्रवारी झाला. मुख्य गायक मीरा कुलकर्णी (सीए) सह गायिका अर्चना कुलकर्णी, विणा देशपांडे तबला जगदीश सोनवणे हार्मोनियम, ओंकार पाठक, ताल अक्षय सरदेशमुख आदी सहकाऱ्यांनी पुण्यतिथी महोत्सवात भक्ती संगीत सादर केले.

सर्व गायक कलाकारांचा श्री स्वामी महाराज देवस्थान चे चेअरमन माजी नगराध्यक्ष विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भक्ती संगीत गान सेवेत मीरा कुलकर्णी व सहकार्यानी भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, स्वामी समर्थ माझी आई ,धाव पाव स्वामी समर्था, खेळ मांडियला वाळवंटी ऐसी लागी लगन मीरा होगई मगन , जेथे जातो तेथे तु माझा सांगा की चालविशी हाती, देव माझा विठू सावळा, काय चुकले स्वामी समर्था अशी भाविकांच्या ओठावरील गीते सादर केली रसिक श्रोत्यांची वाहवा मिळवली. निशंक हो निर्भय हो मना रे तारक मंत्राने भक्ती संगीताची सांगता झाली.

याप्रसंगी देवस्थानचे चेअरमन माजी नगराध्यक्ष नगरसेवक महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, विश्वस्त उज्वला सरदेशमुख, राजाभाऊ सरदेशमुख, बलादकर, श्रीमुख जगदाळे, लक्ष्मण पाटील, प्रकाश अवधानी, सैदप्पा इंगळे, राजू भोसले, देशपांडे, बाळासाहेब कुलकर्णी, बबलादकर, देसाई, सागर गोन्डाळ, श्रीशैल गंवडी, बाळासाहेब एकबोटे, सुरेखा तेली, निगु हिंडोळे, रमेश शिंदे, मोरे, प्रसाद सोनार, ऋषी लोणारी, स्वामी लोणारी, काशीनाथ इंडे, संजय पवार उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

## पाणी आणू असे म्हणत जिवे ठार मारण्याची धमकी

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
रिक्षामधून जात असताना पाणी आणू असे म्हणून एकाला विजापूर नाका येथे हाताने लाथाबुक्क्याने मारहाण जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. उमेश नंदकुमार मेटकरी (रा.झोपडपट्टी नंबर २, विजापूर रोड, सोलापूर) यांची एम.एच.१३ बी.वी.२०३० या क्रमांकाची रिक्षा राहत्या घरी असताना लखन गोकुळसिंग परदेशी हा तेथे आला असता पाणी आणू असे म्हणाले असता त्याने रिक्षा अडवून निखिल, निलेश शेंडगे, लखन गोकुळसिंग परदेशी यांच्यासह उमेश मेटकरी याला मारहाण करत जिवे ठार मारण्याची धमकी दिली, असे विजापूर नाका पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



## थोडक्यात...

### कपाटातील रक्कम व पाण्याची मोटर नेली चोरून

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
घराच्या लोखंडी दरवाजाचे कुलूप उचकटून लोखंडी कपाटातील रोख रक्कम व पाण्याची मोटार अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. या हकीकत अशी की, दि. ३० मार्च रोजी अज्ञात चोरट्याने गणेश नागनाथ पिस्के, वय ४३, रा. १०/९ विद्यानगर १, सोलापूर यांच्या घराच्या लोखंडी दरवाजाचे कुलूप उचकटून आत प्रवेश करून लोखंडी कपाटातील रोख रक्कम व अर्धा इंच पाण्याची मोटार असा एकुण ४१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याबाबत दि. १ एप्रिल रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### राहत्या घराजवळ पार्क केलेली दुचाकी गेली चोरीला

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
काळ्या लाल रंगाची हिरो एचएफ डीलक्स मोटरसायकल राहत्या घरात जवळ पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. दि. २१ फेब्रुवारी २०२६ मोहसिन अहमद शफीक अहमद सगरी, रा. ७७५, गरिबीहटाव, झोपडपट्टी नंबर २, विजापूर रोड, सोलापूर यांची काळ्या लाल रंगाची हिरो एचएफ डीलक्स २५ हजार रुपयांच्या किमतीची मोटरसायकल क्रमांक एम एच १३ सी वाय ५४५३ ही राहत्या घरात जवळ पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत दि. १ एप्रिल रोजी विजापूर नाका पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

### घरासमोरून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
काळ्या रंगाची हिरो फॅशन मोटरसायकल राहत्या घरासमोर पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली.यात हकीकत अशी की, दि. २६ जानेवारी रोजी गोरख भारत माळी, वय ४४, रा. घर नंबर ४२ / ब, लक्ष्मी नगर, हतुरे वस्ती, सोलापूर यांची काळ्या रंगाची हिरो फॅशन ५० हजार रुपयांच्या किमतीची मोटरसायकल क्रमांक एम एच १३ डीडी ७४८६ ही राहत्या घरासमोर पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत दि. २ एप्रिल रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शिर्के करत आहेत.

### दोन लाख रुपये घेऊन ये म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
सासरी असताना पत्नीला बांधकाम व्यवसायासाठी माहेरून २ लाख रुपये घेऊन ये असे म्हणून मानसिक, शारीरिक त्रास देत पत्नी ऐश्वर्यावर खोटे आरोप केले. याबाबत सासरच्या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.या हकीकत अशी की, दि. ६ डिसेंबर २०२२ ते १५ सप्टेंबर २०२५ च्या दरम्यान सौरभ (पती), रंजना (सासू), सचिन (सासरे), रा. मु.पो. चंदुर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर, विमल अंबि (ननंद), स्नेहल, पौर्णिमा, रा. सांगली यांनी सासरी मिळून ऐश्वर्या सौरभ भिसे, वय २१, रा. फ्लॅट नंबर १३, चौथा मजला, विकास नगर, होडगी रोड, सोलापूर हिला सासरी असताना लग्नात चांगले साहित्य दिले नाही, मानपान केला नाही. माहेरच्यांची आमची बरोबरी करण्याची लायकी नाही असे अपमान केला. मारहाण करून शिवीगाळ केली. यामध्ये पती सौरभ याने बांधकाम व्यवसायासाठी माहेरून २ लाख रुपये घेऊन ये असे म्हणून मानसिक, शारीरिक त्रास दिला. पत्नी ऐश्वर्यावर खोटे आरोप करून तिला मानसिक व शारीरिक त्रास दिला. याबाबत दि.१ एप्रिल रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास इनामदार करत आहेत.

### दुकान मे खरेदी किया म्हणत केली शिवीगाळ

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
सराफ दुकानास बाहेरून शटरला कुलूप लावून, वेल्डिंग काम करत असल्याने विचारले असता, दुकान मे खरेदी किया हु, तुम बाजू मे सरको असे म्हणून आईला दुकानापासून बाजूला ढकलून दिले. तेव्हा त्यांना समजावत असताना व त्यांना बाजूला घेत असताना होल्डरने डाव्या हाताच्या बोटांना चटका लागला. इतर जणांनी शिवीगाळ केली. यात हकीकत अशी की, दि. २ एप्रिल रोजी जैनुद्दीन मूर्तज शेख, रा. ४२७ साखर पेठ, बुधवार बाजार, सोलापूर हे घरी असताना त्यांच्या ओळखीचे ख्वाजा अमीन मंगलगिरी हे घरासमोर येऊन सांगितले की, तुमच्या सराफ दुकानात अमीन बागवान, अलीमुद्दीन बागवान, मुस्तफा बागवान, अकबर नल्लामंदु, इतर पाच अज्ञात इसम हे दुकानास बाहेरून शटरला कुलूप लावून, वेल्डिंग काम करत आहे असे सांगितल्याने जैनुद्दीन शेख व त्यांचे वडील, भाऊ असे दुकानाजवळ गेले. कुलूप का लावता असे विचारले असता, अमीन बागवान यांनी हे दुकान मे खरेदी किया हु, तुम बाजू मे सरको असे म्हणून आईला दुकानापासून बाजूला ढकलून दिले.

# ‘सोलापूर जिल्हा’ मनातून कधीच जाणार नाही : कुमार आशीर्वाद

## अर्धवट राहिलेली विकासकामे पूर्ण करणार : एस.कार्तिकेयन्

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांच्यामुळे पहिल्यांदाच इतका मोठा जिल्हा मला मिळाला होता. यानिमित्ताने सोलापुरात २ वर्षे ९ महिने काम करण्याची संधी मिळाली. पालकमंत्री जयकुमार गोरे, इतर स्थानिक लोकप्रतिनिधी, पत्रकार, सर्वसामान्य नागरिक अशा सर्वांच्याच सहकार्यातून विविध विकासकामे जिल्ह्यात हसतखेळत राबविली. सोलापूर जिल्हा आपल्या मनातून कधीही जाणार नाही, असे मावळते जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

कुमार आशीर्वाद यांची नागपूरच्या जिल्हाधिकारीपदी बदली असून त्यांच्या जागी एस.कार्तिकेयन् यांची नियुक्ती करण्यात आली. नूतन जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन् यांच्याकडे पदभार सोपविताना ते पुढे म्हणाले, आषाढी-कार्तिकी वारीच्या रूपातून पंढरीच्या पांडुरंगाची सेवा करण्याचे मला भाग्य लाभले. होटगी रोड विमानतळ, आयटी पार्क, पंढरीच्या आषाढी-कार्तिकी वारीसाठी काम केले. गतवर्षी सीना



नदीला आलेल्या महापुराच्या वेळी जोखमीचे काम करता आले. उजनी जलपर्यटनच्या दृष्टीने २८२ कोटी रुपयांचा आराखडा शासनाकडून मंजूर करुन घेतला. मात्र हे स्वप्न अपुरे राहिले.

नूतन जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन् याप्रसंगी बोलताना म्हणाले, मलाही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी पदाचा पहिला मान सोलापुरातच दिला आहे. कुमार आशीर्वाद यांनी आपल्या कार्यकाळात सोलापूर जिल्ह्यासाठी जीव तोडून काम केल्याने काही मोठे प्रकल्प मार्गी लागले आहेत. त्यांच्या हातून काही कामे अर्धवटही राहिल्याचे समजते. यासाठी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काम करून त्यांची अर्धवट राहिलेली सर्व कामे पूर्णत्वास घेवून जाणार आहे. उजनी पर्यटन, आयटी पार्क, बोरामणी विमानतळ आदी विषयांचा बारीक अभ्यास करून ते विषय लवकरच मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांत अधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार नीलेश पाटील, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### लक्षवेधी कारकीर्द आणि युवा कलेक्टर

कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रशासकीय कुशलतेने काही धाडसी निर्णय घेतले. कडक शिस्त आणि कामातील तत्परतेमुळे त्यांची कारकीर्द सोलापूरकरांसाठी लक्षवेधी ठरली. शहर जिल्ह्यात त्यांनी आपल्या कामाचा चांगला ठसा उमटविला होता. युवा कलेक्टर म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जायचे. मुख्यमंत्री फडणवीस यांनीच नाहीतर पंतप्रधान मोदींनीही एकदा त्यांचे कौतुक केले होते.

### पंढरीची वारी, निवडणुकांत मायक्रोप्लॅनिंग

पंढरीची वारी किंवा मोठी निवडणूक म्हणजे चांगले काम करण्याची संधी आल्याचे कुमार आशीर्वाद यांना समाधान वाटायचे. यामुळे ते त्यांच्या सहकार्यांसमवेत विविध बैठका घेवून मायक्रोप्लॅनिंग करायचे आणि मोहीम फत्ते करायचे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रशासकीय तथा जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून निवडणुका शांततेत पार पाडण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या होमग्राऊंडवर करावी लागणार बॅटिंग



येणाऱ्या भविष्यकाळात त्यांना थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या होम ग्राऊंडमध्ये म्हणजेच नागपूरच्या जिल्हाधिकारीपदी बदली देण्यात आली असल्याने मुख्यमंत्र्यांच्या होमग्राऊंडवर कर्तव्यरुपी बॅटिंग करावी लागणार आहे. सध्या नागपूरला डॉ. बिपीन इटणकर हे कलेक्टर आहेत, त्यांच्याकडून कुमार आशीर्वाद हे लवकरच पदभार घेणार आहेत.

## ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनात गेल्या १७ वर्षांपासून वाढ नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
ग्रामरोजगार सेवकांमध्ये मानधन वाढीच्या प्रश्नावर नाराजी झाली असून, १७ वर्षांपासून अत्यल्प मानधनावर काम करत असल्याने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत केंद्र व राज्य शासनाने विविध बदल केले असले, तरी ग्रामरोजगार सेवकांच्या मूलभूत मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यात सुमारे ९८० ग्रामरोजगार सेवक कार्यरत आहेत. राज्य शासनाच्या २ मे २०११ च्या आदेशानुसार आजही अर्धवेळ सेवा मानली जाते. मात्र, प्रत्यक्षात पूर्णवेळ कामाचा ताण असल्याचे सेवकांचे म्हणणे आहे. कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून फेस रीडिंग, ई-केवायसी, दप्तर नोंदणी, सामाजिक अंकेक्षण यांसारखी विविध शासकीय कामे त्यांना पार पाडावी लागत आहेत. जिल्हाध्यक्ष म्हाळाप्पा गावडे यांनी सांगितले की, शासनाने ग्रामरोजगार सेवकांच्या कामाची दखल घेऊन त्यांना न्याय देणे अत्यावश्यक आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या मागण्या मान्य न झाल्यास राज्यभरात आंदोलन करु.


## सोलापूर बाजार समितीत चिंचेचा भाव झेपावला

**प्रतिक्विंटल ३१ हजारांपर्यंत दर**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत यंदाच्या हंगामात चिंचेच्या दरात लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रक्रिया उद्योगांकडून वाढलेल्या मागणीमुळे चिंचेचे दर तेजीत असून, शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळत आहेत. गत आठवड्यात बाजारात दाखल झालेल्या चिंचेला कमाल ३१ हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत दर मिळाला, तर किमान दर सुमारे ६ हजार रुपये प्रतिक्विंटल इतका नोंदवला गेला.

सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत दर मंगळवारी चिंचेचे लिलाव होतात. चिंचोका वेगळा केलेली चिंच तसेच चिंचोकेही विक्रीसाठी येथे दाखल होतात. सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव, लातूर आणि कर्नाटकातील विजयपूर

व्यापाऱ्यांच्या मते, प्रक्रिया उद्योगातील वाढती मागणी आणि दर्जेदार मालाची उपलब्धता यामुळे यंदा चिंचेच्या दरात सुधारणा झाली आहे. पुढील काही आठवड्यांतही बाजारातील मागणी कायम राहिल्यास दर स्थिर राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. चिंचेच्या दरामुळे शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होत असून, बाजारपेठेत समाधानकारक वातावरण असल्याचे दिसून येत आहे.



परिसरातून मोठ्या प्रमाणात चिंच विक्रीसाठी येथे येत आहे. जानेवारी महिन्यापासून चिंचेच्या काढणीला वेग येतो. अनेक व्यापारी थेट शेतकऱ्यांकडून चिंचेच्या झाडांची काढणीसाठी खरेदी करतात, तर काही शेतकरी स्वतः काढणी करून चिंच फोडून बाजारात विक्रीसाठी आणतात. चिंच काढणी आणि प्रक्रिया यामध्ये मोठ्या प्रमाणावर महिला मजुरांना रोजगार उपलब्ध होत असून, ग्रामीण भागातील अर्थचक्राला यामुळे चालना मिळत आहे.

सोलापूर बाजारातील चिंचेची सद्यस्थिती पाहता, एकूण आवक सुमारे ३७९० गोण्यांची नोंद झाली आहे. सरासरी दर सुमारे १३ हजार रुपये प्रतिक्विंटल इतका आहे. गतवर्षी याच कालावधीत चिंचेचा सरासरी दर सुमारे १० हजार रुपये प्रतिक्विंटल होता. यावर्षी दरात झालेली ही वाढ शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

## प्रा. रेणुका बिराजदार यांना पीएच.डी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
येथील संगमेश्वर महाविद्यालयातील प्रा. रेणुका सुधीर बिराजदार (हुडगी) यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. ‘वाणिज्य व व्यवस्थापन’ या विद्या शाखेत त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रा. बिराजदार यांनी " Study on Work Life Balance of Women Teachers in Higher Educational Institutions with Special Reference to Western Maharashtra (उच्च शिक्षण संस्थांम धील महिला शिक्षिकांच्या कार्य-जीवन संतुलनाविषयीचा अभ्यास - विशेषतः पश्चिम महाराष्ट्राच्या संदर्भात)’ या महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. त्यांच्या



संशोधनात महिला शिक्षकांच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यातील संतुलनाचे विविध पैलू अभ्यासले आहेत. या संशोधन कार्यासाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. आर. एम. खिलारे,प्रा. डॉ. एस. व्ही. शिंदे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ.आर. पी. बुवा,संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. गोठे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## अंशकालीन निदेशकांचा संताप उसळला; सीईओंकडे तक्रार

### सावळेश्वर येथील मानधन प्रकरणी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
सावळेश्वर (ता.मोहोळ) येथील केंद्र शाळेतील अंशकालीन निदेशकांच्या थकीत मानधनाच्या प्रश्नावरून शिक्षण विभागात वाद निर्माण झाला आहे. संबंधित प्रकरणात शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्यावर अधिकाराचा गैरवापर केल्याचा आरोप करत त्यांच्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना निवेदन देण्यात आले आहे.

सावळेश्वर येथील केंद्र शाळेत २०१७-१८ पासून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ तसेच शासन आदेशानुसार अंशकालीन निदेशकांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, या निदेशकांच्या मानधनाच्या प्रस्तावाला शिक्षणाधिकाऱ्यांकडून नकार देण्यात आल्याचा आरोप आहे. यामुळे संबंधितांना आर्थिक फटका बसत असून, मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदेशकांनी नमूद केले आहे. याप्रकरणी रोहन सरवदे, राजेंद्र लांडगे आणि पूनम लांडगे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांनी शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्यावर अधिकाराचा गैरवापर केल्याचा आरोप करत सखोल चौकशी करून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. संबंधितांनी यापूर्वी गटशिक्षण अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच महाराष्ट्र शासनाकडेही वारंवार पाठपुरावा केला असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणाची दखल घेत २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मंत्रालयात बैठक घेण्यात आली होती. यावेळी संबंधितांकडून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.


१३ मार्च २०२६ रोजी शिक्षणाधिकारी शेख यांनी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याने हा वाद अधिकच चिघळला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.


## श्री वीरसागरजी महाराज यांचा केशलोंच विधी

### तपश्चर्येचा तेजोमय आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
जैन धर्मातील संयम, त्याग आणि आत्मशुद्धीचे सर्वोच्च प्रतीक मानला जाणारा केशलोंच विधी आज अत्यंत श्रद्धा, भक्तिभाव आणि आध्यात्मिक वातावरणात झाला. ‘युगशिरोमणी’ म्हणून विख्यात आचार्य विद्यासागर जी महाराज यांचे परम शिष्य, निर्यापक श्रमण १०८ श्री वीरसागरजी महाराज यांचा हा विधी आदिनाथ मंदिर, त्यागी निवास येथे पार पडला.

केशलोंच ही केवळ शारीरिक क्रिया नसून आत्मसंयम, सहनशीलता आणि वैराग्याची पराकाष्ठा मानली जाते. देहाभिमानाचा त्याग करून आत्म साधनेकडे वाटचाल करण्याचा हा एक उच्च आध्यात्मिक साधना-प्रयोग आहे. जैन तत्त्वज्ञानातील अपरिग्रह, संयम आणि तप या मूल्यांचे जिवंत प्रतीक म्हणून या विधीकडे पाहिले जाते.





विधीपूर्वी मुनीश्री शरीरावर पवित्र राख लावतात आणि त्यानंतर स्वतःच्या हातांनी केस झुबक्यांमध्ये उपटतात. ‘जैन’ हा शब्द ‘जिन’ या संकल्पनेतून उद्भवलेला असून, ‘जिन’ म्हणजे आपल्या मनावर आणि इंद्रियांवर विजय मिळवणारा. अशा आत्मविजयी साधकांच्या परंपरेत दिगंबर मुनीश्रींचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले जाते. दिगंबर मुनी २२ परिषह (कठीण परिस्थिती) शांतपणे सहन करतात आणि २८ मूलगुणांचे कठोर पालन करतात. केशलोंच करताना सूक्ष्म जीवांची हिंसा टाळणे अशक्य असल्याने, त्या दिवसाचे प्रायश्चित्त म्हणून मुनीश्री उपवास पाळतात. त्यामुळे अहिंसा, करुणा आणि आत्मशुद्धी यांचे सर्वोच्च पालन त्यांच्या आचरणातून प्रकर्षाने दिसून येते. ते स्वतः निर्भय राहून सर्व जीवांना निर्भयतेचा संदेश देतात. विशेष म्हणजे, निर्यापक श्रमण श्री वीरसागरजी महाराज दर दोन महिन्यांनी ही कठोर तपश्चर्या नियमितपणे करतात. त्यांच्या सातत्यपूर्ण साधनेतून अध्यात्मिक स्थैर्य, अनुशासन आणि आत्मबल यांचे विलक्षण दर्शन घडते. या पवित्र प्रसंगी उपस्थित असलेल्या श्रावक-श्राविकांनी भावपूर्ण दर्शन घेत आत्मिक उन्नतीचा अनुभव घेतला. या विधीमुळे सोलापुरात जैन धर्माच्या महान तपपरंपरेची पुनःप्रचिती झाली असून, समाजात संयम, आत्मोन्नतीच्या मूल्यांचा प्रेरणादायी संदेश अधिक दृढ झाला आहे.

## डिव्हायडरला टेम्पो धडकल्याने क्लीनरचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
टेम्पो भरधाव वेगाने चालवून हत्तुर जवळ रोडच्या डिव्हायडरला धडकून, गाडी पलटी झाल्याने त्यात क्लीनरचा मृत्यू झाला.




यात हकीकत अशी की, दि. २ एप्रिल रोजी टेम्पो क्रमांक एम एच ४० सीएम ८२२४ चा चालक यातील जलिल मेहबूबसाब शहा, वय ३१, रा. आसा, उंब्रज, जि. शाहाजापूर, मध्यप्रदेश याने त्याच्या ताब्यातील वाहन हत्तुर जवळ भरधाव वेगाने चालवून रोडच्या डिव्हायडरला धडकून, गाडी पलटी झाल्याने त्यात स्वतःस किरकोळ दुखापत व क्लीनर शकील रमजानी पठाण, वय २१, रा. पिपल्या, ता. शहाजापूर मध्यप्रदेश यांचे दुकान गंभीर दुखापत होऊन त्याच्या मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी दि. २ एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गायकवाड करत आहेत.

### लाडक्या बहिणींचा संताप

## मुदतवाढ जाहीर पण पोर्टल ठप्पच!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**
राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत पुन्हा एकदा नियोजनाच्या त्रुटी समोर आल्या असून, ई-केवायसी प्रक्रियेतील गोंधळामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

शासनाने ई-केवायसी दुरुस्तीसाठी मुदत वाढवून ३० एप्रिलपर्यंत संधी दिल्याची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात पोर्टलवर आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. लाभार्थ्यांना ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम मुदत देण्यात आली होती. मात्र, विविध तांत्रिक अडचणी, कागदपत्रांतील त्रुटी आणि प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे वेळेत ई-केवायसी पूर्ण करता आली नाही. ही बाब लक्षात घेऊन शासनाने मुदतवाढ देत ३० एप्रिलपर्यंत दुरुस्तीची संधी उपलब्ध करून दिली.



परंतु, मुदतवाढ जाहीर होऊनही प्रत्यक्षात पोर्टलवर ई-केवायसी दुरुस्तीचा पर्यायच हटवण्यात आल्याचे समोर आले आहे. ३१ मार्चनंतर पोर्टलवरील ई-केवायसी दुरुस्तीचा कॉलम गायब झाल्याने लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकांनी पोर्टलवर लॉगिन करून दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याचे दिसून आले. मुदतवाढ दिल्यानंतरही पोर्टलवर सुविधा उपलब्ध नसेल, तर त्याचा नेमका फायदा कोणाला? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

तातडीने पोर्टल सुरू करून ई-केवायसी दुरुस्तीचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मयुरी कबाडे यांच्यासह अनेक लाडक्या बहिणींनी केली आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४०२

**बाळक बापाचिये ताटीं रिगे । रिगोनि बापातेंच जेवंऊ लागे ।
कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोडवी. ।।**

या ओवीतही माऊलींचा श्रोत्याबरोबरचा लडिवाळपणा चालूच आहे. आपली पात्रता नसतांनासुध्दा हे अवघड गीताख्य आपण तुटक-फुटक शब्दात सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि श्रोते एकरुप होऊन ऐकत आहेत, हे श्रोत्यांचे मोठेपण आहे. वास्तविक माझी हे गीताख्य सांगण्याची किंवा बोलण्याची योग्यता नसतांनाही आपल्यासारख्या सर्वज्ञ श्रोत्यामुळे मी बोलका झालो आहे, असे माऊली म्हणतात. सरस्वती जी विद्येची देवता आहे, तिच्या पुत्राने वस्त्रावरील कित्त्यावरुन का अभ्यास करायला हवा? त्या प्रमाणे तुमच्यासारख्या ज्ञानवंत श्रोत्यांचा मी पुत्र असल्याने बोलत आहे. असे माऊली म्हणतात. त्याचबरोबर लगेच माऊली असेही म्हणतात, काजवा केवढाही मोठा असो तो कांहीही करो, पण सुर्यापुढे तो प्रकाशणार काय? अम्रताच्या ताटात वाढावी अशी पक्वान्ने कोठून आणणार९? शितल असणा-या चंद्राला पंख्याने वारा घालणे किंवा नादब्रम्हापुढे गायन ऐकविणे, अलंकाराला अलंकार घालणे शक्य आहे कायफ? सुगंधाने कशाचा वास घ्यावा? सागराने कोणत्या ठिकाणी स्थान करावे? हे सर्व आकाशच व्यापले जाईल असे पांघरुन कोणते किंवा असा विस्तार कोणता?



माऊलींनी असे अनेक प्रश्न श्रोत्यांपुढे मांडले आहेत. उपरोक्त प्रश्नाला उत्तरच असु शकत नाही. कारण प्रश्नातील विषय स्वत:च इतका परिपूर्ण आणि व्यापक आहे की त्याच्यापुढे किंवा त्याच्यात पुन्हा वाढ किंवा व्यापकपणा घालता येणे शक्य नाही. अगदी त्या प्रमाणे आपण श्रोते इतके ज्ञानी गुणसंपन्न आहात की, आपल्या ज्ञानात भर घालण्याची माझी पात्रता नाही. आपल्या ज्ञानात भर घालण्याची आपण पात्रता आणायची कोठून हा प्रश्न माऊलींनी मांडला आणि लगेच आपणच आपल्या प्रश्नाला उत्तरीही दिले आहे. या उत्तरादाखल माऊली म्हणतात, **बाळक बापाचिये ताटीं रिगे । रिगोनि बापातेंच जेवंऊ लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोडवी ।।** अर्थात लहान बालकाला जेवता येत नाही म्हणून बाप लहान लहान घास करुन त्याला भरवित असतो. पण ते बालक बापाच्या ताटात हात घालून आपल्या हाताला येईल तो पदार्थ घेऊन बापालाच भरवू लागते. तेव्हा बाप आनंदाने आपल्या बालकाचा घास भरवून घेते. सदर घास भरवून घेतांना आई किंवा बाप तुला घास भरवता येत नाही किंवा योग्य प्रकारे घास तयार करता येत नाही असे न म्हणता अतिआनंदनाने आपल्या मुलाच्या प्रेमापोटी तो घास सेवन करतात. तसेच आपण सर्व श्रोते माझे आई बाप आहात. मी भरवलेला प्रेमाचा हा गिताख्यरुपी घास आपण प्रेमाने ग्रहण करणार आहात. श्रोत्यांना आई-बापाची उपमा, स्थान दिल्यामुळे त्यांच्या हदयाला पाझर फुटला नसेल का ? श्रोत्यांना एकरुप करण्याची माऊलींची ही अनुपम हातोटी आहे. माऊलीची ही हातोटी तुम्हा-आम्हाला जर आली तर आपल्यासारखा भाग्यवंत दुसरा कोण असणार ? ही हातोटी आपणाला येणे आवश्यक असल्यामुळे आपण प्रयत्नशील राहायला हवे. या ओव्यांच्या माध्यमातून होत असलेला माऊलींचा हा सहवास आपणाला ही हातोटी प्राप्त करुन देईल यात शंका वाटत नाही. जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार,
दि. ४ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - फाल्गुन कृ प्रतिपदा
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- स्वाती (२१.३४)
योग - हर्षण (१४.१६)
करण - वणिज (२३.०१)
राहू काल : शनिवार
स. १०.३० ते १२.००

दिनविशेष : १९९०: प्रसिद्ध भारतीय गायिका लता मंगेशकर यांना चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर करण्यात आला. १९६८: नासाने 'अपोलो ६' हे मानवरहित अंतराळयान प्रक्षेपित केले.
आंतरराष्ट्रीय खाण जागरूकता दिन - दरवर्षी ४ एप्रिल रोजी भूसुरुंग आणि युद्धातील स्फोटक अवशेषांबद्दल जनजागृती करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

# सोलापूर बाजारात बेदाणा तेजीत

## ३०० रुपयांचा टप्पा पार; सात कोटींची उलाढाल

### शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत बेदाण्याच्या दरात लक्षणीय वाढ नोंदवली गेली असून, बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे. बाजारपेठांत झालेल्या सौद्यात बेदाण्याला प्रतिकिलो सरासरी ३०० रुपयांचा दर मिळाला, तर उत्कृष्ट दर्जाच्या मालाला तब्बल ४६१ रुपये प्रतिकिलो असा उच्चांक दर मिळाला. या व्यवहारातून एकूण ७ कोटी २९ लाख ९४ हजार ५०० रुपयांची उलाढाल झाली.

दरम्यान, याआधीच्या आठवड्यात बेदाण्याला प्रतिकिलो सरासरी २९० रुपये दर मिळाला होता. मात्र, यावेळी सरासरी दरात

### मागणी वाढल्याने दरात सुधारणा

बेदाण्याच्या दरवाढीमागे घटलेले द्राक्ष उत्पादन हे प्रमुख कारण असल्याचे व्यापाऱ्यांचे मत आहे. उत्पादन घटल्यामुळे बाजारात उपलब्धता कमी झाली असून, मागणी वाढल्याने दरात सुधारणा होत असल्याचे सांगितले जात आहे. आगामी काळातही हीच परिस्थिती कायम राहिल्यास दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. असे बेदाणा व्यापारी संघाचे अध्यक्ष अरुण बिराजदार यांनी सांगितले.



१० रुपयांची वाढ झाली असून, व्यापारी आणि शेतकऱ्यांसाठी ही सकारात्मक बाब मानली जात आहे. बाजारात गुणवत्तेनुसार दरात चढ-उतार दिसून आले. काळ्या दर्जाच्या बेदाण्याला १३० ते २२० रुपये, सर्वसाधारण मालाला २३० ते २८० रुपये, मध्यम दर्जाच्या मालाला ३०० ते ३३० रुपये, तर उत्कृष्ट दर्जाच्या बेदाण्याला ३३० ते ३८० रुपये दर मिळाला. यंदा शिर्पनहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेतकरी लक्ष्मण पौळ यांच्या बेदाण्याने बाजारात विशेष लक्ष वेधून घेतले. त्यांच्या ७१ बॉक्स (सुमारे ९ क्विंटल १५ किलो) मालाला प्रतिकिलो ४६१ रुपयांचा सर्वाधिक दर मिळाला. हा माल आडत व्यापारी बसवराज अंबारे यांनी खरेदी केला. बाजार समितीतील एकूण व्यवहाराचा आढावा घेतल्यास, १५ किलो वजनाच्या २५,८१६ बॉक्सची आवक झाली होती. यामध्ये सुमारे ३८७ टन वजनाचा माल बाजारात दाखल झाला. त्यापैकी १६,२२१ बॉक्स (२४३ टन) मालाची विक्री झाली, तर ९,५९५ बॉक्स (१४४ टन) माल विक्रीविना राहिला.

### बाजारपेठेत सकारात्मक वातावरण

द्राक्ष उत्पादन घटल्यामुळे बेदाण्याचा पुरवठा मर्यादित झाला आहे. त्यामुळे सध्याच्या दरात आणखी सुधारणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सोलापूर बाजारात बेदाण्याला मिळत असलेले वाढते दर शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत असून, बाजारपेठेत सध्या सकारात्मक वातावरण असल्याचे चित्र आहे.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### अंतरात्म्याचे दर्शन होणे हेच खरे आत्मतत्त्व

अंतरात्म्याचे दर्शन होणे हेच खरे आत्मतत्व आहे, असे प्रतिपादन निर्यापक जैन मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी सोलापूर येथे केले. आचार्य कुंदकुंद स्वामी यांच्या वाङ्मयावर आधारित 'कुंदकुंद का कुंदन' या ग्रंथातील 'निश्चय मोक्षमार्ग' आणि 'समयसार' ग्रंथातील गाथेचे विवेचन प्रवचनात ते बोलत होते.



श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने माणिक चौक येथील श्री महावीर सांस्कृतिक भवन येथे मुनीश्रींनी पाण्याचे उदाहरण देत सांगितले की, पाण्याचा रंग गढूळ दिसत असला, तरी त्यामध्ये स्वच्छ पाण्याचे अस्तित्व कायम असते. केवळ गढूळपणा पाहणे हा 'मोह' असून, त्यातील स्वच्छ पाण्याचा अंश ओळखणे हा 'योग' आहे. त्याचप्रमाणे मानवाने स्वतःच्या अंतरांगातील शुद्ध आत्मतत्त्वाचे दर्शन घेणे आवश्यक आहे. मुनी किंवा साधू हे सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चारित्र्य यांना शुद्ध आत्म्याच्या निश्चयानेच जाणत असतात. जेव्हा पंचेंद्रियांचे विषय आणि क्रोध-कषायांचा त्याग होऊन निर्विकल्प समाधी साधली जाते, तेव्हाच या तिन्हींचे खऱ्या अर्थाने मिलन होते. खऱ्या देवाची व्याख्या करताना मुनीश्री म्हणाले की, भगवान अरिहंत हे १८ दोषांपासून मुक्त आहेत. ज्यांच्यामध्ये भूक, तहान, भय, राग, द्वेष, चिंता, वृद्धत्व, रोग, मृत्यू, घाम, खेद, मद, रती, आश्चर्य, झोप, जन्म आणि उद्वेग असे दोष आढळत नाहीत, तेच सच्चे देव आहेत. निर्ग्रंथ मुनींशिवाय अन्य कोणी सच्चे गुरू नाहीत आणि जिनेन्द्र देवांनी उपदेशलेल्या जिनवाणीव्यतिरिक्त अन्य कोणतेही खरे शास्त्र नाही, अशी अढळ श्रद्धा ठेवणे हेच 'व्यवहार सम्यक दर्शन' आहे. जीवनातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत असताना सत्पुरुषांच्या उपदेशाचा स्वीकार करावा. दिगंबर मुनी हे मोक्षमार्गाचे खरे मार्गदर्शक असून त्यांच्या उपदेशाने मनुष्याचा कल्याणमार्ग सुलभ होतो, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

## २३ एप्रिलपासून बालकलाकारांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

बालरंगभूमी परिषद, शाखा सोलापूर सज्ज झाली आहे. परिषदेच्या वतीने दि. २३ ते २७ एप्रिल या कालावधीत सकाळी ७-३० ते ११. ३० (दररोज) चंद्रभागबाई यलगुलवार प्रशालेत कला-कौशल्य व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर भर देणारे असेल. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि त्यांच्यातील कलाकार घडवण्यासाठी अशा उपक्रमांची आज मोठी गरज आहे. उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करून मुलांनी या शिबिराद्वारे नवीन गोष्टी शिकाव्यात आणि स्वतःचा आत्मविश्वास वाढवावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद सोलापूरच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी पालकांनी ७३८५१९८३७४ । ९२२५७७६३५३ । ८६९८५४००७० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## शिवजन्मोत्सव मध्यवर्ती ट्रस्टतर्फे रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ संपर्क कार्यालय येथे आज श्री शिवजन्मोत्सव (मध्यवर्ती) महामंडळ ट्रस्ट यांच्या वतीने तसेच छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय रक्तपेढी, सोलापूर यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौरांच्या हस्ते रक्तदान केलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे,ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, राजन जाधव, माजी आमदार



रविकांत पाटील, मध्यवर्ती उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, नगरसेवक मनीष केत, बजरंग जाधव, गणेश शेळके, नामदेव पवार, विजय पुकाळे, नाना भोईटे, उत्तरा बरडे, उज्वला साळुंखे, विजय चव्हाण, लता ढेरे, अंबादास शेळके, शिवाजी वाघमोडे, श्रीकांत डांगे हरी सुरवसे, नागेश वडणे , प्रकाश ननवरे, वैभव गंगणे, महेश हनमे, भैय्या ताकभाते, सचिन स्वामी, देविदास घुले, शंतनू साळुंखे उपस्थित होते.



## रावजी सखाराम हायस्कूल येथे चित्रकला, निबंध स्पर्धेस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विवेक विचार मंच आणि भीम प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला आणि निबंध स्पर्धाचे आयोजन सम्राट चौक येथील कर्मवीर भाऊराव पाटील रयत शिक्षण अंतर्गत रावजी सखाराम हायस्कूल येथे घेण्यात आली. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी विवेक विचार मंचच्या जिल्हा संयोजिका आश्विनी चव्हाण, कार्यक्रम प्रमुख प्रीती उडाणशिव , भीम प्रतिष्ठानचे संस्थापक दलितमित्र बाबा बाबरे, सचिव अकबर शेख, यश उडानशिव, शहर संयोजक सिद्धांत बाबरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अमोल अंधारे, साजेदा बागवान, अण्णा दीक्षित, गजानन गोरे, अजहर शेख, अण्णासाहेब काकडे, प्रतिभा भोसले, महावीर आळंदकर , सुनिता पाटील यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य भारत केत यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन वंदना डांगे तर आभार रमेश वडवराव यांनी मानले.

# करमाळ्याच्या आश्लेषा बागडेची जिद्दीची 'कुस्ती'

## सोलापूर जिल्ह्याची पहिली आंतरराष्ट्रीय पैलवान



ग्रामीण भागातील मातीत खेळून जागतिक स्तरावर देशाचं नाव उज्ज्वल करणं ही काही साधी गोष्ट नाही. पण सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील अंजनडोह सारख्या छोट्या गावातून आलेल्या आश्लेषा कल्याण बागडे या महिला मल्लाने हे अशक्यप्राय स्वप्न सत्यात उतरवून दाखवलं आहे. अंगाला कुस्तीची कोणतीही कौटुंबिक परंपरा नसताना, निव्वळ स्वाभिमान आणि जिद्दीच्या जोरावर आश्लेषा आज महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्रातील एक 'सुवर्ण' नाव बनली आहे.

**अपमानातून पेटलेली ठिणगी**

आश्लेषाचा प्रवास थक्क करणारा आहे. वयाच्या दहाव्या वर्षी एका शालेय कबड्डी संघात तिला स्थान नाकारण्यात आलं होतं. तो नकार तिला इतका जिव्हारी लागला की, तिने मैदानावर स्वतःला सिद्ध करण्याचा ठाम निर्धार केला. याच जिद्दीतून ती कुस्तीच्या आखाड्यात उतरली. सुरुवातीला गावातील भैरवनाथ कारखान्यातील लाल मातीत तिने कुस्तीचे डावपेच शिकले. पुढे पुण्याच्या आळंदी येथील कुस्ती संकुलात मार्गदर्शक दिनेश गुंड यांनी या 'हिऱ्या'ला योग्य आकार दिला.

**यशाचा धडाका आणि ऐतिहासिक विक्रम**

आश्लेषाने आजवर कुस्तीच्या मैदानात अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. महिला महाराष्ट्र केसरीच्या सलग चार स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून तिने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे, सोलापुरात निर्झरा केअर फाउंडेशनच्या वतीने नुकत्याच झालेल्या चौथ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातून सुवर्ण पदक मिळवणारी ती एकमेव महिला खेळाडू ठरली.

याआगोदर आश्लेषाने कझाकीस्तान येथे झालेल्या आशियाई कुस्ती स्पर्धेत ५९ किलो वजनी गटात भारताला पदक मिळवून दिले आणि सातासमुद्रापार देशाची मान अभिमानाने उंचवली. सोलापूर जिल्ह्याला 'सीनियर नॅशनल' स्पर्धेसाठी पात्र ठरवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पदकाची अट



स्ट्रेट ड्राईव्ह
अजितकुमार संगवे
मो.9881133103



होती. आश्लेषाने रौप्य पदक मिळवून जिल्ह्यासाठी या स्पर्धेचे दरवाजे खुले केले. सोलापूरची पहिली महिला आंतरराष्ट्रीय पैलवान होण्याचा बहुमान तिने पटकावला आहे.

एवढी मोठी कामगिरी करूनही आश्लेषाचा प्रवास फुलांच्या पायघड्यांचा नव्हता. एका सामान्य शेतकरी कुटुंबातून येणाऱ्या आश्लेषाच्या कुस्तीचा सर्व खर्च तिचे वडील आणि कुटुंब स्वतः करत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचं नाव गाजवूनही अद्याप शासन किंवा कोणत्याही मोठ्या क्रीडा संस्थेकडून तिला अपेक्षित मदत मिळालेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. मध्यंतरी कर्नाटकच्या एका मोठ्या कंपनीने तिला सुविधा देण्याचे कबूल केले होते, मात्र तिथे सरावाची गुणवत्ता टिकत नसल्याचे लक्षात येताच तिने त्या सुविधा सोडून आपल्या सरावाला प्राधान्य दिले.

### लक्ष्य: २०२८चे ऑलिम्पिक!

आश्लेषा सध्या बीएच्या तिसऱ्या वर्षात करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात शिकत आहे. तिने आता आपले लक्ष २०२७-२८ च्या ऑलिम्पिक स्पर्धेवर केंद्रित केले आहे. उच्च दर्जाच्या सरावासाठी तिला हरियाणा येथे जायचे आहे. जर या गुणी खेळाडूला वेळीच शासकीय मदत किंवा एखाद्या दानशूर संस्थेचे पाठबळ मिळाले, तर ऑलिम्पिकच्या व्यासपीठावर भारताचा तिरंगा फडकवण्याची क्षमता या करमाळ्याच्या कन्येमध्ये निश्चितच आहे. अंजनडोहच्या लाल मातीतून सुरू झालेला हा प्रवास आता जगाच्या नकाशावर ठसा उमटवण्यासाठी सज्ज झाला आहे. गरज आहे ती फक्त एका मदतीच्या हाताची आणि विश्वासाची!





# उद्योगवर्धिनीतर्फे एमएसएमईच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

### महिला होणार आर्थिक स्वयंपूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या उद्योगवर्धिनीतर्फे सेवापाथेय उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिलाई आणि अरिवर्क प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन मॉडर्न हायस्कूल येथे करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर उद्योगवर्धिनीच्या संस्थापक अध्यक्षा चंद्रिका चौहान, कल्पना कुलकर्णी, रागिणी कुलकर्णी, अनुपमा हिराळकर, मुख्याध्यापिका शिल्पा जोशी उपस्थित होते. प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिबिरात मॉडर्न हायस्कूलमधील विद्यार्थिनींच्या माता पालकांना ब्लाऊज शिवणे, अरिवर्क प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ३० दिवसांचे हे शिबिर असून यात महिलांना विविध कौशल्ये शिकविण्यात येणार आहेत. याप्रसंगी तेजस्वी प्लास्टिकचे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद हिराळकर आणि आदिती हिराळकर यांनी सीएसआर निधी चंद्रिका चौहान यांच्याकडे सुपूर्द केला. उद्योगवर्धिनीच्या संचालिका ॲड. गीतांजली चौहान यांनी प्रास्ताविक केले. कीर्ती कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन तर सेवापाथेय प्रमुख स्मिता लाहोटी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी खजिनदार वर्षा विभूते, संचालिका मृणालिनी भूमकर, राजेश्वरी भूमकर, मीनाक्षी सलगर, धीरेन गडा, आशिष छाजेड, राजूभाई वोरा, ज्ञानेश्वर जाधव, चन्नवीर बंकुर, राघवेंद्र ग्यानबोटे, शिक्षिका कल्पना गोली, सहशिक्षिका लक्ष्मी उंब्रजकर, कविता वायलाल उपस्थित होते.

### प्रशिक्षणार्थीला शिलाई मशीन भेट

उद्योगवर्धिनीतर्फे घेण्यात आलेल्या बॅग तयार करण्याच्या पहिल्या प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षण घेऊन कौशल्यप्राप्त केलेल्या रुची क्षीरसागर या होतकरू प्रशिक्षणार्थीला उद्योजक सतीश मालू यांच्या वाढदिवसानिमित्त शिलाई मशीन भेट देण्यात आली.

## अंकुश चव्हाण यांना प्रतिष्ठित 'दक्षिणी कमान सरसेनापती प्रशंसा पदक' प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**



भारतीय सशस्त्र दलांसोबत कार्य करताना दाखवलेल्या उत्कृष्ट कर्तव्यनिष्ठा, निःस्वार्थ समर्पण आणि उल्लेखनीय सेवेबद्दल पुणे येथील संरक्षण जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण यांना प्रतिष्ठित 'दक्षिणी कमान सरसेनापती प्रशंसा पदक'(GOC-in-C जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, कमेंडेशन) प्रदान करून गौरविण्यात आले. ते केंद्र शासनाच्या भारतीय माहिती सेवेतील (आय.आय.एस) अधिकारी आहेत.

हा सन्मान दक्षिण कमांडचे सरसेनापती लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, पीव्हीएसएम, यूवायएसएम, एव्हीएसएम, जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, सदर्न कमांड पुणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, सन १९८४ नंतर हा मानाचा सन्मान प्राप्त करणारे श्री. चव्हाण हे पुणे येथील पहिले नागरी संरक्षण जनसंपर्क अधिकारी ठरले आहेत. (Civilian Defence PRO) त्यांच्या कार्यातील निष्ठा, समर्पण आणि उत्कृष्टतेची ही महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे. या सन्मानामुळे नागरी अधिकाऱ्यांच्या योगदानाची दखल घेतली जात असून, भारतीय सशस्त्र दलांसोबत प्रभावी समन्वय साधण्यात चव्हाण यांनी बजावलेली भूमिका अधोरेखित झाली आहे. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाचे ते विद्यार्थी आहेत. ते मोहोळ तालुक्यातील ग्रामीण भागातून येऊन उच्चपदस्थ ठिकाणी काम करीत असताना त्यांनी हा पुरस्कार पटाकावून सोलापूर जिल्ह्याची मान देशात उंचावली आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# आरोग्य व्यवस्थापनात सोलापूर महापालिका राज्यात दुसरी

## ९१ गुण मिळवून महापालिकेच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा

### महापालिका आरोग्य विभागाची उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

आरोग्य व्यवस्थापन व माहिती पध्दती अंतर्गत कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व नियमित लसीकरण कार्यक्रमाच्या फेब्रुवारी २०२६ अखेरच्या कामगिरीत सोलापूर महानगरपालिकेने ९१ गुण मिळवत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. १६ मार्च २०२६ रोजी जाहीर झालेल्या जिल्हा व महापालिकानिहाय अहवालात ही कामगिरी नोंदविण्यात आली असून आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित आहे. महापालिकेच्या शिरपेचात हा मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या कामगिरीबद्दल आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांच्यासह सर्व टीमचे अभिनंदन केले आहे. माता आरोग्य कार्यक्रमांतर्गत गरोदर माता नोंदणी ९७ टक्के, १२ आठवड्यांपूर्वी नोंदणी ८९ टक्के, गरोदर मातांचे लसीकरण ८९ टक्के, आयएफए-१८० गोळ्या वितरण १०३ टक्के तर प्रसुतीपूर्व चार तपासण्या १०१ टक्के इतक्या उच्च पातळीवर पूर्ण



झाल्या आहेत. अतिजोखमीच्या माता २७ टक्के नोंदविण्यात आल्या असून तीव्र रक्तक्षय असलेल्या केवळ ४ टक्के मातांपैकी ९७ टक्क्यांना उपचार देण्यात आले आहेत.

बाल आरोग्य कार्यक्रमात ६६ टक्के जिवंत जन्म नोंदविण्यात आले असून २.५ कि.ग्र. पेक्षा कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण १८ टक्के आहे. नियमित लसीकरणात हेप बी (६५ टक्के) व व्हिटामिन ए (८३ टक्के) वगळता इतर सर्व निर्देशांक ८८ ते ९२ टक्क्यांदरम्यान पूर्ण झाले आहेत. कुटुंब नियोजन कार्यक्रमात शस्त्रक्रिया ५१ टक्के, पीपीआययूसीडी ३६ टक्के आणि शासकीय संस्थांमधील प्रसूतींपैकी २३ टक्के प्रकरणांत पीपीआययूसीडी बसविण्यात आल्या आहेत.

जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजना, नसबंदी शस्त्रक्रिया, बालकांचे लसीकरण, कुपोषण नोंदणी व उपचार, रक्तक्षय तपासणी, कर्करोग तपासणी अशा विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आल्याची माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे आणि आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने ही कामगिरी साध्य केली असून डॉ. मंजिरी कुलकर्णी व आरसीएच स्टाफसह सर्व डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे यश आहे.

## महत्वाचे...



### मोडनिंब येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी

**मोडनिंब, दि. ३ एप्रिल-**

मोडनिंब (ता.माढा) येथील श्री मारुती मंदिरात हनुमान जयंती साजरी करण्यात आली. शनिवारी सकाळी श्री मारुती मंदिरात विशेष पूजन, अभिषेक व हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यात आले. मंदिर परिसर फुलांच्या माळांनी आकर्षकरीत्या सजवण्यात आला होता.दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची गर्दी पाहायला मिळाली.भक्तांकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये शेकडो गावकऱ्यांनी सहभाग घेतला. संध्याकाळी भजन संध्याचे आयोजन करण्यात आले. स्थानिक भजनी मंडळांनी सादर केलेल्या भजनांनी वातावरण भक्तिमय झाले.यावेळी गावातील सर्व भाविकांनी सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व युवा वर्गाची सक्रिय सहभागाने संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व आनंदमय वातावरणात पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय हनुमान मंदिर ट्रस्ट मोडनिंब, जय हनुमान भक्त परिवार आणि ग्रामस्थ, पुजारी गुरव यांनी परिश्रम घेतले.




### शेटफळ येथे सिद्धेश्वर यात्रेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन

**मोडनिंब, दि. ३ एप्रिल-**

शेटफळ (ता. मोहोळ) येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त येथे उपसरपंच दत्तात्रय उद्धव वागज यांच्या वतीने भाविकांसाठी पाच दिवसांचे मोफत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते मनोहर डोंगरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलिस निरीक्षक बाजीराव पोवार, जिल्हा परिषद सदस्य विजयराज डोंगरे, तसेच पीएसआय शेळके, राजेश वागज आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यात्रेसाठी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी मोफत महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. उपसरपंच दत्तात्रय वागज यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. श्री सिद्धेश्वर मंदिराजवळील जि.प. प्राथमिक शाळा परिसरात दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत महाप्रसाद दिला जात आहे.



### मोडनिंबमध्ये महावीर जयंती उत्साहात

**मोडनिंब, दि. ३ एप्रिल-**

येथील प्राचीन श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर व श्री मुनीसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदिर यांच्या वतीने महावीर जयंती साजरी करण्यात आली. शहरातून पालखी सोहळा व मिरवणूक काढण्यात आली. सकल जैन समाजाने आयोजित केलेल्या प्रभातफेरीत ''अहिंसा परमो धर्म'' आणि ''महावीर भगवान की जय'' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. सकाळी ७ वाजता मंदिरात अभिषेक पूजा व सायंकाळी ६.३० वाजता पाठशाळेतील विद्यार्थ्यांसाठी गुरुकुल पद्धतीवर आधारित प्रश्नोत्तर व पाठांतर स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेतील बक्षिसे अशोक साळवी यांच्यातर्फे देण्यात आली. यानंतर सायंकाळी ७.३० वाजता भगवान महावीर यांचा नामकरण विधी संपन्न झाला. यावेळी मातेचा मान निर्जरा सार्थक शहा, आत्याचा मान रचना रोहित शहा, तर मातेची ओटी भरण्याचा मान भाग्यश्री धीरज पुरवत यांनी घेतला. सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीरांच्या तैलचित्राची पालखी रथातून शहरातून काढण्यात आली. शोभायात्रेनंतर मंदिरात पंचामृत अभिषेक, पाळणा व आरती करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत कार्यालयात भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सखुबाई रामचंद्र ट्रस्टचे सारंग शहा, संस्थेचे अध्यक्ष विशाल मेहता, गुरसाळकर दादा, राहुल शहा, सुनील पुरवत, बाहुबली मेहता, नीलेश गुरसाळकर, अजित खडके, राहुल गांधी, रोहित गांधी, अरुण कळसकर, शितल गांधी, परिमल दोशी, राजकुमार शहा, सुबोध रामढवे, प्राजक्त शहा, प्रितम शहा, संकेत पुरवत उपस्थित होते.

### निष्काळजीपणाने ट्रॅक्टर चालवल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**


रस्त्याचा अंदाज न घेता, ट्रॅक्टर निष्काळजीपणाने चालवून एका व्यक्तीचा पाय, ट्रॅक्टरच्या मागील ट्रॉलीच्या डावीकडील चाकामध्ये सापडला. या अपघातात त्या व्यक्तीला गंभीर जखमी करून त्यांना उपचारास दवाखान्यात न नेता अज्ञात ट्रॅक्टर चालक पळून गेला. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला आहे. दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी तुकाराम महादेव मैले, वय ६४, रा. आदर्श नगर, सोलापूर यांच्या सायकलीस जुळे सोलापूर येथे अज्ञात ट्रॅक्टर चालकाने रस्त्याचा अंदाज न घेता, ट्रॅक्टर हायगइने, निष्काळजीपणाने चालवून तुकाराम यांचा उजवा पाय, ट्रॅक्टरच्या मागील ट्रॉलीच्या डावीकडील चाकामध्ये सापडला. या अपघातात तुकाराम यांना गंभीर जखमी करून त्यांना उपचारास दवाखान्यात न नेता अज्ञात ट्रॅक्टर चालक पळून गेला. यामध्ये तुकाराम मैले यांचा मृत्यू झाला आहे. याबाबत अज्ञात ट्रॅक्टर चालका विरोधात दि. १ एप्रिल रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मोरे पाटील करत आहेत.

### 'अनुरूप'चा ब्राह्मण वधू-वर मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

अनुरूप वधू-वर सूचक केंद्र, सोलापूरच्या वतीने भगवान श्री परशुराम जयंतीनिमित्त सर्व शाखीय ब्राह्मण वधू-वर मेळावा रविवार दिनांक २९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षण संस्था सभागृह, दत्त चौक ,सोलापूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अनुरूप वधू वर केंद्राचा हा ५२ वा वधू वर मेळावा होता. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार शाम जोशी , प्रेरणाताई रानडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर देगावकर व प्रमुख पाहुणे जेष्ठ पत्रकार दत्तात्रय आराध्ये उपस्थित होते. कार्यक्रमास दीडशे वधू-वरांची नोंदणी झाली . सदर कार्यक्रमाची पीडीएफ किंवा पुस्तिका अक्षय तृतीयेच्या दिवशी प्रसिद्ध जाणार आहे. वधू-वर मेळाव्यात नोंदणी न केलेल्या वधू-वरांसाठी १५ एप्रिलपर्यंत नोंदणी घेण्यात येणार आहे. समाज बांधवांनी याचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्र. ९८८११३३१२२ संपर्क साधावा. मेळाव्यात

प्रथम, घटस्फोटीत, विधवा, विधूर, पुनर्विवाह इच्छुकांची नोंदणी करण्यात आली. सूत्रसंचालन भूषण रानडे यांनी केले आहे.



### महापालिकेच्या वतीने शिवाजी महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील मा.महापौर यांच्या कार्यालयात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका श्रध्दा पवार, नगरसेविका मृण्मयी गवळी, नगरसेविका कल्पना कदम, नगरसेविका सोनाली गायकवाड, मध्यवर्ती अध्यक्ष जयवंत सलगर, पद्माकर नाना काळे,संतोष कदम,कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसुळे,विजय पुकाळे, किरण पवार, सुजीत चौगुले, राजेश हेबळे, बोजराज पवार, भास्कर सामलेटी आदी मान्यवर उपस्थिती होते.

### अर्धवेळ स्त्री परिचर सावित्रींच्या कृतिशील वारसदार : तानाजी ठोंबरे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ एप्रिल-**

समाजातील काही लबाड प्रवृत्तींच्या फसवणुकीमुळे पुण्यात महिलांवर आत्महत्येची वेळ आलेली होती. आत्महत्या रोखण्यासाठी घरात बालकाश्रम काढून गर्भवतींचे बाळंतपण आणि बालकांचा सांभाळ करून आरोग्य सेवेचा नवा आदर्श निर्माण केलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या खऱ्या वारसदार गाव खेड्यात काम करणाऱ्या अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचार आहेत. तीन हजारावरून सहा हजारांचे मानधन झाले याचा आनंद आहे. भविष्यात पूर्ण वेळ कर्मचारी मान्यतेसाठी लालबावटा युनियन कायम लढत राहील असा आशावाद कॉम्रेड तानाजी ठोंबरे यांनी व्यक्त केला. या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून निलेश दातखीळे, ए. बी. कुलकर्णी, लहू आगलावे, श्रीकांत कांबळे, अनिरुद्ध नखाते, लहू आगलावे, राजेंद्र करली, विक्रम तडकापल्ली, यशवंत फडतरे, शकुंतला गोली आदी उपस्थित होते.



### सुयोग वारघडे यांची जिजामाता प्रशालेस भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

विज्ञान आश्रम पाबळ यांच्यामार्फत सुयोग वारघडे यांची व्यावसायिक शिक्षण संदर्भात जिजामाता प्रशाला कोंडी येथे निरीक्षणात्मक प्राथमिक सदिच्छा भेट दिली. या प्रकल्पासाठी संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पा ठोकळ यांचे प्रेरणेने मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या नियंत्रणाखाली कौशल्य शिक्षणचे जिल्हा समन्वयक सारंग पाटील यांच्या नियोजनाने स्क्रुटीनी करण्यात आली. त्याप्रसंगी प्रशालेचे सहशिक्षक लक्ष्मण आगलावे, सारंग पाटील, विजयकुमार लांडगे, कैलास देशमुख, सुनिता वणगे, संतोष क्षीरसागर, संतोष कासे उपस्थित होते.

### सौर ऊर्जा तज्ञ अभय यावलकर यांचे पंढरपुरात आज व्याख्यान

**पंढरपूर, दि.३ एप्रिल-**



मराठी विज्ञान परिषद, पंढरपूर तालुका विज्ञान मंडळ व सावरकर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने सौर उर्जा काळाची गरज या विषयावर शनिवारी (दि.४) व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सौर उर्जा तज्ञ अभय यावलकर हे या मध्ये मार्गदर्शन करणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते यांनी दिली. येथील सावरकर वाचनालय स्टेशन रोड पंढरपूर येथे शनिवार (दि.४) एप्रिल रोजी सायंकाळी ५.४५ वाजता या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

### चैत्र पौर्णिमेनिमित्त चौंडेश्वरी मातेची आरती

#### प्रत्येक पौर्णिमेस पूजा, महाआरती महाप्रसादाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३ एप्रिल -**

श्री. चौंडेश्वरी मंदिर करकंब येथे चैत्र पौर्णिमे निमित्त करकंब कोष्टी समाज बांधव, भगिनींच्या वतीने श्री.चौंडेश्वरी मातेची पूजा व महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. श्री. चौंडेश्वरी मातेची पूजा व आरती साधना टकले, उर्मिला करपे, चैताली वास्ते, निर्मला फासे, स्वप्नाली शिलवंत या कोष्टी समाज भगिनींच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी या भगिनींच्या चेहऱ्यावर पूजा व आरतीचा मान मिळाल्याबद्दल समाधान व आनंद दिसून येत होता.

याप्रसंगी मिष्ठान्न महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यापुढे



प्रत्येक पौर्णिमेस पूजा व महारतीचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याप्रसंगी कोष्टी समाज बांधव, भगिनीनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले. यावेळी चंद्रकांत रसाळ, जयंत टकले, प्रभाकर रसाळ, संजीवकुमार म्हेत्रे, संजय दुधाणे, जयंत फासे, गणेश दुधाणे, यश टकले, ज्ञानेश्वर दुधाणे, विजय दुधाणे, गुरुप्रसाद दुधाणे, आशा टकले, राधा कवडे, अनुपमा दुधाणे, अंजली फासे, उषा म्हेत्रे, मंगल टकले उपस्थित होते.

### 'सिंहगड'मध्ये नवोपक्रमक, उद्योजकता कौशल्य विकास शिबीर

#### दि. ६ ते १० एप्रिल दरम्यान आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव (सोलापूर) येथे दि. ६ ते १० एप्रिल या कालावधीत इनोव्हेशन, डिझाईन अँड एंटरप्रेन्योरशिपबाबत मार्गदर्शन (बूटकॅम्प)शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

हा बूटकॅम्प अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल यांच्या पुढाकारातून आयोजित केला जात असून, वाधवानी फाउंडेशन (ज्ञान भागीदार) व एसबीआय फाउंडेशन (संस्थात्मक भागीदार) यांचे सहकार्य लाभले आहे. या बूटकॅम्पसाठी एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाची राष्ट्रीय पातळीवर 'नोडल सेंटर' म्हणून निवड करण्यात आली आहे. सोलापूर येथील या नोडल सेंटरमध्ये सुमारे २५० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

या वर्षी जम्मू-काश्मीर, ईशान्य भारत तसेच टियर-२ व टियर-३ शहरांमध्ये बूटकॅम्पचे आयोजन केले जात आहे. बूटकॅम्पचे उद्घाटन ६ एप्रिल रोजी ICTE मुख्यालय, नवी दिल्ली येथून प्रा. योगेश सिंह यांच्या हस्ते, सदस्य सचिव डॉ. श्यामा राठ यांच्या उपस्थितीत आभासी माध्यमातून होणार आहे. सोलापुरात स्थानिक स्तरावर लक्ष्मी हायड्रॉलिक्स कंपनीचे चेअरमन निरंजन सिंघवी व सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. चौथ्या दिवशी स्थानिक इनोव्हेशन इकोसिस्टम व सांस्कृतिक स्थळांना भेट देण्यात येणार असून, पाचव्या दिवशी अनुदान, फंडिंग संधी व बौद्धिक संपदा हक्क यावर विशेष सत्र आयोजित करण्यात येणार आहे.

अंतिम दिवशी पिचिंग सत्र होऊन प्रत्येक ठिकाणी सर्वोत्तम पाच संघांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात येतील. पहिल्या दोन आवृत्त्यांमध्ये देशभरातील ४६ ठिकाणी १० हजारहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून अनेकांनी स्टार्टअप सुरू करून विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण कामगिरी केली आहे. या उपक्रमामुळे सहभागी विद्यार्थ्यांना वास्तव जीवनातील समस्यांवर अभिनव उपाय विकसित करण्याची संधी मिळणार आहे, असा विश्वास प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेस कार्यक्रम समन्वयक प्रा. सुनिल शाखापुरे, डॉ. मुदस्सर नाईकवाडी, प्रबंधक डॉ. डी. आय. नवले आणि जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे आदी उपस्थित होते.

#### देशभरातील ३० ठिकाणी तीन टप्प्यांत शिबिर

देशभरातील ३० ठिकाणी तीन टप्प्यांत हा बूटकॅम्प आयोजित करण्यात येत असून, त्यात पहिला टप्पा ६ ते १० एप्रिल (१३ ठिकाणे), दुसरा टप्पा २० ते २४ एप्रिल (१३ ठिकाणे) आणि तिसरा टप्पा ११ ते १५ मे (४ ठिकाणे) या कालावधीत पार पडणार आहे. एकूण सुमारे ६,५०० विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित असून, त्यात स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (डखक) मधील सहभागी व विजेते, इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल (खखउ) संस्थांचे विद्यार्थी तसेच नवकल्पनात्मक आयडिया किंवा प्रोटोटाइप असलेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

### नीतीन वैद्य – एक अफाट वाचक

**चार एप्रिलच्या प्रिसिजन वाचन अभियानात सोलापूरचे प्रसिद्ध लेखक नीतिन वैद्य यांची मुलाखत होणार आहे. तसेच त्यांच्या 'वाचून उरणारी पुस्तके' या पुस्तकाचे प्रकाशनही होणार आहे. त्यांच्या कार्याचा परिचय करुन देणारा हा लेख.**

नीतिन वैद्य हे नाव पहिल्यांदा लक्षात राहिलं ते 'लोकसत्ता'चा महावाचक म्हणून त्याची निवड झाली तेव्हा ! पुढे कधीतरी सरदेशमुख सरांच्या घरी ओळख झाली असावी. सरांच्या आयुष्यातलं त्याचं स्थान आणि महत्व समजलं ते सर गेल्यावरच ! अंतिम समयी सरांनी आपला सारा साहित्यखजिना नीतिनच्या हवाली केला. त्यानेही कमालीच्या निगुतीने, चिकाटीने त्यांच्या सर्व साहित्याचा शोध घेतला. त्यासाठी त्याने अफाट कष्ट केले आणि सरांच्या समग्र साहित्याची सूची तयार केली. एका अर्थी सरांचं हे भाग्यच, की त्यांना असा विलक्षण अनुयायी लाभला. सरांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्याने त्याच्या साहित्याचा जो जागर केला, तो अभूतपूर्व होता.

पुढे त्याने आणि जयंत राळेरासकर यांनी 'आशय'चे जे अंक काढले, त्यांची साहित्यिक महत्ता फार मोठी होती. कसलंही आणि कुणाचंही पाठबळ नसताना, त्यांनी अतिशय कष्टपूर्वक आणि निव्वळ उत्कृष्ट साहित्याच्या ओढीने 'आशय'चे अंक काढले, याचं मोल करता येणंच शक्य नाही.

नंतर लोकमंगल साहित्य पुरस्काराच्या निवड समितीवर आम्ही एकत्र काम केलं, अजूनही करत आहोत. या काळात त्याचं



अफाट वाचन, नव्याजुन्या पिढीतल्या साहित्यिकांशी, समीक्षकांशी असलेले त्याचे सौहार्दाचे, मैत्रीचे संबंध लक्षात येत गेले. तो निव्वळ वाचक नाही, तर एक चांगला मर्मज्ञ , रसग्राही समीक्षक आहे, त्यामुळे वाचलेल्या पुस्तकांवर तो रसग्रहणात्मक लेख लिहितो. यामुळेच नवेजुने लेखक आपली नवी पुस्तकं त्याला आवर्जून भेट म्हणून पाठवतात, त्याला आपल्या पुस्तकांसाठी ब्लर्ब लिहायला सांगतात , त्याने कुठे त्या पुस्तकांचा उल्लेख केला तर धन्य धन्य पावतात .

अलीकडे त्याचं हिंदी पुस्तकांचं वाचनही प्रचंड वाढलं आहे , ही गोष्ट तर थक्क करणारी आहे . त्यातही केवळ लोकप्रिय साहित्य न वाचता , वेगळ्या वळणाने जाणाऱ्या , विभिन्न विषयांवर लिहिणाऱ्या लेखकांची पुस्तकं तो वाचत असतो आणि अशा पुस्तकांचा परिचय अन्य वाचकांना करून देत असतो . 'पुण्यनगरी'मध्ये त्याने या संबंधी अनेक लेख लिहिले होते .

त्याच्या या कार्यात त्याची पत्नी आणि दोन्ही मुली यांची अनमोल साथ आहे . हा एक अत्यंत भाग्याचा योग आहे . असा हा खंदा वाचक आपल्या गावात राहतोय , ही खरोखर भूषणावह गोष्ट आहे , आपल्या शहराची सांस्कृतिक महत्ता वाढवणारी गोष्ट !

**- शिरीष देखणे**

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ‘शिवालय’च्या वतीने शिवछत्रपतींना अभिवादन

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

शिवालय सामाजिक बहुद्देशीय संस्थेच्या वतीने शिवछत्रपतींच्या स्मृती दिनानिमित्त छत्रपती शिवाजीमहाराज चौकात उद्योजक प्रमोद मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षण मंडळाचे माजी विरोधी पक्षनेते शशी थोरात, मराठा सेवा संघाचे राम गायकवाड, शिवालयचे संस्थापक प्रकाश शिंदे, विकास मामा गायकवाड, राजू पुणेकर, निलेश शिंदे , विनोद शिंदे, शिवा कलशेट्टी, महेश पवार, किरण शिंदे, स्वराज्य चव्हाण उपस्थित होते.



# नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्यासमोर पंढरपूरच्या प्रलंबित विकासकामांना गती देण्याचे आव्हान

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.३ एप्रिल-**

सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूर येथे बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी नियुक्त झालेले नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या पुढे तीर्थक्षेत्र पंढरपुरातील प्रलंबित विविध विकास कामांना गती देण्याचे मोठे आव्हान असणार आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांची तडकाफडकी नागपूर येथे बदली झाली. त्यांच्या जागी कार्तिकेयन एस. यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्विकारला.

महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून देशभर प्रसिध्द असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूर बद्दल राज्य तसेच केंद्र शासनातील राज्यकर्त्यांचे विशेष लक्ष आहे. कारण केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभर पसरलेल्या वारकरी सांप्रदायाची मने जिंकावयाची असतील तर पंढरपूरचा सर्वांगाने विकास साधणे आवश्यक आहे हे या राज्यकर्त्यांनी अचूक हेरलेले आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी, उज्जैनच्या धर्तीवर तीर्थक्षेत्र पंढरपूरचा विकास झाला पाहिजे यासाठी पंढरपूर कॉरिडोरची घोषणा केलेली आहे. या संदर्भात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी मुंबई येथे मध्यंतरी पंतप्रधानाची तिर्थक्षेत्र पंढरपूरसंदर्भातील भूमिका देखील विषद केलेली आहे.

पंढरपूरचा नावलौकीक येथील विठ्ठल रखुमाईच्या वास्तव्याने देशभर नव्हे तर साता समुद्रापार पोहचलेला आहे. येथे भरणाऱ्या आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री यात्रांसाठी लाखोंच्या संख्येने भाविक येथे येत असतात. या बरोबरच पंढरपूरात दररोज देखील ५० ते ६० हजार भाविकांचा राबता असतो. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, शहरातील नागरिकांना जास्तीत जास्त सेवासुविधा कशा प्राप्त होतील यासाठी राज्य शासनाकडून देखील विशेष प्रयत्न केले जात



आहेत. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांचे पंढरपूरवर विशेष लक्ष आहे. त्यामुळेच पंढरपूरसाठी आत्तापर्यंत केंद्र शासनाच्या नमामी गंगेच्या धर्तीवर राज्यशासनाकडून नमामी चंद्रभागा अभियान, वाराणसी, उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडोर तसेच येथील विठ्ठल मंदिराला पुरातन लुक देण्यासाठी सुरु असलेले विकास काम या बरोबरच पंढरपूरातील अरुंद गल्लीबोळातून मोठ्या यात्रांच्यावेळी मोठी गर्दी होत असल्याने राबविला जाणारा डी.पी.प्लॅन आदींची कामे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी काही प्रमाणात मार्गी लावलेली आहे. मात्र आशीर्वाद यांना ती प्रत्यक्ष राबविता आली नाहीत. कारण यासाठी त्यांच्याकडून आत्ता पर्यंत नुसत्या तारीख पे तारीख दिल्या गेल्या. काही दिवसांपूर्वीच पंढरपूर कॉरिडोर प्रकल्पास येत्या दोन ते तीन महिन्यात सुरुवात केली जाईल असे आशीर्वाद यांनी जाहीर केले आहे. वारकरी सांप्रदायाच्या दृष्टीने कुंभमेळ्यापेक्षा अधिक महत्वाचा असलेला आषाढी यात्रेचा सोहळा देखील अवघ्या दोन ते तीन महिन्यावर येवून ठेपलेला आहे. त्या अगोदर दर तीनवर्षातून एकदा येणारा धोंडा महिना किंवा अधिकमास आहे. त्या महिनाभरात देखील भाविकांची मोठी गर्दी येथे होणार हे गृहित धरुन विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पालिका यांच्याकडून योग्य प्रकारे नियोजन करुन घेण्याचे कसब जिल्हाधिकाऱ्यांना पार पाडावे लागणार आहे.

यापूर्वी कोणत्याही जिल्हाधिकाऱ्याने पंढरपूरात केलेल्या विशेष कामांमुळे तो अधिकारी प्रसिध्दीच्या झोतात आल्याचे आपण पाहिलेले आहे आणि ज्याने विशेष मेहनत घेऊन काम केलेले नाही अशा आधिकाऱ्यांना राज्यकर्त्यांकडून नजरेआड केल्याची देखील अनेक नावे सांगता येण्यासारखी आहेत. त्यामुळे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या समोर तिर्थक्षेत्र पंढरपूरातील विकासकामांच्या आव्हानांचा डोंगर उभा ठाकला आहे. या मधून जिल्हाधिकारी कसा मार्ग काढून पंढरपूरातील प्रलंबित असलेल्या विविध विकास कामांना कशी गती प्राप्त करुन देतात हे पाहणे येत्या काळात ओत्सुक्याचे ठरणारे आहे.

### श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेचे दर्शन घेऊन पदभार स्विकारला

जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी शुक्रवारी पंढरपूरात येवून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. त्यांनंतर जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्विकारला. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे व नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी सत्कार केला. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले उपस्थित होते. यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, सदर कामाची माहिती कार्तिकेयन एस. यांनी घेतली. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात आलेल्या कामांची माहिती यावेळी दिली. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने नवनियुक्त जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

### कॉरिडोरबाबत तारेवरची कसरत

पंढरपूरातील नागरिक तसेच केंद्र व राज्यशासना मध्ये सुवर्णमध्य साधित कार्तिकेयन यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीमप्रोजेक्ट असलेला पंढरपूर कॉरिडोर प्रकल्प राबविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.कॉरिडोर बाबत देखील आशीर्वाद यांनी बऱ्यापैकी काम करुन ठेवलेले आहे. मात्र कॉरिडोर प्रकल्पाला मंदिर परिसरातील संभाव्य बाधित नागरिकांचा विरोध आहे. त्यामुळे मध्यंतरी पालकमंत्री गोरे तसेच आमदार समाधान आवताडे यांनी देखील हा महत्वकांशी प्रकल्प आता शासनस्तरावर अंतिम टप्प्यात आलेला असून लवकरात लवकर तो राबविला जाणार असल्याचे सूतोवाच केले आहे. त्यामुळे या प्रकल्पातील बाधित नागरिकांशी संवाद साधुन कॉरिडोरसाठी जिल्हाधिकारी यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

### विठ्ठल मंदिराचे कामही अगदी संथ गतीने

विठ्ठल मंदिराचे कामही अगदी संथ गतीने सुरु आहे. मध्यंतरी निधीअभावी हे काम देखील ठप्प झालेले होते. मात्र काही दिवसांपूर्वीच निधीची तरतूद झाल्याने पुन्हा काम सुरु झालेले आहे. मंदिराचे हे काम देखील दोन, तीन टप्प्यात होणार आहे. मात्र, पहिल्या टप्प्यालाच जर ऐवढा वेळ लागत असेल तर पुढच्या टप्प्यांचे काय असा सवाल देखील महाराज मंडळी तसेच वारकरी भाविकांमधून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे सुरु असलेल्या कामासाठी देखील निधीची योग्य प्रकारे तरतूद कशी होईल यासाठी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांना सतत शासनदरबारी पाठपुरावा करावा लागणार आहे.

# केंद्रीय सशस्त्र पोलिस दल सुधारणा विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवा

### लोकसभेत सीपीएफ सुधारणा विधेयकवर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ एप्रिल-**

केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीपीएफ) सुधारणा विधेयक, २०२६ वर लोकसभेत बोलताना माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सरकारच्या धोरणांवर बोलताना जवानांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवला.

खा.मोहिते पाटील यांनी आपल्या भाषणात आयपीएस आणि सीपीएफ अधिकाऱ्यांमधील असमानतेचा मुद्दा ठळकपणे मांडला. विधेयकानुसार आयजी स्तरावरील ५०%, डीजी स्तरावरील ६७% आणि डीजी स्पेशल स्तरावरील १००% पदे आयपीएस अधिकार्यांसाठी राखीव ठेवण्यात आली असल्याचे सांगत त्यांनी ही तरतूद अन्यायकारक असल्याचे म्हटले.

सीपीएफ मधील अनुभवी अधिकारी सर्वोच्च पदांपासून वंचित राहतात, असे त्यांनी नमूद केले. पदोन्नती प्रक्रियेतील विलंबाचाही त्यांनी मुद्दा उपस्थित केला. CPF अधिकार्यांना १६ वर्षांनंतरही पदोन्नतीसाठी प्रतीक्षा करावी लागते, तर खझड अधिकारी कमी कालावधीत अनेक पदोन्नत्या मिळवतात, अशी तफावत त्यांनी अधोरेखित केली. जवानांच्या मानसिक आरोग्य आणि सेवा अटींबाबतही त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. २०२१ ते २०२५ दरम्यान सुमारे ७५० जवानांनी आत्महत्या केल्याची तसेच ४६ हजारांहून अधिक जवानांनी नोकरी सोडल्याची आकडेवारी त्यांनी सभागृहात मांडली. सध्या सुमारे ९३ हजार पदे रिक्त असल्याचे सांगत त्यांनी ही परिस्थिती चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले.



मूलभूत सुविधांच्या अभावावर बोलताना, पेन्शन, निवास आणि आरोग्य सेवांबाबत विधेयकात कोणतीही ठोस तरतूद नसल्याचा आरोप त्यांनी केला. निवृत्त जवानांना उपचारासाठी सीजीएचएश अंतर्गत १०० ते १५० किलोमीटर प्रवास करावा लागतो, ही बाब दुर्दैवी असल्याचे सांगत प्रत्येक तहसील किंवा शहरात मल्टिस्पेशालिटी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

तसेच, हे विधेयक सखोल चर्चेविना आणि संसदीय स्थायी समितीकडे न पाठवता घाईघाईने मांडण्यात आल्याची टीकाही त्यांनी केली. विधेयकावर होणारा खर्च ‘शून्य’ दाखवण्यात आल्याने सरकार जवानांच्या कल्याणासाठी गंभीर नसल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे जेपीसी पाठवून सखोल चर्चा करण्याची मागणी केली. जवानांना समान संधी आणि आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



### विठाई नगरात हनुमान जयंती उत्साहात

**दक्षिण सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

मंद्रूप येथील विठाई नगर येथील हनुमान मंदिरात श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा पार पडला. पहाटे राजकुमार अतार महाराज यांनी महाभिषेक करून पूजा केली. त्यानंतर विविध धार्मिक विधी संपन्न झाल्यावर भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली. हनुमान जयंतीनिमित्त सकाळी जन्मोत्सव सोहळा पार पडल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, तर सायंकाळी भजनाचा कार्यक्रम झाला. हनुमान जयंती पार पाडण्यासाठी राजकुमार अतार, संतोष तेली, राजु दळवी, गजानन सुतार, सलीम तांबोळी, सुभाष शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामसत्तेवर ‘ब्युरोक्रसी’चा ताबा; तिजोरीच्या चाव्या बीडीओंकडे?

### सरपंच फक्त नामधारी; आर्थिक निर्णयांवर पूर्ण निर्बंध

### ग्रामविकास विभागाच्या सूचनांनी राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण; कारभारात मोठा बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या कारभारात मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली असून, निधी खर्चाचे अधिकार गटविकास अधिकाऱ्यांकडे (बीडीओ) सोपवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर प्रशासक म्हणून काम करणाऱ्या सरपंचांना आर्थिक व धोरणात्मक निर्णय घेण्यास मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट मनाई केल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे.



सोलापूर जिल्ह्यातील सुमारे १५ हजार ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने विद्यमान सरपंच व सदस्यांना तात्पुरती मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, या कालावधीत ते प्रशासक म्हणून कार्यरत असले तरी त्यांना कोणतेही आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे विकासकामांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर विकासनिधी परत जाऊ नये, यासाठी पर्यायी उपाययोजना म्हणून निधी खर्चाचे अधिकार गटविकास अधिकाऱ्यांना देण्याबाबत विचार सुरू आहे.

ग्रामविकास विभागाने या संदर्भात सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकेवरील सुनावणीनंतर हा निर्णय पुढे आला आहे. सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्यात आले असले तरी त्यांना धोरणात्मक किंवा आर्थिक निर्णय घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कारभारावर मर्यादा येत आहेत. न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत कोणतीही नवीन आर्थिक किंवा धोरणात्मक कारवाई न करण्याचेही स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी निधी खर्च करण्यासाठी घाईगडबड करू नये, तसेच न्यायालयीन आदेशांचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश ग्रामविकास विभागाकडून देण्यात आले आहेत. एकंदरित, न्यायालयाच्या निर्णयामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या कामकाजावर मर्यादा आल्या असून, विकासनिधी वेळेत खर्च करण्यासाठी प्रशासनासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. पुढील न्यायालयीन निर्णयानुसारच या प्रक्रियेचा अंतिम मार्ग निश्चित होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### गटविकास अधिकाऱ्यांना निधी खर्चाचे अधिकार देण्याची शक्यता

मंजूर विकासनिधी वाया जाऊ नये यासाठी पर्यायी यंत्रणा उभी करण्याची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर, न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांना निधी खर्चाचे अधिकार देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, हे अधिकार देताना पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

# अर्धनारी नटेश्वराचा साड्यांचा कार्यक्रम उत्साहात

### शोभेच्या दारुकामाने उजळली वेळापूर नगरी

### शाळेच्या कार्यक्रमाला भाविकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ एप्रिल-**

वेळापूर येथील श्री अर्धनारी नटेश्वराचा साड्याचा कार्यक्रम गुरुवार २ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास हजारो भाविकांच्या साक्षीने हर हर महादेवाच्या जय घोषात संपन्न झाला.

डफडे व हलगीच्या निनादात निघालेली कावड यात्रा व शोभेच्या दारु कामाने वेळापूर नगरी उजळून निघाली. रात्री ८.३० वाजता अर्धनारी नटेश्वरला पुजेचे मानकरी गंगाधर होडगे यांचा साड्याचा मानाचा पोशाख देशपांडेच्या वाड्यातून लता होडगे, मानकरी गौरीशंकर गाढवे, शामराव गाढवे, अक्षय गाढवे, आकाश गाढवे, श्रीशैल गाढवे, प.स. सदस्या विमलताई जानकर,मिलींद सरतापे, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, यात्रा कमिटी अध्यक्ष काशिनाथ आडत, उपाध्यक्ष अॅड विठ्ठल मंडले, उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार, सदस्य



मनोहर माने, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, महादेव म्हेत्रे, शिवाजी सावंत, युवराज मंडले, शिवाजी मंडले, धनंजय शिवपूजे, राहुल सराटे, व होडगे आणि देशपांडे परिवार आदी सर्वांनी मानाचा आहेर वाजत गाजत अर्धनारी नटेश्वराच्या मंदिरात आणला.

रात्री ११.०० सुमारास मानाच्या सर्व कावडी मंदिरात येण्यास सुरुवात झाली. सर्व मानाच्या कावडी देवाच्या दारात आल्यानंतर रात्री १ वाजता देवाच्या साड्याचा कार्यक्रम विधिवत पुजेला सुरुवात झाली. यावेळी शोभेचे दारुकाम करण्यात आले. यावेळी देवाची विधीवत पूजा व आरती होऊन पालखी मधील महादेवाला व पार्वतीला बाशिंगे बांधण्यात आली. त्या ठिकाणी पालखी मधील देवाची आरती होऊन साड्याचा कार्यक्रम रात्री २:०० वाजता संपन्न झाला. यानंतर भाविकांनी देवाची पालखी खांद्यावर घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी निघाली असता भाविकांनी पालखीतील अर्धनारी नटेश्वरावर फुलांचा वर्षाव केला.

यानंतर पालखी गावाला प्रदक्षिणा घालण्यासाठी मंदिराच्या प्रवेश दारापाशी आणण्यात आली. व तेथून देवाची पालखी सर्व मानाच्या कावडी समवेत मिरवणुकीने वाजत गाजत निघाली. पहाटे उशीरा ग्राम प्रदक्षिणा नंतर देवाची पालखी व सर्व कावडी मंदिरात आणण्यात आल्या. देवाच्या साड्याच्या कार्यक्रमाचे पोरोहित्य पुजारी गौरीहर गुरव, सतीश गुरव, रविराज गुरव, महेश स्वामी, विवेक जोशी यांनी केले. तसेच देवाच्या साडीच्या कार्यक्रमादिवशी रात्री अघोरी बाबा यांचा कार्यक्रम पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. साड्याच्या कार्यक्रमानिमित्त मंदिर परिसरात फुलांची व केळींच्या खुटांची सुंदर अशी सजावट केली होती.

देवाच्या नंदिला झूल घालण्यात आली होती. मंदिराच्या आत मध्ये व परिसरामध्ये लाईटच्या माळा टाकून सुंदर असे सुशोभीकरण करण्यात आले होते. साड्याच्या कार्यक्रमाला शंकरराव काकुळे, सुरेश पिसे, जीवन जानकर, धनंजय माने देशमुख, संजयआबा मंडले, शिवाजी मोहिते, प्रियंका आडत, सीमा खाडे, रायचंद खाडे, अशोक साठे, जवान माने देशमुख, भैय्या कोडग, संतोष मेहेत्रे, सचिन मदने उपस्थित होते.

# दुकान फोडीचा गुन्हा उघड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ एप्रिल-**

दि.२३ डिसेंबर रोजी सुर्योदय मोबाईल शॉपी, वासुद चौक, सांगोला येथील दुकानाच्या वरील पत्रा उचकटुन पीओपी तोडुन आत प्रवेश करून ३ लाख ९० हजार ५०० रु. किंमतीचे वेगवेगळे मोबाईल फोन चोरी झाले होते. याबाबत सांगोला पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला.



याप्रकरणी सांगोला पोलिसांनी दि.२४ मार्च रोजी एक मोबाईल ट्रेस करून त्याची पुर्ण माहिती घेवून कर्नाटक राज्यातील बागलकोट येथून आरोपी अक्षय शांताराम इंदुलकर (वय-३६) रा.नवा नगर, बागलकोट यास सदर गुन्ह्यात अटक करून त्याचेकडून अंदाजे किंमत ३ लाख ३० हजार रुपयांचे एकुण २० मोबाईल असा मुद्देमाल मिळाला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. दत्ता वजाळे, विशाल भोसले, पोकॉ.शहाजहान शेख व सायबर पोलीस ठाणेकडील पोकॉ.राहुल सोनकर यांनी केली.